



# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार २५ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





## राष्ट्रीय परीक्षा संस्थेमधील 47 अधिका-यांची हकालपट्टी




**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट पेपरफुटी प्रकरणानंतर राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या कामकाजावर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. NTA ने शुक्रवारी तब्बल ४७ अधिका-यांची हकालपट्टी केली असून, काही अधिका-यांविरुद्ध कायदेशीर आणि फौजदारी कारवाईही केली जाणार आहे. ही कारवाई NTA च्या संपूर्ण पुनर्रचनेचा भाग असल्याचे सांगितले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, केंद्र सरकार NTA च्या प्रशासकीय रचनेत आणि कार्यपद्धतीत व्यापक बदल करण्याच्या तयारीत आहे. पुढील एका महिन्यात NTA ची पुनर्रचना केली जाण्याची शक्यता असून, त्याअंतर्गत परीक्षा घेण्याची पद्धत, प्रशासन आणि सुरक्षाव्यवस्थेत महत्त्वाचे बदल केले जाणार आहेत. NTA च्या परीक्षा प्रक्रियेत वापरल्या जाणा-या आउटसोर्सिंग माडेलचाही आढावा घेतला जात आहे. परीक्षांचे आयोजन आणि इतर तांत्रिक प्रक्रिया यामध्ये सध्या वापरल्या जाणा-या पद्धतींचे पुनर्मूल्यांकन करण्यात येत असून, तज्ज्ञ समितीच्या शिफारसींनुसार नवीन प्रणाली लागू केली जाणार आहे. सरकारचे उद्दिष्ट पेपरफुटीला पूर्णपणे आळा घालणारी 'लीक-प्रूफ' परीक्षा प्रणाली विकसित करण्याचे आहे. यामुळे राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. NTA दरवर्षी JEE, NEET, CUET यांसह १५ ते २० राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा आयोजित करते. अलीकडील पेपरफुटीच्या घटनांनंतर संस्थेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाल्यामुळे सुधारणा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. (पान २ वर)

## केंद्रीय मंत्र्यांचा राजीनामा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील केंद्रीय रेल्वे आणि अन्न प्रक्रिया उद्योग राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू यांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या



सल्ल्यानुसार, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी, संविधानाच्या कलम ७५(२) नुसार त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. यासंदर्भात राष्ट्रपती भवनाकडून अधिकृत पत्रकाद्वारे माहिती देण्यात आली आहे. खरे तर, रवनीत सिंग बिट्टू यांचा राज्यसभा खासदारकीचा कार्यकाळ २१ जून रोजीच संपुष्टात आला होता. भारतीय जनता पक्षाने १८ जून रोजी पार पडलेल्या राज्यसभा निवडणुकीत बिट्टू यांना पुन्हा उमेदवारी दिली नव्हती. त्यांचा खासदारकीचा कालावधी संपल्यानंतर त्यांनी आज (शुक्रवार) त्यांच्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला. महत्वाचे म्हणजे, पुढील वर्षात होणा-या पंजाब विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी त्यांनी राजीनामा दिल्याची चर्चा आहे. रवनीत सिंह बिट्टू हे पंजाबचे माजी मुख्यमंत्री दिवंगत बेअंत सिंह यांचे नातू आहेत. त्यांनी २४ मार्च २०२४ रोजी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांनी २००९ मध्ये आनंदपूर साहिब आणि त्यानंतर, २०१४ आणि २०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत लुधियाना मतदारसंघातून काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढली होती आणि विजयी झाले होते. यानंतर, मार्च २०२१ ते जुलै २०२१ या काळात त्यांनी लोकसभेत काँग्रेस नेते म्हणून काम बघितले.

## आंदोलनात सहभाग घेताच प्राध्यापकाने नोकरी गमावली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट पेपरफुटी प्रकरण आणि त्यानंतर शिक्षण मंत्र्यांवर जबाबदारी निश्चित करावी, या मागणीसाठी देशभरात आंदोलने सुरू आहेत. हजारो विद्यार्थी आणि केंद्र सरकारच्या धोरणांमुळे नाराज झालेले लोक या आंदोलनात सहभागी होत आहेत. उत्तर



प्रदेशच्या बरेलीमधील एका प्राध्यापकानेही जंतर-मंतर येथील आंदोलनात सहभाग घेतला होता. मात्र त्यानंतर त्याला आपली नोकरी गमवावी लागली आहे. डा. मोहित भारद्वाज असे या प्राध्यापकाचे नाव आहे. बरेलीमधील गन्ना उत्पादक (पदव्युत्तर) महाविद्यालयात भारद्वाज सहाय्यक प्राध्यापक म्हणून नोकरी करत होते. मात्र जंतर-मंतरवरील आंदोलनात सहभाग घेतल्यानंतर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने त्यांना अचानक कामावरून काढून टाकले. ही कारवाई करताना त्यांना नोटीस किंवा चौकशी करण्यात आली नाही. त्यामुळे आंदोलनात सहभागी झाल्यामुळे ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप भारद्वाज यांनी केला.डा. भारद्वाज हे २० जून २०२४ रोजी महाविद्यालयात नोकरीला लागले होते. मात्र आता अचानक कारवाई झाल्यामुळे त्यांनी जिल्हा न्यायदंडाधिका-यांकडे तक्रार दाखल करून याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.महाविद्यालयाने डा. भारद्वाज यांना ३० जून २०२७ पर्यंत वैध असलेले ओळखपत्र दिले होते. तसेच त्यांच्या कामाचे कौतुक करताना त्यांच्या समर्पक वृत्तीबद्दल मे २०२६ मध्ये प्रशस्तीपत्रक देउन त्यांचा सत्कारही केला होता. मात्र असे असूनही केवळ आंदलोनात सहभागी झाल्यामुळे कारवाई करण्यात आल्याचा आरोप भारद्वाज यांनी केला.

## जेपीएससीच्या 9 परीक्षा रद्द

**रांची :** झारखंड लोकसेवा आयोगमधील सुरू असलेल्या वादविवादादरम्यान, आयोगाचे अध्यक्ष एल. खियांग्ते यांचा राजीनामा राज्यपालांनी स्वीकारला आहे. त्याचबरोबर, आयोगाने झारखंड



संयुक्त नागरी सेवा मुख्य परीक्षा (मेंस परीक्षा) सह एकूण ९ महत्त्वाच्या भरती परीक्षा पुढील आदेशापर्यंत स्थगित केल्या आहेत. २ जुलै २०२६ रोजी जाहीर झालेल्या १४ व्या संयुक्त नागरी सेवा (प्रारंभिक) परीक्षेच्या निकालानंतर अनेक उमेदवारांनी अनियमिततेचे आरोप केले. उमेदवारांचे म्हणणे आहे की कट-ऑफ गुण सार्वजनिक केले नाहीत, डटफ शीट आणि मूल्यांकन प्रक्रियेत पारदर्शकता नव्हती. याशिवाय, उमेदवारांना गुणही सांगितले नाहीत. जास्त गुण असल्याचा दावा करणा-या काही उमेदवारांची निवड झाली (पान २ वर)




# लोकसभा-राज्यसभा ३ दिवसांसाठी तहकूब

### बोलण्यासाठी उभे राहिल्यावर राहुल गांधींना थांबवले, पुन्हा संधी मिळाली नाही: खरगे म्हणाले- पंतप्रधानांनी सभागृहात येउन उत्तर द्यावे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशीही पेपरफुटीचा मुद्दा दोन्ही सभागृहांवर प्रभावी ठरला. लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आपले म्हणणे मांडण्यासाठी उभे राहिले, परंतु पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी त्यांना तात्काळ बोलण्याची परवानगी दिली नाही. त्यांनी सांगितले की, आधी सभागृहाच्या पटलावर आवश्यक कागदपत्रे ठेवली जातील, त्यानंतर त्यांना संधी दिली जाईल. मात्र, सततच्या गोंधळामुळे ती संधी मिळू शकली नाही आणि लोकसभेचे कामकाज २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले.सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधी खासदारांनी पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा मुद्दा उपस्थित करत घोषणाबाजी सुरू केली.अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदस्यांना आपापल्या जागांवर परत येउन सभागृहाचे कामकाज चालू देण्याचे आवाहन केले, परंतु गोंधळ थांबला नाही. त्यानंतर कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत (पान २ वर)



## वांगचुक यांचे 26 दिवसानंतर उपोषण समाप्त

**नवी दिल्ली :** शिक्षण व्यवस्थेतील कथित परीक्षा गैरव्यवहार आणि पेपरफुटी प्रकरणांवर कठोर कारवाई, तसेच विद्यार्थ्यांच्या मागण्यांना न्याय मिळावा यासाठी मागील २६ दिवसांपासून बेमुदत उपोषणाला बसलेले सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमी सोनम वांगचुक यांनी अखेर आपले उपोषण मागे घेतले आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय मंत्री डा. जितेंद्र सिंह यांच्यासोबत झालेल्या दीर्घ चर्चेनंतर त्यांनी हा निर्णय घेतला.



उपोषण सोडताना रुग्णालयात झालेल्या भावनिक क्षणांमध्ये केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी वांगचुक यांना ज्यूस पाजून उपोषण सोडण्याची विनंती केली, तर डा. जितेंद्र सिंह यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली अँगमो आणि लेह-लडाखमधील एपेक्स बाडीचे वरिष्ठ पदाधिकारीही उपस्थित होते.

सोनम वांगचुक यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्सवर माहिती देताना सांगितले की, केंद्र सरकारशी अनेक दिवस चर्चा सुरू होती. देशात आंदोलन अधिक तीव्र होउन हिंसाचाराची शक्यता निर्माण होउ नये, तसेच संसदेत परीक्षा पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांशी संबंधित (पान २ वर)

## देशभरातून लुटलेले लाखो रूपये वणीत जमा

**वणी (यवतमाळ) :** देशभरातील ऑनलाइन फसवणुकीतील २५ लाख ९९ हजार ६८ रुपयांची रक्कम वणीतील एका बँक खात्यात जमा झाल्याचे पोलिस तपासात उघड झाले. वणी पोलिसांनी येथील वरलक्ष्मी ट्रान्सपोर्टच्या दोन खातेधारकांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. गणेश नंदकिशोर गोहोकर (रा. वणी) आणि पवन साधुजी चाहणकर (रा. नांदेपेरा) अशी आरोपींची नावे आहेत. आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, (पान २ वर)

## वेळा वाया घालवू नका म्हणणारे सरन्यायाधीश भडकले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी नुकतेच त्यांच्याबाबत माध्यमांमध्ये आलेल्या वक्तव्याचे खंडन केले आहे. त्यांनी



सर्वोच्च न्यायालयाने क?क्रोज जनता पार्टीच्या आंदोलनकर्त्यांवर पोलिसांकडून करण्यात आलेले अत्याचार आणि हिंसा प्रकरणी सुनावणीचा संदर्भ घेत माझ्याबाबत चुकीची माहिती देउन मला कशाची काळजी नाही असे रिपोर्टिंग केले गेले असे वक्तव्य केले. २० जुलै रोजी सीजेपीद्वारे चलो संसद हा मार्च काढण्या आला होता. नीट परीक्षेत गोंधळ, पेपर लीक, शिक्षण व्यवस्थेत सुधारणा या मागण्या घेउन हे आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना हुसकावून लावण्यासाठी लाठीचार्ज, टिअर गॅस आणि पॅलेट गनचा वापर केला. यात अनेक विद्यार्थी जखमी झाले आहेत. यानंतर २२ जुलै रोजी वकील नरेंद्र मिश्रा यांनी सर्वोच्च न्यायालयात लेटर पिटीशन दाखल केली होती. त्या याचिकेवर सुनावणीवेळी वकिलांनी पोलिसांच्या कारवाईचे फुटेज दाखवण्याची विनंती केली. त्यावेळी सूर्यकांत यांनी तुम्ही आमचा आणि तुमचा वेळ वाया घालवू नका आम्हाला (पान २ वर)

## स्वत:चे अपयश लपवण्यासाठी पेपर लीकचे कारण पुढे केले



**नवी दिल्ली :** नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी आंदोलक विद्यार्थ्यांवर जोरदार टीका केली आहे. नीट परीक्षेतील पेपर लीकच्या घटनेचा वापर काही विद्यार्थी हे स्वत:चे अपयश त्यांच्या पालकांपासून लपवण्यासाठी असल्याचा दावा (पान २ वर)

## 'गतिमान' एमपीएससीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) परीक्षा व निकाल प्रक्रिया गतिमान झाल्याचा दावा केला असला, तरी शालेय शिक्षण विभागातील अधीक्षक व तत्सम पदांच्या भरतीचा (जाहिरात क्र. ९०/२०२२) निकाल गेल्या दहा महिन्यांपासून प्रलंबित असल्याने आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. भरती प्रक्रिया तीन वर्षांपासून रखडल्याने हजारो उमेदवारांचे शैक्षणिक, आर्थिक आणि व्यावसायिक नियोजन विस्कळीत झाल्याचा आरोप उमेदवारांनी केला आहे.या भरतीची जाहिरात २१ ऑक्टोबर




२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर तब्बल तीन वर्षांनी, १४ ऑगस्ट २०२५ रोजी चाळणी परीक्षा घेण्यात आली. परीक्षेनंतर आयोगाने अंतिम उत्तरतालिका जाहीर केली. मात्र, परीक्षा होउन दहा महिन्यांहून अधिक कालावधी उलटूनही मुख्य निकाल जाहीर करण्यात आलेला नाही. एमपीएससीने विविध स्पर्धा परीक्षांचे निकाल आणि उत्तरतालिका तुलनेने कमी कालावधीत प्रसिद्ध केल्या आहेत. त्यामुळे आयोगाच्या कामकाजाला गती आल्याचे चित्र निर्माण झाले. मात्र, अधीक्षक भरतीच्या (पान २ वर)

## धर्मेंद्र प्रधान राजीनामा देणार नाहीत

### पद सोडणे हा तोडगा नसल्याची सरकारची भूमिका

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी जंतर-मंतर मैदानावर आंदोलकांनी मुक्काम ठोकला आहे. क?क्रोच जनता पार्टीच्या शिष्टमंडळाशी केंद्रीय मंत्र्यांनी चर्चा केली. राजीनाम्याचा मागणीबद्दल सरकारने वेळ मागितलेला असतानाच आता नवी माहिती समोर आली आहे. धर्मेंद्र प्रधान राजीनामा देणार नाहीत, अशी सरकारची भूमिका आहे. राजीनामा हा समस्येवरील तोडगा नसल्याचे सरकारचे म्हणणे असल्याचे सरकारी सूत्रांनी सांगितले. इंडिया टुडे वृत्तवाहिनीने याबद्दलचे वृत्त दिले आहे. सरकारी सूत्रांच्या माहितीनुसार दिलेल्या वृत्ता म्हटले आहे की, धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. राजीनामा देणे आणि जबाबदारीतून पळ काढणे ही सर्वात सोपी गोष्ट असेल. पण, जनतेने आम्हाला जनादेश दिला आहे आणि आम्ही काम करून दाखवू,' अशी सरकारची भूमिका असल्याचे सूत्रांनी म्हटले आहे.



राजीनाम्यावरून पेच!

सरकारने अशी भूमिका जाहीर केली, तर 'काक्रोच जनता पार्टी'साठी एक मोठा धक्का असणार आहे. जंतर-मंतरवर निदर्शने करणा-या आंदोलकांकडून नीट पेपरफुटी, तसेच परीक्षेशी संबंधित इतर मुद्द्यांवरून प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. सूत्रांनी सांगितले की, सरकारची (पान २ वर)

## हिमाचलमध्ये धावत्या कारवर दरड कोसळून 13 ठार

**नवी दिल्ली/भोपाळ/जयपूर-** शुक्रवारी हिमाचल प्रदेशातील लाहौल-स्पितीमध्ये उदयपूर-किलाड रस्त्यावर काडू नाला जवळ भूस्खलन झाले. त्याच्या कचाट्यात एक टाटा सुमो टॅक्सी सापडली. वाहनात पंधरा जण होते, त्यापैकी १३ जणांचा मृत्यू झाला.दरम्यान, गुजरातमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूर आला आहे. वलसाडच्या उमरगाम तालुक्यात १६ तासांत ४३ इंच पावसाने सखल भाग पाण्याखाली गेला आहे.नवसारीमध्ये पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांना हेलिकाप्टरने बाहेर काढण्यात आले. अहमदाबाद आणि सुरतमध्ये पूर आला. वाव-थ्राड जिल्ह्यातील बाजारपेठा पाण्याखाली गेल्या. गेल्या १० दिवसांपासून उत्तर प्रदेशात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गंगा आणि यमुना नद्यांसह १० नद्यांना पूर आला आहे. सीतापूरमध्ये रस्त्यावर पाणी साचल्याने गावक-यांना बोटीने प्रवास करावा लागत आहे. दरम्यान, बांसवाडा आणि डुंगरपूरसह राजस्थानच्या ११ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.




राजस्थानच्या चित्तोडगड जिल्ह्यातील बिहारिपुरा गावात एका घरावर वीज पडल्याने त्याचा मोठा भाग कोसळला. गुजरातच्या नवसारी जिल्ह्यातील मेघर गाव पुराच्या पाण्याखाली गेले. भारतीय तटरक्षक दलाने हेलिकॉप्टरच्या साहाय्याने अडकलेल्या रहिवाशांना बाहेर काढले. गुजरातमध्ये मुसळधार पावसामुळे आंबली सेंटोसा पार्क निवासी परिसरात पाणी साचले असून, अंदाजे १५-२० वाहने पाण्याखाली गेली आहेत. गुजरातच्या वाव-थराड भागातील 'लाटी बाजार' परिसरातील दुकानांमध्ये पुराचे पाणी शिरले आहे. प्रशासन परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## राज्यात पावसाचा जोर वाढला

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात काही दिवसांच्या विश्रांतीनंतर मान्सूनने पुन्हा एकदा रौद्र रूप धारण केले आहे. हवामान विभागाने पुणे, नाशिक आणि कोकणातील जिल्ह्यांना अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे.नाशिकमध्ये गोदावरी नदीला पूर आला असून अनेक गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तर दुसरीकडे, शेजारील गुजरात राज्यातही पावसाने मेघतांडव सुरू केले असून, तिथे पुरात अडकलेल्या महाराष्ट्रातील ३५ पर्यटकांची हेलिकाप्टरच्या मदतीने सुखरूप सुटका करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पश्चिम भारतापासून ते दक्षिण कोरियापर्यंत तब्बल १० हजार किलोमीटर लांबीचे ढग पसरले असून या क्लाउड कारिडारमुळेच हा जोरदार पाउस होत असल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे.



**धरणांमधून विसर्ग सुरू-** जून महिन्यात ओढ दिलेल्या पावसाने जुलैमध्ये जोरदार पुनरागमन केले आहे. हवामान विभागाने पुण्याच्या घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट तर नाशिक, ठाणे, पालघर, रायगडसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. सततच्या पावसामुळे धरणांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत आहे. खडकवासला धरण १०० टक्के भरल्यामुळे त्यातून ९,४०५ क्यूसेक वेगाने पाणी सोडण्यात येत आहे. विशेष म्हणजे, २३ जुलैपर्यंत महाराष्ट्रात महिन्याच्या सरासरीपेक्षा ३४ टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे. मात्र, हा पाउस प्रामुख्याने कोकण आणि पश्चिम (पान २ वर)



# अकोली रेल्वे स्थानकावरून शेकडो वारकऱ्यांचे पंढरपूरकडे प्रस्थान

## आ. प्रवीण पोटे यांच्या वतीने जेवणाचे डबे, उपयोगी किट वाटप

**अमरावती/प्रतिनिधीः-** आषाढी एकादशीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे निघालेल्या शेकडो वारकऱ्यांच्या भक्तिमय उत्साहाने आज नया अकोली रेल्वे स्थानक परिसर दुमदुमून गेला. विठ्ठल नामाच्या अखंड जयघोषात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात पंढरपूर विशेष रेल्वेचे प्रस्थान झाले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येत असलेल्या सेवा दशक उपक्रमाअंतर्गत आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या वतीने पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना जेवणाचे डबे, उपयोगी किट तसेच आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी त्यांच्यावतीने



रेल्वेला हिरवी झेंडी दाखवून वारकऱ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

स्थानकावर सकाळपासूनच वारकरी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. विठ्ठलभक्तांच्या जयघोषाने आणि भक्तिरसाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता. प्रवासाच्या सुरुवातीलाच टाळ-मृदंग, विठ्ठल भजने आणि 'ज्ञानेश्वर माऊली', 'तुकाराम' यांच्या जयघोषात वारकऱ्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले. वारकऱ्यांचे अत्यंत आत्मीयतेने स्वागत करून त्यांची सेवा केली. या आपुलकीच्या आदरातिथ्यामुळे वारकरी भाविक भारावून गेले.

यावेळी ज्येष्ठ वारकऱ्यांचा आ. प्रवीण पोटे पाटील, आ. राजेश वानखडे, जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी , श्रीचंद तेजवानी आणि तुषार भारतीय यांच्या हस्ते शाल देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी वारकऱ्यांना सुखरूप प्रवास व विठ्ठलाच्या दर्शनासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास आ. प्रवीण पोटे पाटील, आ. राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवानी, तुषार भारतीय, चेतन गावंडे, शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, चेतन पवार, श्रेयस पोटे पाटील, आशिष अतकरे, नितीन गुडधे, लता देशमुख, राधा कुरिल, भारती गुहे, डॉ. कंवल पांडे, प्रवीण वैश्य, विनोद ठोसर, सुधा तिवारी, लविना हर्षे, सुनंदा खरड, प्रशांत शेगोकार, बलदेव बजाज, ऋषिकेश देशमुख यांच्यासह भाजप महिला मोर्चा, युवा मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

सेवा, श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमामुळे वारकऱ्यांच्या वारीला सेवाभावाची जोड मिळाली. विठ्ठलभक्तांच्या सेवेसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे वारकरी व नागरिकांनी मनापासून स्वागत केले.

## क्रांतीगीता महाबळ यांचे निधन

**मुंबई :** क्रांतीगीता महाबळ यांचे आज (दि.२४) सायंकाळी ५:३०, दुःखद निधन झाले. त्या बरेच दिवस आजारी होत्या.



स्वातंत्र्यवीर साहित्य अभ्यास मंडळाच्या त्या अध्यक्षा होत्या. सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या ही त्या बराच काळ सदस्य म्हणून कार्यरत होत्या. हिंदू महासभा या जुन्या पक्षातर्फे त्यांनी दादर येथील मतदार संघातून अनेक वर्षांपूर्वी निवडणूक सुद्धा लढवली होती. राष्ट्रीय कीर्तनकार कै. श्री. गोविंद स्वामी आफळे यांच्या त्या कन्या असून, राष्ट्रीय कीर्तनकार श्री. चारुदत्त आफळे यांच्या त्या ज्येष्ठ भगिनी होत्या. त्या स्वतःही उत्तम कीर्तन करीत असत. अनेक वर्ष सार्वजनिक जीवनात राहून त्यांनी हिंदुत्वासाठी खूप कार्य केले होते.

पान १ व १० वरून

## राष्ट्रीय परीक्षा संस्थेमधील

**शिक्षण मंत्रालयातही मोठा बदल-**NEET पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने शिक्षण मंत्रालयातही मोठा प्रशासकीय बदल केला आहे. सरकारने उच्च शिक्षण विभागाचे सचिव विनीत जोशी यांची बदली करून त्यांच्या जागी नरेश पाल गंगवार यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना गुरुवारी उशिरा रात्री जारी करण्यात आली.

**NTA मध्ये सध्या किती कर्मचारी? -** NTA ही केंद्र सरकारच्या अंतर्गत कार्यरत स्वयं-अर्थसहाय्यित संस्था आहे. सध्या संस्थेमध्ये, २२ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर, ३८ करारावर नियुक्त कर्मचारी, १३८ आउटसोर्स कर्मचारी, तसेच एक कर्मचारी मूळ विभागातून NTA मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. याशिवाय, २९ ऑक्टोबर २०२४ रोजी सरकारने १६ नवीन पदांची निर्मिती केली होती. त्यामध्ये ८ संचालक आणि ८ संयुक्त संचालक स्तरावरील पदांचा समावेश आहे.

**परीक्षा व्यवस्थेतील सुधारणांना वेग-**NEET पेपरफुटीनंतर केंद्र सरकारने उचललेल्या या पावलाकडे राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता, जबाबदारी आणि विश्वासार्हता वाढविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाउल म्हणून पाहिले जात आहे. आगामी काळात NTA मध्ये आणखी मोठे प्रशासकीय आणि तांत्रिक बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## जेपीएससीच्या 9 परीक्षा

नाही, तर कमी गुण असलेल्या उमेदवारांची निवड झाली.

**परीक्षा आयोजित करणा-या एजन्सीवर आरोप-**जेपीएससीवर असाही आरोप आहे की आयोगाने अशा एजन्सीकडून अनेक परीक्षा घेतल्या जी उत्तर प्रदेशात ब्लॅकलिस्ट करण्यात आली होती. आयोगाच्या एका सदस्यानेही मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून परीक्षा प्रक्रियेच्या निष्पक्षतेबद्दल चिंता व्यक्त केली.

**सीआयडी चौकशी सुरू -** वाद वाढल्यानंतर झारखंड सरकारने संपूर्ण प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे सोपवली. सीआयडीने जेपीएससी कार्यालयासह अनेक ठिकाणी छापे टाकले. सीआयडीने चौकशीदरम्यान उप परीक्षा नियंत्रकासह परीक्षेशी संबंधित अनेक लोकांना अटक केली. असा आरोप आहे की परीक्षा संचालन आणि डेटा प्रोसेसिंगमध्ये गंभीर गडबड झाली. जेपीएससीने झारखंड संयुक्त नागरी सेवा मुख्य परीक्षा-२०२५ सह एकूण ९ भरती परीक्षा सध्या पुढे ढकलल्या आहेत. आयोगाने म्हटले आहे की, परीक्षांच्या नवीन तारखा लवकरच जाहीर केल्या जातील. उमेदवारांना केवळ आयोगाच्या अधिकृत वेबसाइटवर प्रसिद्ध केलेल्या सूचनांवर वि□ास ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## लोकसभा-राज्यसभा 3 दिवसांसाठी

स्थगित करण्यात आले. दुपारी १२ वाजता सभागृहाची बैठक पुन्हा सुरू झाली. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सभागृहाला सांगितले की, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी आपले आमरण उपोषण संपवले आहे. त्यांनी असेही सांगितले की, सरकार पेपरफुटीच्या मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे आणि या संदर्भात दुपारी १ वाजता होणा-या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कठोर कायद्यावरही विचार केला जाईल. यावर विरोधकांचा गदारोळ पुन्हा वाढला.

राहुल गांधी आपले म्हणणे मांडण्यासाठी उभे राहिले, परंतु पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी सांगितले की, सभागृहाच्या कार्यसूचीनुसार आधी पटलावर कागदपत्रे ठेवली जातील, त्यानंतर त्यांना बोलण्याची संधी दिली जाईल.कागदपत्रे ठेवण्याची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच घोषणाबाजी वाढली. कामकाज सुरळीत होउ शकले नाही आणि राहुल गांधी आपले म्हणणे मांडू शकले नाहीत. अखेर लोकसभेची बैठक २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आली.

तिकडे, राज्यसभेतही सकाळी ११ वाजता कामकाज सुरू झाले. सुमारे पाच मिनिटांनंतर सभापतींनी सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याची प्रक्रिया सुरू केली.

याच दरम्यान, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे दिल्लीत आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवरील कथित पोलीस कारवाई आणि पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी उभे राहिले. गदारोळात कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. दुपारी १२ वाजता राज्यसभेची बैठक पुन्हा सुरू झाली. मल्लिकार्जुन खरगे यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी पुन्हा केली आणि म्हणाले की, पंतप्रधानांनी स्वत? सभागृहात येउन या संपूर्ण प्रकरणावर निवेदन द्यावे. सत्ताधारी पक्षाकडून याला विरोध झाला आणि सभागृहात गोंधळ वाढला. त्यानंतर कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दुपारी २ वाजता राज्यसभेची बैठक पुन्हा सुरू झाली, परंतु विरोधकांचा गदारोळ सुरूच राहिला. उपसभापती हरिवंश यांनी वारंवार शांतता राखण्याचे आवाहन केले, परंतु परिस्थिती सामान्य झाली नाही. सुमारे सात मिनिटांनंतर राज्यसभेचे कामकाजही २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. अशा प्रकारे, संसदेचा आणखी एक दिवस पेपरफुटीच्या मुद्द्यावरील कोंडीमुळे वाया गेला. सरकार चर्चा आणि कठोर कायद्याबद्दल बोलत राहिली, तर विरोधक शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्यावर आणि पंतप्रधानांच्या निवेदनावर ठाम राहिले. सभागृहात चर्चा सुरू होण्यापूर्वीच गोंधळ इतका वाढला की, दोन्ही सभागृहात कोणतीही फलदायी चर्चा होउ शकली नाही.

## वांगचुक यांचे 26 दिवसानंतर

प्रश्नांवर सर्वपक्षीय स्तरावर चर्चा करण्याचे आश्वासन मिळाल्याने त्यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी सांगितले की, विविध पक्षांतील ६५ खासदारांनी प्रत्यक्ष भेट घेउन किंवा पत्राद्वारे उपोषण सोडण्याची विनंती केली होती.वांगचुक यांचे हे उपोषण देशभरातील विद्यार्थी आंदोलनाशी एकरूप झाले होते. स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटी, शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकतेचा अभाव आणि जबाबदारांवर कठोर कारवाईची मागणी या मुद्द्यांवर विद्यार्थ्यांचे आंदोलन गेल्या काही आठवड्यांपासून सुरू आहे. दिल्लीतील आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीमारानंतर या आंदोलनाला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले होते. दरम्यान, सोनम वांगचुक यांनी उपोषण समाप्त केले असले तरी विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील अनेक संघटनांनी आपला लढा सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. शिक्षण व्यवस्थेत मूलभूत सुधारणा, परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि जबाबदारांवर कठोर कारवाई होईपर्यंत आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली आहे.

## देशभरातून लुटलेले लाखो रूपये

महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि राजस्थान या राज्यांतील नागरिकांची फसवणूक करून त्यांचे पैसे याच खात्यात जमा झाल्याचे तपासात समोर आले आहे.

पोलिस शिपाई छाया रामचंद्र उमरे यांनी तक्रार दिली. भारत सरकारच्या राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टल आणि समन्वय पोर्टलवरील आर्थिक व्यवहारांचे विश्लेषण करताना वणीतील अ?ॅक्सिस बँकेच्या खात्यावर संशय निर्माण झाला. तपासात हे खाते सायबर गुन्ह्यांमध्ये वापरले जाणारे □म्युल बँक खाते□ असल्याचे निष्पन्न झाले. १४ ते १७ऑगस्ट २०२५ या अवघ्या चार दिवसांत या खात्यात २५.९९ लाख रुपये जमा झाले. त्यानंतर ही रक्कम विविध बँक खाती, यूपीआय आणि ऑनलाइन पुढे व्यवहारांच्या माध्यमातून वळविण्यात आली. या खात्याविरोधात राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टलवर तब्बल २० तक्रारी नोंद झाल्या आहेत. या प्रकरणी बीएनएसच्या कलम ३१८(४), ३१९ (२), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलम ६६ (क) आणि ६६ (ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस निरीक्षक भानुदास पिदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

**दाभडीचा युवक मालामाल-** आर्णी तालुक्यातील दाभडी (समाजमंदिर रोड) येथील रत्नपाल जनार्धन कांबळे या युवकाच्या बँक खात्यात संशयास्पदरीत्या ५ लाख ९६ हजार रुपयांच्या रकमेची उलाढाल झाली. हा सर्व पैसा ऑनलाइन फ्राडमधील असल्याचे सायबर पोलिसांच्या निर्देशनास येताच आर्णी पोलिस ठाण्यात त्या युवकाविरुद्ध २२ जुलै रोजी गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार एनसीआरपी पोर्टलच्या सव्हिलन्समधून उघडकीस आला. त्यानंतर सायबर पोलिसांच्या निर्देशावरून सचिन देवकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून आर्णी पोलिसांनी रत्नपाल कांबळे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## वेळा वाया घालवू नका म्हणणारे

व्हीडीओ पाहण्यात कोणता रस नाही आमच्याकडे त्यासाठी वेळ नाही असे वक्तव्य केले होते.

अशी याचिकाच दाखल नव्हती

त्यानंतर सरन्यायाधीशांनी सांगितले की माझ्या बोलणे अशा प्रकारे सादर केले गेले की सर्वोच्च न्यायालय हे पोलिसांनी केलेल्या हल्ल्याबाबतची याचिका ऐकायला तयार नाही किंवा लवकर लिस्ट करून घेण्यास नकार दिला आहे. बार अँड बेंचच्या रिपोर्टनुसार या भ्रामक रिपोर्टवर सरन्यायाधीशांनी कडक प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी तांत्रिक आणि कायदेशीर रूपात हे प्रकरण रद्द करण्याचा प्रश्नच येत नाही. कारण कोर्टात अशी केसच फाईल झालेली नव्हती.

याचिका दाखल झाली तर विचार करू

सीजेआय पुढे म्हणाले की मिश्रा नावाच्या व्यक्तीने याचा उल्लेख केला होता. माध्यमांमध्ये चुकीच्या पद्धतीने रिपोर्ट केले गेले. मी या प्रकरणाला लिस्ट करून घेण्यास नकार दिला आहे असे सांगितले गेले. हे एक फक्त वक्तव्य होते. त्यावर न विचार करता रिपोर्टिंग केले गेले. मी रजिस्ट्रीमध्ये चौकशी केली असता एसा एकही कागद दाखल झालेला नाही. सर्वोच्च न्यायालयात याबाबतची पीआयएल दाखल झालेली नाही. हे वकिलांनी न्यायालयासमोर तोंडी याचिका केली होती. भविष्यात याबाबत याचिका दाखल झाली तर सर्वोच्च न्यायालय सामान्य प्रक्रियेद्वारे यावर विचार करेल.

## स्वत:चे अपयश लपवण्यासाठी

त्यांनी केला आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा सनदी सेवांचे स्वप्न पाहणा-या विद्यार्थ्यांनी आंदोलनात सहभागी न होता अभ्यासावर लक्ष द्यावे, असा सल्लाही त्यांनी दिला.संसद भवन परिसरात पत्रकारांशी बोलताना निशिकांत दुबे यांनी आकडेवारी मांडली. देशात वैद्यकीय प्रवेशासाठी दरवर्षी तब्बल २२ लाख विद्यार्थी परीक्षा देतात, तर जागांची संख्या ही ६५ हजारांच्या आसपास आहे. प्रत्येक पालकाला आपला मुलगा किंवा मुलगी अभ्यासात खूप हुशार आहे असेच वाटत असते. आपण अभ्यासात चांगले असूनही फक्त पेपर लीक झाल्यामुळे आपली निवड झाली नाही, असा युक्तिवाद करत अनेक विद्यार्थ्यांनी पालकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी या घटनेचा वापर स्वतःच्या अपयशावर पांघरूण घालण्यासाठी केला आहे असे निशिकांत दुबे यांनी म्हटले.

जंतर-मंतर ही विद्यार्थ्यांसाठी योग्य जागा नाही

खासदार निशिकांत दुबे यांनी पालकांना आवाहन केले की, त्यांनी आपल्या मुलांना क?करोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली जंतर-मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनात पाठवण्याऐवजी पुन्हा स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. अशा आंदोलनामध्ये सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नैराश्याची भावना निर्माण होते. जर विद्यार्थ्यांना वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा प्रशासकीय सेवेत जायचे असेल, तर जंतर-मंतर ही त्यांच्यासाठी योग्य जागा नाही. त्यांनी पूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले पाहिजे असें निशिकांत दुबे म्हणाले.

**दोषींना कठोर शिक्षेसाठी सरकार कटिबद्ध-**या प्रकरणातील १३ आरोपींना कडकडात कडक शिक्षा व्हावी यासाठी सरकार देशातील नामवंत वकिलांची मदत घेणार आहे. प्रकरणाचा लवकरात लवकर निकाल लागून आरोपींना कडक शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन केले जाईल, असेही दुबे यांनी सांगितले.

## 'गतिमान' एमपीएससीच्या

निकालाबाबत सातत्याने होत असलेल्या विलंबामुळे आयोगाच्या कार्यक्षमतेबाबत उमेदवारांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.निकालाबाबत उमेदवारांनी आयोगाच्या हेल्पलाइनवर वारंवार संपर्क साधून विचारणा केली. त्यावेळी प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले. काही आठवड्यांपूर्वी आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांनी निकालाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून लवकरच मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याचा दावा उमेदवारांनी केला आहे. मात्र, त्यानंतरही कोणतीही पुढील कार्यवाही न झाल्याने उमेदवारांमध्ये नाराजी वाढली आहे.

**भरती प्रक्रिया प्रदीर्घ काळ प्रलंबित-** उमेदवारांच्या मते, भरती प्रक्रिया प्रदीर्घ काळ प्रलंबित राहिल्याने अनेकांचे वयोमर्यादेचे, पुढील परीक्षांचे आणि नोकरीच्या संधींचे नियोजन प्रभावित होत आहे. आयोगाने इतर भरतीप्रमाणेच या प्रक्रियेलाही प्राधान्य देउन तातडीने निकाल जाहीर करावा, अशी मागणी उमेदवारांकडून करण्यात आली आहे. दरम्यान, लवकरच निकाल व मुलाखतींचे वेळापत्रक जाहीर न झाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही उमेदवारांनी दिला आहे.

## धर्मेंद्र प्रधान राजीनामा देणार

भूमिका अशी आहे की, प्रतीकात्मक पावले उचलण्याऐवजी नॅशनल टेस्टिंग एजन्सीमधील संस्थात्मक त्रुटी दूर करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. परीक्षा मंडळामधील त्रुटींची एक व्यापक यादी तयार करण्यात आली असून, लवकरच सुधारात्मक उपाययोजना राबवल्या जाण्याची अपेक्षा आहे.

**सरकारचा पेपरफुटीविरोधातील कारवाईवर जोर-**सूत्रांनी सांगितले की, पेपरफुटीच्या नेटवर्कवर सरकारच्या चालू असलेल्या कारवाईवरही प्रकाश टाकला. परीक्षा पेपरफुटीमध्ये सामील असलेल्या अनेक टोळ्यांना आधीच उद्ध्वस्त करण्यात आले आहे. यात सामील असलेल्या आरोपींवर पुढील कारवाई प्रलंबित असल्याची माहितीही सूत्रांनी दिली.

सरकारकडून ही भूमिका अशा दिवशी आली आहे, जेव्हा क?क्रोच जनता पार्टी जी नीट पेपरफुटी आणि परीक्षेतील अनियमिततेविरुद्धच्या आंदोलनाचे नेतृत्व करत आहे. त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनाम्याच्या मागणीवर कोणतीही तडजोड न करण्याची भूमिका घेतलेली आहे. सरकारला सादर केलेल्या एका पत्रात सीजेपीने म्हटले आहे की, आपल्या मागण्या यात धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, नीट परीक्षेच्या तणावामुळे आत्महत्या केलेल्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई आणि आंदोलकांवरील गुन्हे रद्द करणे, यांचा समावेश आहे. या मागण्यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा निष्कर्ष काढण्यापूर्वी देशभरातील समर्थक आणि आंदोलकांशी चर्चा केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास हे आंदोलन अधिक तीव्र होईल आणि देशभरात पसरेल, असा इशाराही त्यांनी दिला.

## राज्यात पावसाचा जोर

महाराष्ट्रत असून मराठवाड्याला अद्याप जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे.

**सीमाभागात आपत्कालीन परिस्थिती-** गुजरातमधील वलसाड जिल्ह्यातील उंबरगाव येथे अवघ्या २४ तासांत तब्बल १०६४ मिमी विक्रमी पावसाची नोंद झाली असून, त्याचा मोठा परिणाम महाराष्ट्राच्या सीमेलगतच्या तलासरी, डहाणू आणि पालघर भागावरही झाला आहे. ढगफुटीसदृश मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचले असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, आवश्यक ठिकाणी आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

**कल्याणमध्ये मुसळधार पावसाचा कहर-**कल्याणमध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे वाळधुनी परिसरातील अंडरपास पाण्याखाली गेला. या दरम्यान एका कारचालकाचा ताबा सुटून ती विठ्ठलवाडी नाल्यात वाहून गेली. अग्निशमन दलाचे जवान आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने बचावकार्य राबवत चालकाची सुखरूप सुटका केली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून, पाण्याने भरलेल्या रस्त्यांवरून प्रवास करताना नागरिकांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

**नाशिकमध्ये पूरस्थिती-** त्र्यंबकेश्वर (२९९ मिमी) आणि नाशिक (१३० मिमी) येथे झालेल्या मुसळधार पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. गंगापूर धरण ९७ टक्के भरल्याने पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. पुराचे पाणी निफाड तालुक्यातील सायखेडा आणि चांदूर गावात शिरल्याने तेथील सुमारे ६५ कुटुंबांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. गोदाघाटावरील प्रसिद्ध दुतोंड्या मारुती ९० टक्के पाण्याखाली (डोक्यापर्यंत) गेला आहे. हे पाणी आता जायकवाडी धरणाच्या दिशेने झेपावत आहे.

## हेल्मेट सक्तीच्या पहिल्याच

परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) तीन महिन्यांसाठी निलंबित करण्याची तरतूदही असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

दंडात्मक कारवाईपूर्वी नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली होती. पोलीस आयुक्त राकेश ओला आणि उपायुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली २२ जुलै रोजी राजापेठ, गाडगेनगर आणि फ्रेजरपुरा वाहतूक शाखेच्या वतीने हेल्मेट जनजागृती रॅली काढण्यात आली होती. वलगाव पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक रीता उईके यांनी नागरिकांना हेल्मेटचे वाटप केले, तर नियमांची सक्ती सुरू होण्यापूर्वी हेल्मेट न घालणाऱ्या वाहनचालकांना गुलाबपुष्प देत सुरक्षित प्रवासाचा संदेश देण्यात आला होता.

या मोहिमेची सुरुवातच पोलीस दलापासून करण्यात आली. पोलीस आयुक्तालयासमोर ड्युटीवर असलेल्या वाहतूक शिपायांनी ड्युटीवर येणाऱ्या प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याला अडवून हेल्मेटबाबत विचारणा केली.माहितीनुसार, आज सुमारे १०० पोलीस कर्मचाऱ्यांना केवळ तंबी देऊन सोडण्यात आले. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, आम्हीच नियम पाळले नाहीत तर नागरिकांना काय सांगणार? त्यामुळे पहिली कारवाई आमच्यावरच झाली.

## भाजपा सरकार विरोधात

करण्याची मागणीही करण्यात आली. सदर आंदोलनामध्ये डॉ. अभय गावंडे, नितेश वानखडे, गजानन कोरे, अंकुश पाटील कावडकर, मनोज तायडे, असलम भाई मंसूरी, नितीन पाटील गावंडे, गुणवंत पाटील गावंडे, गुड्डू पटेल, दादा इंगळे, बबनराव विल्हेकर, हाजी अश्रफ भाई धनीवाले, मोहन बुंदिले, शशांक धर्माळे, सागर गिरे, दिनकरराव देशमुख , प्रदीप वडतकर, अतिश शिरभाते, मधुभाऊ घाडगे, पंकज राणे, अनिकेत वाकपांजर, ओमप्रकाश कुठेमाटे, आरिफ भाई, वैभव बागडे, बबलू कुरेशी, राज इंगळे, श्रीमती अरुणाताई गावंडे, गोकुळ पाटील गावंडे, सौ. जयश्रीताई चव्हाण यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी, शेतकरी, विद्यार्थी व नागरिक यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) राष्ट्रीय काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि शिवसेना (उद्धव ठाकरे) या पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मंगळवारपासून जिल्हास्तरीय सुब्रतो

खेळाडू आणि संघानी नोंदणी करावी. सहभागी होणाऱ्या संघांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात ऑफलाईन नोंदणी केली आहे, अशा संघाना स्पर्धा स्थळ व वेळ कळविण्यात येणार आहे. सहभागी खेळाडूकडे वय निश्चिती चाचणी, ५ वर्ष वयापर्यंत असताना शासकीय जन्माचा दाखला, आधारकार्ड, खेळाडू ओळखपत्र, मुळ प्रतीत असणे आवश्यक आहे.

जिल्ह्यातील शाळा, संघानी सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑफलाईन नोंदणी केलेल्या संघाना कार्यालयातर्फे कळविण्यात येणार आहे. संघासोबत जबाबदार शारिरीक शिक्षक, सहायक शिक्षक असणे आवश्यक आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी कळविले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज

हेल्मेटचा वापर करण्याचे महत्त्व, तसेच एन सि आरबी, डायल ११२ आणि सायबर हेल्पलाईन १९३० या विविध नागरिकाभिमुख सेवांबाबत जनजागृती करण्यासाठी माहितीपर स्टॉल उभारण्यात आला होता. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## ऑटो चालकाला मारहाण

पप्पूंना शिवीगाळ करत मारहाण केली.नंतर त्यांच्या खिशातील ४ हजार रुपये जबरदस्तीने काढून घेऊन धमकी देत आरोपी फरार झाले.घटनेची माहिती मिळताच परतवाडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमी ऑटो चालकाला रुग्णालयात दाखल करून त्याचा जबाब नोंदवण्यात आला. पोलिसांनी चौघां विरोधात लूट, मारहाण व इतर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीच्या अटकेसाठी पोलिसांच्या विशेष पथकांकडून तपास केला जात आहे.या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## बकऱ्या चोरी करणाऱ्या

रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपींविरुद्ध अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक सूरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भारत चिरडे, जयसिंग चव्हाण, रवि राठोड, अमित घाटे, आकाश रंगारी आणि मोहसीन पठाण यांनी केली.

## मासे पकडायला गेलेल्या

या घटनेची माहिती मोर्शी पोलीस स्टेशनला देण्यात आली.मोर्शी पोलीस स्टेशनचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरेश कांबळे,पोलीस अंमलदार स्वप्निल बायस्कर,वैभव ठाकरे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व मृतक युवकाचे प्रेत शविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे हलविले.मृतकाचे प्रेत शवागारात ठेवण्यात आले असून दि.२५ जुलै रोजी उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे.या अचानक झालेल्या घटनेमुळे पाळा गावात शोककळा पसरली.याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास आरंभीला आहे.

## इर्विन चौकात वाहतूक

आणि मालवाहू गाड्यांच्या रांगा लागल्या होत्या. या कोंडीत शाळा-कॉलेजला जाणारे विद्यार्थी, नोकरीवर जाणारे कर्मचारी आणि गृहिणी अडकून पडल्या. अनेकांना महत्त्वाच्या कामांसाठी उशीर झाला. प्रत्यक्ष दर्शींच्या म्हणण्यानुसार, तपासणीमुळे कोंडी झाली असली तरी नियोजनाचा अभाव होता. लोकांनी वाहतूक विभागाला यासाठी जबाबदार धरले. हेल्मेट सक्तीच्या पहिल्याच दिवशी मोठ्या प्रमाणात तपासणी करावी लागल्याने ही कोंडी झाली, असे वाहतूक पोलिसांचे म्हणणे आहे.तपासणीदरम्यान सहकार्य करण्याचे आवाहन वाहतूक विभागाने केले आहे.

## ष्ठ्रेजरपुरा हद्दीत हातभट्टी

सडवा आणि दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त केले. कायद्यानुसार मोहाचा सडवा व इतर साहित्य जागीच नष्ट करण्यात आले. या कारवाईत एकूण ५४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुद्ध फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(क), ६५(फ) व ६५(ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## देशी दारूने भरलेला

पळ काढला. पोलिसांच्या पाहणीत ट्रक रस्त्याच्या कडेला बडनेऱ्याच्या दिशेने उलट्या बाजूने उभा असल्याचे आढळले. मात्र चालक व क्लिनर दोघेही तेथे नव्हते. पोलिसांनी परिसरात शोध घेतला, परंतु त्यांचा कोणताही मागमूस लागला नाही. त्यानंतर वाहतूक कंपनीच्या अधिकाऱ्यांना माहिती देऊन ट्रक जप्त करण्यात आला.काही तासांनंतर ट्रकचा क्लिनर पोलिसांसमोर हजर झाला. आपण ट्रकमध्ये झोपलो होतो. जाग आल्यानंतर चालक दिसला नाही. त्यामुळे घाबरून तेथून निघून गेलो, असे त्याने पोलिसांना सांगितले. मात्र ट्रकचा चालक अद्याप बेपत्ता असून त्याचा शोध सुरू आहे.

दरम्यान, वाहतूक कंपनीचे अधिकारी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात आल्यानंतर ट्रकमधील सुमारे ७० ते ८० पेट्या देशी दारू गायब असल्याचे निदर्शनास आले. प्रत्येक पेटीची किंमत सुमारे ४ हजार रुपये असल्याने प्राथमिक अंदाजानुसार ३ लाख रुपयांहून अधिक किमतीची दारू चोरीला गेल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

या घटनेची माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागालाही देण्यात आली असून, विभागाचे अधिकारी ट्रकमधील दारूची मोजणी व तपासणी करणार आहेत. तपास पूर्ण झाल्यानंतर चोरीला गेलेल्या दारूच्या पेट्यांची अचूक संख्या स्पष्ट होणार असून त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. प्राथमिक तपासात वडाळी, परिहारपुरा व परिसरातील काही नागरिकांनी दारूच्या पेट्या नेल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून, या सर्व बाबींचा फ्रेजरपुरा पोलीस सखोल तपास करीत आहेत.

## बहुचर्चित अतुल पुरी

राहुल पुरी याने मृतकच्या वागणुकी व त्रासाला कंटाळून आरोपी प्रशांत वऱ्हाडे याच्या मार्फत अक्षय शिंपीला ५ लाख रुपयांची सुपारी दिली होती. त्यानंतर अक्षय शिंपी याने साहिल मोहोळ व सक्षम लांडे यांना हाताशी धरून ही हत्या घडवून आणली, असा पोलिसांचा दावा होता. तसेच गौरव कांबे याचा ही यात सहभाग होता. सुमारे ११ महिने चाललेल्या सुनावणी नंतर न्यायालयाने सर्व पुरावे आणि साक्षीदारांचे जबाब तपासले. मात्र पुरावे अपुरे असल्याचे सांगत न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत आरोपी सक्षम लांडे आणि साहिल मोहोळ यांना जमानात नाकारण्यात आली. न्यायालयात सरकार पक्षाकडून ५९ साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही पक्षाचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले. ॲड.परवेज खान यांना ॲड.अनिल जयस्वाल, ॲड.वसीम शेख,ॲड.शहजाद शेख, ॲड.रियाज रूलानी, ॲड.अजहर नवाज, ॲड.अपूर्वा चव्हाण, ॲड.तेजस्विनी वानखडे, ॲड.सालेहा शेख यांनी सहकार्य केले. तसेच ॲड. प्रशांत देशपांडे यांना ॲड.मोहित जैन, ॲड.प्रथमेश तिवारी यांनी सहकार्य केले.

## बारावीच्या पुरवणी परीक्षेतील

पुरवणी परीक्षेत दोन विषयांत अपयश आल्यामुळे रितिका गेल्या काही दिवसांपासून मानसिक तणावात असल्याची माहिती समोर आली आहे. या नैराश्यातूनच तिने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणात कोणावरही संशय नसल्याचे तसेच कोणतीही तक्रार नसल्याचे तिचे नातेवाईक प्रल्हाद वासुदेवराव टिकेकर यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद केले आहे. त्यानुसार बडनेरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, २५ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# शासकीय योजनांचा लाभ मिळिवण्यासाठी सक्षम प्रकल्प आराखडा महत्त्वाचा – प्रकल्प संचालक अनिसा महाबळे

## बचत गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी प्रकल्प आराखडा तयार करण्याचे प्रशिक्षण उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्य शासनाच्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) २.० अंतर्गत महिला बचत गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांना कृषी व्यवसायाच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी तसेच शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळावा, या उद्देशाने सविस्तर प्रकल्प आराखडा (डीपीआर) तयार करण्याबाबत एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण केंद्र, वाशिम येथे उत्साहात पार पडला.



प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन प्रकल्प संचालक (आत्मा) अनिसा महाबळे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी महिला बचत गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी कृषीपूरक उद्योग, मूल्यवर्धन, कृषी यांत्रिकीकरण आणि सामूहिक उद्योजकतेच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधण्यासाठी दर्जेदार व व्यवहार्य प्रकल्प आराखडा तयार करणे आवश्यक असल्याचे सांगितले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळविण्यासाठी सक्षम व सुयोग्य प्रकल्प आराखडा हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रशिक्षणाचे प्रास्ताविक नोडल अधिकारी लक्ष्मण सावंत यांनी केले. त्यांनी प्रशिक्षणामागील उद्दिष्टे स्पष्ट करताना बचत गट व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी योग्य नियोजनासह प्रकल्प तयार करून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. सनदी लेखापाल मारोती भोयार यांनी सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्याची प्रक्रिया, आर्थिक व्यवहार्यता, बँक कर्जासाठी आवश्यक निकष, वित्तीय नियोजन तसेच कर्ज प्रस्ताव तयार करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.

जिल्हा विकास व्यवस्थापक (नाबार्ड) शंकर कोकडवार यांनी कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेअंतर्गत उपलब्ध कर्ज, अनुदान आणि व्याज सवलतींची माहिती देत या योजनेचा लाभ घेण्याबाबत मार्गदर्शन केले.

अक्षय वैराळे यांनी कृषी औजार बँक उभारणीसाठी आवश्यक तांत्रिक बाबी, यंत्रसामग्रीची निवड, व्यवस्थापन व कार्यपद्धती याविषयी माहिती दिली. तसेच पोकरा प्रकल्पातील प्रापण तज्ज्ञांनी शासकीय प्रापण प्रक्रियेतील नियम, कार्यपद्धती आणि आवश्यक कागदपत्रांची माहिती दिली. प्रकल्प विशेषज्ञ (कृषी व्यवसाय) सोहम बेलोकर यांनी सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्याची पद्धत, ऑनलाईन अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, प्रकल्प मंजुरीची कार्यपद्धती तसेच प्रस्ताव सादर करताना घ्यावयाची काळजी याबाबत सखोल मार्गदर्शन केले. सहभागी प्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

या प्रशिक्षणास जिल्ह्यातील विविध महिला बचत गटांचे प्रतिनिधी, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे पदाधिकारी तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशिक्षणामुळे सहभागी प्रतिनिधींना प्रकल्प आराखडा तयार करणे, आर्थिक नियोजन, बँक कर्ज, कृषी पायाभूत सुविधा निधी, कृषी औजार बँक तसेच प्रापण प्रक्रिया याविषयी उपयुक्त व व्यवहार्य मार्गदर्शन मिळाले. प्रशिक्षण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकल्प विशेषज्ञ (मनुष्यबळ विकास) प्रदीप पवार, राजेश कोकाट आणि रुपेश सरकटे यांनी विशेष सहकार्य केले.

# आर्या प्रकल्पातून ग्रामीण युवकांना परसबागेतील कुक्कुटपालनाची नवी दिशा

## कृषी विज्ञान केंद्र, वाशिमच्या प्रशिक्षणातून दरमहा २५ ते ३० हजार रुपयांपर्यंत उत्पन्नाची संधी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद (घ्र्ीं) यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्र, वाशिममार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्या (ँ) प्रकल्पांतर्गत ग्रामीण युवकांना परसबागेतील कुक्कुटपालनाचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके देण्यात येत आहेत. या प्रशिक्षणातून अनेक युवकांनी कुक्कुटपालन व्यवसाय सुरू करून नियमित उत्पन्न मिळविण्यास सुरुवात केली आहे.



प्रशिक्षणात कुक्कुटपालन व्यवस्थापन, संतुलित आहार, लसीकरण, जैवसुरक्षा, अंडी उत्पादन व विपणन याबाबत शास्त्रीय मार्गदर्शन करण्यात आले. सुमारे १०० अंडी देणाऱ्या कोंबड्यांपासून दरमहा १,५०० अंडी उत्पादन होत असून, त्यातून अंदाजे २५ ते ३० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळत असल्याची माहिती देण्यात आली. दि. २१ जुलै रोजी कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे आणि पशुविज्ञान तज्ज्ञ मयुर देशमुख यांनी कुऱ्हा, सवड, जामखेड व सावरगाव बर्डे येथे भेट देऊन प्रकल्पाची पाहणी केली. त्यांनी आरोग्य व्यवस्थापन, पोषण, जैवसुरक्षा, लसीकरण व अंडी उत्पादन वाढविण्याबाबत मार्गदर्शन केले. डॉ. काळे यांनी कृषीपूरक उद्योग ग्रामीण युवकांसाठी स्वावलंबनाचा प्रभावी मार्ग असल्याचे सांगत, इच्छुकांनी आर्या प्रकल्पांतर्गत उपलब्ध प्रशिक्षण व तांत्रिक सहाय्याचा लाभ घ्यावा.

# वनसंवर्धन दिनानिमित्त वृक्षारोपण



■ प्रतिनिधी | वाशिम ■


प्रदूषणामुळे पर्यावरणासमोरील आव्हाने दिवसेंदिवस गंभीर होत असून पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची नितांत आवश्यकता आहे. समाजामध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने २३ जुलै रोजी वनसंवर्धन दिनाचे औचित्य साधून स्थानिक एस.एम.सी. इंग्लिश स्कूल वाशीमच्या राष्ट्रीय हरित सेना व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्या मीना उबगडे, अभिजीत मुकुंदराव जोशी, अशोक पऱ्हाड तसेच सहायक वनसंरक्षक पदमाकर मोगरे ,वनपरिक्षेत्र अधिकारी अंशुल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रीय हरित सेनेच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

# दमदार पावसाने अकोट तालुक्याला दिलासा; पिकांना नवसंजीवनी, शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित

■ प्रतिनिधी | अकोट ■

गेल्या बारा ते तेरा दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने अकोट तालुक्यातील खरीप पिके करपण्याच्या उंबरठ्यावर पोहोचली होती. दुबार पेरणीचे संकट ओढवते की काय, या चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना अखेर गेल्या दोन दिवसांत झालेल्या दमदार पावसाने मोठा दिलासा दिला आहे. या पावसामुळे शेतातील पिकांना नवसंजीवनी मिळाली असून चिंतातुर झालेल्या बळीराजाच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा समाधानाचे हास्य फुलले आहे.

यंदा वेळेत पेरण्या पूर्ण झाल्यानंतर दमदार पावसाची शेतकरी आतुरतेने वाट पाहत होते. मात्र सलग अनेक दिवस पाऊस न झाल्याने सोयाबीन, तूर, कापूस आदी पिकांवर ताण निर्माण झाला होता. अनेक ठिकाणी पिके सुकण्याच्या मार्गावर



पोहोचल्याने दुबार पेरणीची भीती शेतकऱ्यांना सतावत होती. अशा परिस्थितीत झालेल्या पावसामुळे पिकांना आवश्यक ओलावा मिळाला असून शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

'गेल्या दोन दिवसांच्या पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. पावसाअभावी थांबलेली शेतीची सर्व कामे आता पुन्हा वेगाने सुरू होतील. या पावसामुळे सर्व शेतकरी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.'

**प्रमोद सोनोने** (शेतकरी, अडगाव खुर्द)

'पेरणीनंतर सलग दहा-बारा दिवस पाऊस न झाल्याने पिके सुकत होती आणि दुबार पेरणीचे संकट उभे राहिले होते. मात्र वरुणराजाच्या दमदार हजेरीमुळे पिकांना नवजीवन मिळाले असून आता चांगल्या उत्पादनाची आशा निर्माण झाली आहे.'

**सचिन नागापुरे** (शेतकरी, अकोट)

अकोट तालुक्यातील मोठा भूभाग हा कोरडवाहू आणि खारपाणपट्ट्यात मोडतो. या भागातील शेती पूर्णतः पावसावर अवलंबून असल्याने पावसाचा प्रत्येक दिवस शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरतो. गेल्या दोन दिवसांत झालेल्या पावसामुळे शेतांमध्ये पुन्हा चैतन्य निर्माण झाले असून पिकांची वाढ सुधारण्यास मदत होणार असल्याचे कृषी क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. पावसामुळे शेतातील निंदणी, खुरपणी, खतांची मात्रा देणे आदी कृषी कामांनाही वेग येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागात मजुरांनाही रोजगार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. शेती हा तालुक्याचा प्रमुख आर्थिक आधार असल्याने कृषी कामे सुरळीत झाल्यास बाजारपेठेतील आर्थिक व्यवहारांनाही चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, गेल्या आठवडाभरापासून उकाड्याने नागरिक त्रस्त झाले होते. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने नागरिकांनाही उष्णतेपासून दिलासा मिळाला आहे.

# रानडुकराच्या हल्ल्यात चिमुकली पूर्वा गंभीर जखमी

## गरीब मजूर कुटुंबावर ओढावले संकट

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मालेगाव तालुक्यातील जऊळका रेल्वे येथे गुरुवारी (दि. २३) सकाळच्या सुमारास ५ ते ६ रानडुकरांनी गावात शिरून धुमाकूळ घातल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. या घटनेत अवघ्या साडेचार वर्षांच्या पूर्वा राम सावळे या चिमुकलीवर रानडुकराने जीवघेणा हल्ला केल्याने ती गंभीर जखमी झाली. सुदैवाने ग्रामस्थांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, रानडुकरांचा कळप गावात शिरल्यानंतर नागरिकांनी त्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. या गोंधळात पूर्वा आपल्या घरासमोर उभी असताना एका रानडुकराने अचानक तिच्यावर झडप घालत हल्ला केला. या हल्ल्यात तिच्या मांडीला खोल जखम झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. तिच्या आरडाओरडीनंतर ग्रामस्थांनी धाव



घेत रानडुकराला पिटाळून लावले आणि चिमुकलीचा जीव वाचवला.

जखमी पूर्वाला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तिच्यावर उपचार सुरू केले असून तिची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे. पूर्वा ही अत्यंत गरीब कुटुंबातील मुलगी आहे. तिचे आई-वडील रोजंदारीवर मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अशा परिस्थितीत मुलीवर उपचाराचा अतिरिक्त आर्थिक भार या कुटुंबावर कोसळला आहे. त्यामुळे गावातील नागरिकांनी शासन आणि प्रशासनाने या कुटुंबाला तातडीची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून परिसरात रानडुकरांचा वावर वाढला असून ते वारंवार गावात शिरून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करत आहेत. यापूर्वीही शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र आता थेट गावात घुसून लहान मुलांवर हल्ले होऊ लागल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेनंतर वनविभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून रानडुकरांचा बंदोबस्त करावा.

गावात पिंजरे लावावेत तसेच नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तसेच जखमी चिमुकली पूर्वाच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनाने उचलून तिच्या कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी.

# वेदांत पब्लिक स्कूल पोहा येथे विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | कारंजा ■

वेदांत पब्लिक स्कूल, पोहा येथे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये, नेतृत्वगुण आणि जबाबदारीची भावना विकसित करण्याच्या उद्देशाने विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. या निवडणुकीत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत लोकशाही प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या निवडणुकीत एकूण आठ उमेदवार रिंगणात होते. इयत्ता तिसरी ते दहावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने मतदान करून आपला लोकशाही हक्क बजावला. मतदान प्रक्रिया अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. मतमोजणीनंतर हेड बॉय म्हणून सोहम सुपलकर, हेड गर्ल म्हणून निशिका गोपालधोंडे, इव्हेंट डिपार्टमेंट प्रतिनिधी म्हणून भक्ती शेकोकार आणि ॲक्टिव्हिटी डिपार्टमेंट प्रतिनिधी म्हणून किमया मारुती मावळे यांची निवड जाहीर करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रिया, नेतृत्व, जबाबदारी आणि लोकशाही मूल्यांचे महत्त्व प्रत्यक्ष अनुभवता आले. निवडून आलेल्या सर्व विद्यार्थी प्रतिनिधींचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.


Dnyanganga Shikshan Prasark Sanstha Wanoja

**Smt. Salunkabai Raut Arts and Commerce College Wanoja**

Ta. Mangrulpir Dist. Washim (M.S.)444402

**By NAAC "B+" Grade CGPA 2.53**

**Sant Gadge Baba Amravati University Amravati**

Ref. No. SGBAU/8/C-1625/2026 Date 17/07/2026

**WANTED**

**PG NON-GRANT COURSE**
**For the session 2026-27**

Applications are invited for Lecturer on Contract Basis Vacancies for PG Non-Grant course /Programmes

| Sr. No. | Subject/Course | Qulification | Total No. of Contributory Post |
|---|---|---|---|
| 01. | M.A.Marathi | M.A. Marathi B+, SET/NET/Ph.D. | 04 |
| 02. | M.A. Political Science | M.A. Political Science B+, SET/NET/Ph.D. | 04 |
| 03. | M.Com | M.Com B+, SET/NET/Ph.D. | 04 |
| 04. | Clerk. | Gradute, MS-CIT, Typing | 01 |
| 05. | Peon | HSC | 01 |

The candidates are required to be present with all relative original documents on dt. 03/08/2026 at. 11.30 a.m. For the interview. T.A. & D.A. Will be not paid to the candidates.

**President/Secretary**
Dnyanganga Shikshan Prasark Sanstha,
Wanoja Ta. Mangrulpir Dist. Washim

**Principal**
Smt. Salunkabai Raut Arts and
Commerce College Wanoja
Ta. Mangrulpir Dist. Washim



Dnyanganga Shikshan Prasark Sanstha Wanoja

**Smt. Salunkabai Raut Arts and Commerce College Wanoja**

Ta. Mangrulpir Dist. Washim (M.S.)444402

**By NAAC "B+" Grade CGPA 2.53**

**Sant Gadge Baba Amravati University Amravati**

Ref. No. SGBAU/8/C-1625/2026 Date 17/07/2026

**WANTED**

For the session 2026-27

Applications are invited for appointments of candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under:-

**Vacancies for Grant-in-aid Courses/Programmes**

(As Per Regulation No.2/2020, and its para-11,G.R.Dated 17/10/2022)

| Sr. No. | Subject/Course | Total No. of Contributory Post |
|---|---|---|
| 01. | English | 02 |
| 02. | History | 02 |
| 03. | Economics | 02 |
| 04. | Commerce | 02 |

**Eliogibility:-** Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation 2018 (University Direction No. 08/2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No संकीर्ण- 2018/(185/18) मशि-३,dt. 14-11-2018. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

The candidates are required to be present with all relative original documents on dt. 03/08/2026 at. 11.30 a.m. For the interview. T.A. & D.A. Will be not paid to the candidates.

**President/Secretary**
Dnyanganga Shikshan Prasark Sanstha,
Wanoja Ta. Mangrulpir Dist. Washim

**Principal**
Smt. Salunkabai Raut Arts and
Commerce College Wanoja
Ta. Mangrulpir Dist. Washim


# १०८ रक्तदात्यांचे रक्तदान, हजारो नागरिकांना विविध सेवा शिबिरांचा लाभ

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा ऐतिहासिक महाउपक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

'राजकारणापेक्षा समाजकारण श्रेष्ठ' या विचाराला कृतीची जोड देत महाराष्ट्राचे लोकप्रिय, विकासाभिमुख नेतृत्वाचे प्रतीक तथा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी, वाशीम शहराच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य समाजसेवा अभियानाने वाशीम शहरात जनसेवेचा नवा इतिहास घडविला. भाजपा शहराध्यक्ष मनीष मंत्री यांच्या नियोजनबद्ध नेतृत्वाखाली, युवा मोर्चा शहराध्यक्ष स्वप्निल जाधव, विविध मोर्च्यांचे पदाधिकारी आणि सर्व शिबिरांच्या संयोजकांच्या अथक परिश्रमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांना नागरिकांनी अभूतपूर्व प्रतिसाद देत कौतुकाचा वर्षाव केला.





रक्तदान शिबिर, निःशुल्क आरोग्य सेवा शिबिर, प्रशासकीय सेवा शिबिर, फुल बॉडी स्कॅन व बीएमआय तपासणी, आयुष्मान भारत सेवा केंद्र तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जनहितकारी कार्यावर आधारित प्रेरणादायी प्रदर्शनी अशा विविध उपक्रमांमुळे विठ्ठलवाडी भवन परिसर दिवसभर समाजसेवेच्या उत्सवाने भारावून गेला. कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, माजी आमदार विजयराव जाधव, नगराध्यक्ष अनिल केंदळे, गटनेते संतोष मुरकुटे, जिल्हा महामंत्री तथा नगरसेवक गणेश खंडाळकर, शहराध्यक्ष मनीष मंत्री, जिल्हा मोर्चाध्यक्ष रामेश्वर ठेंगडे, रामा इंगळे, ज्येष्ठ पदाधिकारी मिठूलाल शर्मा, भीमसेठ जीवनानी, बापू ठाकूर, उत्तम पोटफोडे, प्रभाकर पद्मने, मारशेट्टीवार काका तसेच जिल्हा व शहरातील विविध मोर्च्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. कार्यक्रमाची सांगता आमदार श्याम खोडे, अशोक हेडा आणि सुरेश मापारी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. या सेवा अभियानातील रक्तदान शिबिरात तब्बल १०८ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना समाजसेवेच्या माध्यमातून अनोख्या शुभेच्छा अर्पण केल्या. जिल्हा शल्य चिकित्सक जिल्हा शासकीय रुग्णालय च्या वतीने रक्त संकलन करण्यात आले. रक्त दातांना आमदार खोडे यांच्या कडून प्रोत्साहन पर मोमेंटो व प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीचे सन्मानपत्र देण्यात आले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३८ ■ शनिवार, २५ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आरोग्य शिबिरात पालकमंत्र्यांनी केली रक्तदाब व डोळ्यांची तपासणी

### शिबिरात नागरिकांची उसळली गर्दी, तिनही दिवस लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

**वर्धा जनमाध्यम :** आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत वर्धा येथे आयोजित महाआरोग्य शिबिरास वर्धा व सेलू तालुक्यातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी तिनही दिवस या शिबिराला भेट देऊन नागरिकांना चांगल्या सुविधा मिळत असल्याची खात्री केली. आज त्यांनी स्वत: रक्तदाब व डोळ्यांची तपासणी केली तसेच शिबिरात आलेल्या नागरिकांशी संवाद साधला.

यावेळी माजी खासदार रामदास तडस व आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्र्यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात आरोग्य अमृत महोत्सव राबविण्यात येत आहे. या महोत्सवांतर्गत जिल्ह्यात वर्धा, तळेगाव, हिंगणघाट व देवळी येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. त्यातील पहिले शिबिर दि.२२ ते २४ जुलै दरम्यान बच्छराज धर्मशाळा येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरात



पहिल्या दिवसापासून नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला.

रुग्ण तपासणीसाठी शिबिरात एकून २२ दालने लावण्यात आली होती. या दालनांमधून ज्येष्ठ नागरिकांची तपासणी, हृदयरोग तपासणी, ईसीजी, स्त्रीरोग, दंतरोग, अस्थिरोग, कर्करोग, त्वचारोग, कान-नाक-घसा, नेत्ररोग तसेच संसर्गजन्य रोगांची तपासणी करण्यात आली. याशिवाय रक्त तपासणी, मानसिक आरोग्य सल्ला, औषध वितरण, मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत दि.२२ जुलै रोजी उद्घाटन झाल्यानंतर त्यांनी शिबिराच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीही व्यक्तीश: शिबिरांना वेळोवेळी भेट देऊन तेथे येणाऱ्या नागरिकांची आरोग्य तपासणी, वेगवेगळ्या प्रकारच्या निदान चाचण्या, औषधे वितरणाचा आढावा घेतला. तसेच आलेल्या नागरिकांशी संवाद साधला. काही गंभीर, दुर्धर आजाराच्या रुग्णांशी संवाद साधून त्यांच्या पुढील उपचाराकरीता नियोजन करण्याचे निर्देश आरोग्य विभागास दिले.

#### पुढील शिबिर तळेगाव येथे ८ व ९ ऑगस्टला शिबिर

आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत पुढील महाआरोग्य शिबिर आष्टी तालुक्यातील तळेगाव (शा.) येथे आयोजित करण्यात आले आहे. दिनांक ८ व ९ ऑगस्ट असे दोन दिवस शिबिर पार पडणार आहे. आर्वी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले आहे.

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आयोजित 'संवादवारी' ज्ञानेश्वरी विशेष दालनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन



**पंढरपूर जनमाध्यम :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने आयोजित 'संवादवारी' ज्ञानेश्वरी विशेष दालनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या ठिकाणी आयोजित या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, उत्तमराव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड आदी उपस्थित होते.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचविण्यासाठी हे विशेष दालन उभारण्यात आले आहे. 'संवादवारी' या उपक्रमातून शासन-जनता संवाद अधिक प्रभावी करण्याचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण, कौशल्य विकास व गुंतवणूक, महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, नवीन शैक्षणिक धोरण २०२०, कृषी विभागाचे डिजिटल उपक्रम, जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, महात्मा फुले जनआरोग्य योजना, कामगार कल्याण योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, मागेल त्याला शेततळे, लेक लाडकी योजना, पीएम यशस्वी शिष्यवृत्ती योजना, आश्रम शाळा सुविधा, हरित ऊर्जा, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र गृहनिर्माण योजना, दिव्यांग धोरण, शाश्वत जलसंपदा व्यवस्थापन व विकास, आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र रोजगार हमी योजना आदी योजनांबाबत आकर्षक एलईडी चित्ररथ, पथनाट्य व प्रदर्शनाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

## भर पावसात काळ्या गणवेशात आयटकचा महानिषेध मोर्चा

### दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कथित लाठीहल्ल्याचा निषेध

**वर्धा जनमाध्यम :** दिल्ली येथे न्याय्य मागण्यांसाठी शांततामय आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ आयटकसह विविध पुरोगामी, सामाजिक, कामगार, शेतकरी, विद्यार्थी व युवक संघटनांच्या वतीने शुक्रवारी (२४ जुलै) वर्ध्यात भर पावसात काळ्या गणवेशात महानिषेध मोर्चा काढण्यात आला. शिवाजी चौकातून सुरू झालेल्या या मोर्चाचे नेतृत्व आयटकचे राज्य सचिव दिलीप उटाणे यांनी केले.

मोर्चेकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी जोरदार घोषणाबाजी करत दिल्लीतील घटनेचा तीव्र निषेध नोंदविला. लोकशाही व्यवस्थेत विद्यार्थ्यांना शांततापूर्ण आंदोलन करण्याचा आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार असून, त्यांच्या प्रश्नांवर संवादाऐवजी बळाचा वापर करणे ही लोकशाही मूल्यांना धक्का देणारी बाब असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

यानंतर राष्ट्रपतींच्या नावे जिल्हाधिकारी, वर्धा यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात दिल्लीतील लाठीहल्ल्याची निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करावी, दोषी अधिकारी व संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांचे संरक्षण करावे, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा,



अशी मागणी करण्यात आली. यावेळी दिलीप उटाणे, अनुराधा उटाणे, गजेंद्र सुरकार, माधुरी मोकडे, विजया पावडे, मैना उईके, अल्का भानसे, नंदकिशोर मून व महिला काँग्रेसच्या हेमलता मेघे यांनी मनोगत व्यक्त केले. मोर्चात मोठ्या संख्येने महिला व विविध संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले होते. भर पावसातही आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांना न्याय मिळावा आणि लोकशाही हक्कांचे संरक्षण व्हावे, अशी ठाम भूमिका मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले.

## लोखंडी सळाखीने हल्ला; आरोपीला १ वर्ष सश्रम कारावास

**वर्धा जनमाध्यम :** देवळी पोलिस ठाण्यात २०१९ मध्ये दाखल झालेल्या मारहाणीच्या प्रकरणात वर्धा येथील प्रथम श्रेणी न्यायिक दंडाधिकारी न्यायालय क्रमांक २ यांनी आरोपी किसना रामाजी पारीसे (वय ५२, रा. खर्डा, ता. देवळी) याला दोषी ठरवत एक वर्ष सश्रम कारावास आणि १० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली.



प्रकरणानुसार, फिर्यादी आपल्या पुतणसुनेकडे चौकशीसाठी गेली असता आरोपीने तिच्याशी वाद घालत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर लोखंडी सळाखीने डोक्यावर वार करून तिला जखमी केले. फिर्यादीच्या तक्रारीवरून व वैद्यकीय अहवालाच्या आधारे देवळी पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ अन्वये गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याचा तपास तत्कालीन सहाय्यक फौजदार ज्ञानेश्वर वर्धापुरकर यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता दीक्षा कोठारी यांनी प्रभावी बाजू मांडली. पैरवी अंमलदार प्रविण बोबडे यांनी साक्षीदारांना न्यायालयात हजर करून महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच तत्कालीन ठाणेदार संदीप कापडे यांनीही साक्षीदारांना मार्गदर्शन केले. सर्व पुरावे आणि साक्षींचा विचार करून न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत एक वर्ष सश्रम कारावास व १० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. हा निकाल प्रभावी तपास आणि सक्षम न्यायालयीन कामकाजाचे फलित मानला जात आहे.

## चिमुकल्यांच्या जीवाशी खेळ, तारासावंगा शाळा आणि अंगणवाडी घाणीच्या विळख्यात

### नाल्याचे सांडपाणी थेट प्रवेशद्वारासमोर चिखलातून विद्यार्थ्यांची रोजची कसरत ग्रामपंचायतीच्या निष्क्रिय कारभारावर संताप

**आष्टी शहीद जनमाध्यम** तालुक्यातील तारासावंगा ग्रामपंचायतीच्या हद्दीत स्वच्छतेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. बसस्थानक परिसरातील जिल्हा परिषद शाळा आणि दोन अंगणवाडी केंद्रांच्या प्रवेशद्वारासमोर नाल्याचे घाण पाणी साचल्याने संपूर्ण परिसर चिखल आणि दुर्गंधीच्या विळख्यात अडकला आहे. यामुळे शाळकरी विद्यार्थी आणि अंगणवाडीतील चिमुकल्यांना दररोज जीव मुठीत धरून चिखलातून मार्ग काढावा लागत आहे. पावसाळ्यात ही समस्या अधिकच गंभीर बनली असून साचलेल्या घाण पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि बालकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



शिक्षणाच्या मंदिरासमोरच घाणीचे साम्राज्य पसरल्याने ग्रामपंचायत प्रशासनाच्या कारभारावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. हा परिसर गावातील सर्वाधिक वर्दळीचा असून येथे आठवडी बाजारही भरतो. त्यामुळे दररोज शेकडो नागरिकांची ये जा सुरू असते. परिसरात मुरूम टाकून चिखलाची समस्या दूर करण्यासाठी अंगणवाडी सेविकांनी वारंवार ग्रामपंचायतीकडे तक्रारी केल्या. मात्र प्रशासनाने त्याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

शाळा आणि अंगणवाडी परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवणे ही ग्रामपंचायतीची मूलभूत जबाबदारी असताना निष्क्रियतेमुळे चिमुकल्यांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून नाल्याचे पाणी हटवावे, चिखलावर मुरूम टाकावा आणि परिसराची कायमस्वरूपी स्वच्छता करावी अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## कर्जमाफी अन् वीजबिल माफीचा ऐतिहासिक निर्णय; ५६ लाख शेतकऱ्यांना मोठा दिलासा

### राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम - पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

**वर्धा जनमाध्यम :** राज्य सरकारने राबविलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने' आणि वीज बिल माफीच्या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, आजपर्यंतच्या इतिहासात एवढी सुटसुटीत कर्जमाफी कधीच झाली नव्हती, असा दावा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केला.

स्थानिक भाजप कार्यालयात शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार रामदास तडस, जिल्हाध्यक्ष संजय गाते, आमदार राजेश बकाने, माजी खासदार सुरेश वाघमारे, महामंत्री कमलाकर निंभोरकर आणि अशोक कलोडे उपस्थित होते.

डॉ. भोयर म्हणाले की, राष्ट्रीयकृत, व्यापारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडील माहितीच्या आधारे पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता. मात्र, नव्या योजनेत अशा शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. तसेच, पूर्वीच्या योजनेतील ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर लाभाची अट आणि नियमित कर्जफेडीची अटही रद्द करण्यात आली आहे.

वीजबिल माफीबाबत त्यांनी सांगितले की, ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपधारकांची जुनी वीज थकबाकी पूर्णपणे माफ करण्यात आली आहे. सौर कृषीवाहिनी योजनेमुळे सध्या ७६



टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होत असून, वर्षाअखेरीस हा लाभ शंभर टक्के शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे. महावितरणवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी सरकारने यापूर्वीही मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत दिली असून, आता थकबाकीची जबाबदारीही शासनाने स्वीकारली आहे.

याशिवाय राज्य सरकार कापूस, सोयाबीन आणि कांदा खरेदी, ठिबक सिंचन अनुदान, नदीजोड प्रकल्प आणि जलसिंचन योजनांवर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. राज्यात दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपये कृषी क्षेत्रावर खर्च करण्यात येत असून, या योजनांमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होईल. भविष्यात महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी जलसंपदा विकास आणि नदीजोड प्रकल्प युद्धपातळीवर राबविले जात असून, शेतीला कायमस्वरूपी बळ देण्याचा सरकारचा निर्धार असल्याचे डॉ. पंकज भोयर यांनी स्पष्ट केले.

## सत्ता आहे... पण सेलू बसस्थानक बेवारस

### गळक्या छताखाली प्रवासी, बाहेरून धावणाऱ्या बस

#### परिवहन विभागाचा कारभार रामभरोसे

**सेलू जनमाध्यम :** सेलूतील नव्याने उभारलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकाची अक्षरशः दुरवस्था झाली असून, पावसाळ्यात प्रवाशांच्या डोक्यावर छताऐवजी थेट पावसाचे पाणी कोसळत आहे. कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेले बसस्थानक आज गळक्या छतामुळे आणि प्रशासनाच्या बेफिकीरीमुळे प्रवाशांच्या संतापाचे केंद्र बनले आहे. एकीकडे सेलूत सत्ताधारी भाजपच्या पदाधिकाऱ्यांचे वर्चस्व असल्याचे सांगितले जाते, मात्र दुसरीकडे सामान्य प्रवाशांच्या मूलभूत सुविधांकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

पाऊस सुरू झाला की बसस्थानकात उभ्या असलेल्या प्रवाशांना आसऱ्याऐवजी छत्रीचा आधार घ्यावा लागतो. एवढ्यावरच ही शोकांतिका थांबत नाही. बसस्थानकाच्या प्रवेशमार्गातील त्रुटींमुळे अनेक बसेस स्थानकात न येताच बाहेरूनच पुढे निघून जात आहेत. त्यामुळे बसची वाट



पाहणाऱ्या प्रवाशांमध्ये गोंधळ, आरडाओरडा आणि संतापाचे वातावरण निर्माण होत आहे.

विशेष म्हणजे नागपूरहून रात्री सेलूकडे येणाऱ्या नियमित बसेसना अधिकृत थांबा असतानाही त्या बसस्थानकात न थांबवता पुढे नेल्या जात असल्याचा गंभीर आरोप प्रवाशांनी केला आहे. रात्री नोकरी, व्यवसाय किंवा इतर कामे आटोपून परतणाऱ्या नागरिकांना बसमध्ये चढण्याची संधीही मिळत नसल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदारांचे मोठे हाल होत आहेत.

बसस्थानकाची गळती, अनियमित बसथांबे आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे राज्य परिवहन महामंडळाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सेलूकरांनी तातडीने बसस्थानकाची दुरुस्ती, सर्व बसेसना स्थानकात थांबविण्याचे आदेश आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेची हमी देण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला असून, सत्ता असूनही प्रवाशांना न्याय मिळत नसेल तर ही लोकप्रतिनिधी आणि प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे अशी प्रतिक्रिया तालुक्यात उमटत आहे.

## आज वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघाचा सन्मान सोहळा

### वृत्तपत्र विक्रेत्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती; ज्येष्ठ पेपरविक्रेत्यांचा होणार सन्मान

**वर्धा जनमाध्यम :** पहाटेपासून घराघरांत वर्तमानपत्र पोहोचवून समाजाला माहितीचा प्रकाश देणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या कष्टाला सलाम करत वर्धा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी संघाच्या वतीने रविवार, २६ जुलै रोजी दुपारी १२ वाजता संत गाडगे बाबा सभागृह, कृष्णनगर येथे शिष्यवृत्ती वितरण व ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेत्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धा नगर परिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ राहणार आहेत. तर वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे आणि जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

यावेळी पत्रकार संजय तिगावकर, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर, उत्तर महाराष्ट्र विभागाचे उपाध्यक्ष रविंद्र कुळकर्णी, वर्धा जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पारीसे तसेच सचिव बंडू मुळे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कष्टकरी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याबरोबरच आयुष्यभर समाजसेवा करणाऱ्या ज्येष्ठ विक्रेत्यांच्या योगदानाचा गौरव करण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे. संघाचे कोषाध्यक्ष अजय डोंगरे, सचिव गजानन मसने, उपाध्यक्ष सुधीर मुंजेवार तसेच सर्व पदाधिकारी व सदस्यांनी वृत्तपत्र विक्रेते, त्यांचे कुटुंबीय आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. हा सोहळा वृत्तपत्र विक्रेत्यांच्या संघर्षमय जीवनाला मानाचा मुजरा ठरणार आहे.

## हिंगणघाटच्या १७५ वर्षे जुन्या शाळेची इमारत पाडण्यास सुरुवात

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील ऐतिहासिक 'ओल्ड टाऊन स्कूल' या जवळपास १७५ वर्षे जुन्या शाळेची जीर्ण झालेली इमारत पाडण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या ठिकाणी नवीन शाळेची इमारत उभारण्यात येणार असल्याची माहिती नगर परिषदेकडून देण्यात आली.

हिंगणघाटमध्ये जिल्ह्यातील पहिली शाळा सन १८५१ मध्ये स्थापन झाली होती. त्यानंतर १८६१ मध्ये हिंगणघाट



संग्रहित

तालुक्याची निर्मिती झाली. तत्कालीन तहसीलदारांनी या शाळेची जपणूक करून तिला 'ओल्ड टाऊन स्कूल' अर्थात जुनी वस्ती शाळा असे नाव दिले.

१८६७ मध्ये नगर परिषदेची स्थापना झाल्यानंतर शाळेला स्वतंत्र इमारत नसल्याने सेठ रेखचंद मोहता यांनी शाळेची दगडी इमारत बांधून ती नगर परिषदेच्या स्वाधीन केली. पुढे १९२२ मध्ये नगर परिषदेकडून शाळेसाठी जागा खरेदी करण्यात आली. त्यानंतर गरजेनुसार वेळोवेळी बांधकाम करून शाळेचा विस्तार करण्यात आला.

मात्र, इमारत जीर्ण झाल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ती पाडून त्याठिकाणी नवीन इमारत उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे शहराच्या शैक्षणिक इतिहासाची साक्ष असलेली ही जुनी वास्तू आता इतिहासजमा होणार असून, तिच्या जागी आधुनिक सुविधांनी सुसज्ज नवीन शाळेची इमारत उभारली जाणार आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आंदोलनादरम्यान विद्यार्थिनीशी गैरवर्तनाचा आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईतील विद्यार्थी आंदोलनादरम्यान एका महिला आंदोलकासोबत गैरवर्तन झाल्याचा आरोप करणारा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता मुंबई पोलिसांनी अधिकृत स्पष्टीकरण दिले आहे.मुंबई पोलिसांनी आपल्या स्पष्टीकरणात म्हटले आहे की, संबंधित पोलिस कर्मचारी एका पुरु ष आंदोलकाला ताब्यात घेत असताना दुस-या दिशेला पाहत होता. त्याचवेळी एक महिला आंदोलक नकळत त्याच्या मार्गात आली, त्यामुळे व्हीडीओतील दृश्याचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. तसेच, कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचण्यापूर्वी तथ्यांची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे नमूद करत, वरिष्ठ अधिका-यांनी संपूर्ण घटनेची खात्री केली असून सोशल मीडियावरील दाव्यांप्रमाणे घटना नसल्याचा दावा मुंबई पोलिसांनी केला आहे. दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाचे पडसाद सध्या महाराष्ट्रातही उमटत आहेत.

मुंबईतही विद्यार्थ्यांकडून ठिकठिकाणी निदर्शने केली जात आहेत. या आंदोलनांना पांगवताना पोलिसांकडून बळाचा वापर होत असल्याचे व्हीडीओ याआधीही समोर आले आहेत. मात्र, दादर येथील एका आंदोलनाचा नवा व्हीडीओ सध्या सोशल मीडियावर



पसरत आहे. या व्हीडीओमध्ये एक साध्या वेशातला पोलिस कर्मचारी एका तरुण महिला आंदोलकाला विचित्र पद्धतीने खेचताना आणि धक्काबुक्की करताना दिसत आहे. असा आरोप विरोधी पक्षातील नेत्यांनी केला होता.

**हा नराधम कोण? थेट गजाआड करा : रोहित पवार**

या व्हायरल व्हीडीओची गंभीर दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) आमदार रोहित पवार यांनी एक्सवर तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला. त्यांनी लिहिले आहे की हा व्हीडीओ पाहून माझ्या डोक्याची तिडीक उठली आहे. स्वतःच्या मुलीच्या वयाच्या तरु णीसोबत इतके किळसवाणे कृत्य करणारा हा नराधम नेमका कोण आहे? जर हा खरोखर पोलिस असेल, तर त्याला केवळ निलंबित करू नका, तर पोलिस दलातून थेट बडतर्फ करा. त्याच्यावर तातडीने विनयभंगाचा गुन्हा दाखल करून त्याला गजाआड करा. महाराष्ट्र पोलिस दलाला एक मोठी आणि सन्मानजनक परंपरा लाभली असून असे अधिकारी या प्रतिष्ठेला लागलेली कीड आहेत, अशी टीकाही रोहित पवार यांनी केली आहे.

**वर्षा गायकवाड, जितेंद्र आव्हाडांचा सरकारवर हल्लाबोल**

मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड यांनीही हा व्हीडीओ शेअर करत पोलिसांच्या पद्धतीवर थेट सवाल उपस्थित केले. पोलिस अशा अमानुष आणि लज्जास्पद पद्धतीने कारवाई करू शकतात का? असा प्रश्न विचारत त्यांनी या पोलिसाच्या तात्काळ निलंबनाची मागणी केली. दुसरीकडे, आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही या प्रकारावर तीव्र संताप व्यक्तकेला आहे. पोलिसांचा हा अतिरेक आता सरकारच्या अंगाशी आल्याशिवाय राहणार नाही, यांना वेळीच आवरा असा इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला.

**कारवाईकडे लक्ष-** व्हीडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणाची चर्चा सुरू झाली आहे. विरोधकांनी केलेल्या आरोपांनंतर संबंधित घटनेची चौकशी होणार का आणि पोलिस प्रशासन याबाबत कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मग लाठीचार्ज करणा-या पोलिसांसह आदेश देणा-यांवर कारवाई का नाही?

**मुंबई/प्रतिनिधी :** नीट परीक्षेतील गोंधळ आणि पेपरफुटीच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतरमंतरवर आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या अमानुष लाठीचार्जवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.राज ठाकरे यांनी आपल्या पोस्टची सुरुवातच एका थेट प्रश्नाने केली आहे. जर शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारले तर त्यांच्यावर कारवाई होते. न्यायव्यवस्था सोडली तर विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा करण्याचा अधिकार कोणालाच नाही. मग दिल्लीत विद्यार्थ्यांना निर्दयीपणे मारहाण करणा-या पोलिसांवर आणि तसे आदेश देणा-यांवर कारवाई का होत नाही? हा न्याय पोलिसांना का लागू होत नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

**पोलिसांचा लाठीचार्ज सूड उगवल्यासारखा-**दिल्लीतील लाठीचार्जचे वर्णन करताना राज ठाकरे म्हणाले, हा लाठीचार्ज गर्दी पांगवण्यासाठी हलक्या स्वरूपात केला असता तर एकवेळ ठीक होते, पण समोर आलेले व्हीडीओ पाहता हा लाठीचार्ज कुठलातरी सूड उगवल्यासारखा केला जात आहे. फक्तआंदोलनकर्ते विद्यार्थीच नव्हे, तर आसपास असणा-यांनाही सर्रास तुडवले जात आहे. पोलिसांना असे निर्दयीपणे मारण्याचे आदेश आल्याशिवाय ते असे कृत्य



करूच शकत नाहीत. पण जी व्यवस्था त्यांना हे आदेश देते, त्यांना हा अधिकार कोणी दिला? ते संविधानापेक्षा मोठे आहेत का?

**आंदोलन विद्यार्थ्यांनी उभे केले, त्यांना मारण्याचे कारण काय?**

या आंदोलनाच्या मुळाकडे लक्ष वेधत राज ठाकरे म्हणाले की नीट परीक्षेत झालेल्या गोंधळाचा फटका लाखो विद्यार्थ्यांना बसला, त्या रागातून ही मुले रस्त्यावर उतरली. हे आंदोलन विद्यार्थ्यांनीच उभे केले आणि मोठे केले, मग त्यांना मारण्याचे कारण काय होते? आणि हा अधिकार पोलिसांना कोणी दिला?

**न्यायव्यवस्थेवर आणि सरन्यायाधीशांवर कडक टीका-**राज ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालय आणि सरन्यायाधीशांच्या भूमिकेवरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. पहिल्यांदा देशाचे सरन्यायाधीश या मुलांना झुरळ म्हणणार आणि मग हेच सर्वोच्च न्यायालय सांगणार की आम्हाला सध्या तरी हे मारहाणीचे व्हीडीओ बघायला वेळ नाही. हे अजब आहे. मग त्यांना नक्की कशासाठी वेळ आहे हाच प्रश्न आहे.

**पाश्चात्य देशांचा दाखला आणि संसदेत चर्चेची मागणी-**राज ठाकरे यांनी न ?र्वे, जर्मनी, स्वीडनसारख्या देशांचा दाखला देत म्हटले की तिथे अशा प्रकारे पोलिसी बळाचा वापर झाला तर त्याची कठोर चौकशी होते आणि तो रोख आदेश देणा-यांकडे असतो. हे आपल्याकडेही व्हायला हवे. त्यांनी स्पष्ट केले की, सध्याच्या सरकारकडून अपेक्षा उरल्या नसल्यानेच तरुणांना रस्त्यावर उतरावे लागत आहे. त्यामुळेयावर आता सिव्हिल सोसायटीने विचार आणि चर्चा करायला हवी. तसेच, सर्व खासदारांनी संसदेत यावर चर्चेचा आग्रह धरला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय कोणताही तोडगा मान्य नाही-अभिजीत

**नवी दिल्ली** : नीट पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून सुरू असलेल्या आंदोलनाबाबत काकरोच जनता पार्टी (सीजेपी)चे संस्थापक अभिजीत दिपके यांनी पुन्हा एकदा आपली भूमिका स्पष्ट केली आहे. केंद्र सरकारसोबत चर्चेची दुसरी फेरी सुरू होण्यापूर्वी




त्यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय कोणताही तोडगा मान्य नाही असे ठामपणे सांगितले.अभिजीत दिपके म्हणाले की सरकारला आंदोलनावर तोडगा काढायचा असेल तर धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावाच लागेल. आम्ही मागे हटणार नाही. राजीनाम्याशिवाय दुसरे काहीही मान्य नाही. दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी केंद्र सरकारकडून प्रमुख मागण्यांबाबत लेखी आश्वासन मिळाल्यानंतर गुरु वारी रात्री २६ दिवसांचे उपोषण मागे घेतले. मात्र, वांगचुक यांनी आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले तर काय कराल, असा प्रश्न दिपके यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी स्पष्ट नकार दिला. दिपके म्हणाले, हे आंदोलन आता केवळ माझे किंवा सोनम वांगचुक यांचे राहिलेले नाही. हे संपूर्ण देशातील तरु णांचे आंदोलन बनले आहे.त्यामुळेच देशभरात विविध ठिकाणी आंदोलनं सुरू आहेत. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याशिवाय कोणताही पर्याय स्वीकारला जाणार नाही. यापूर्वी केंद्र सरकारने चर्चेसाठी कोणत्याही वेळी तयार असल्याचे सांगितले होते. मात्र, चर्चेचे ठिकाण केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांचे निवासस्थान किंवा अन्य सरकारी निवासस्थान असावे, अशी अट घातली होती.

**सर्व मागण्या मान्य झाल्यावरच आंदोलन मागे-** यावर सीजेपीने आक्षेप घेत सरकारनेच आंदोलनस्थळ असलेल्या दिल्लीतील जंतरमंतर येथे यावे किंवा दोन्ही बाजूंना मान्य असे तटस्थ ठिकाण निवडावे, अशी भूमिका घेतली होती. नीट पेपरफुटीप्रकरणी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सीजेपीने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे नेतृत्व केले असून, मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू च राहणार असल्याचा पुनरु च्चार अभिजीत दिपके यांनी केला.

# पेपर फोडल्यास आता १० वर्षांची शिक्षा, १० कोटींचा दंड बसणार; मंत्रिमंडळाकडून नव्या विधेयकाला मंजुरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**नीट पेपरफुटी प्रकरणानंतर देशभरात विरोधाचा आगडोंब उसळला आहे. पेपरफुटीमुळे २० हून अधिक मुलांनी आत्महत्या केल्याच्या घटना विविध ठिकाणी घडल्या. या घटनांनंतर नव्याने स्थापन झालेल्या काक्रोच जनता पार्टीने जंतर-मंतरवर आंदोलनाची सुरु वात केली. पेपरफुटी थांबवणे ही शिक्षण मंत्र्यांची जबाबदारी होती. त्याबद्दल त्यांचा राजीनामा घेतला जावा, या मागणीसाठी तीव्र आंदोलन उभारले गेले. यानंतर केंद्र सरकारने आता मोठा निर्णय घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पावसाळी अधिवेशनाची सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच दिवशी पेपरफुटी प्रकरण गंभीर असल्याचे म्हटले होते. नीट प्रकरणात जे जे दोषी आहेत, त्यांना शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करणार असल्याची घोषणा त्यांनी केली होती. तसेच काल त्यांनी पेपरफुटी थांबविण्यासाठी नवीन कायदा करणार असल्याचे म्हटले होते.याप्रमाणे आज मंत्रिमंडळ बैठकीत पेपरफुटी विरोधी विधेयकाचा मसुदा मांडण्यात आला. या मसुद्याला मंत्रिमंडळाने पाठिंबा दिला असून लवकरच हे विधेयक संसदेत मंजुरीसाठी मांडले जाणार आहे. पंतप्रधान मोदींनी घोषणा केल्यानंतर काही तासांतच ही मंजुरी मिळाली आहे.

**अभिजीत दिपकेंचं सूचक विधान;**




जे.पी.नड्डांबरोबर १ तासाच्या चर्चेनंतर CJP नं आंदोलकांना का सांगितलं?

संसद भवनातील संकुलात पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेपरफुटीच्या गुन्ह्यात सहभागी असलेल्यांना विद्यमान कायद्यांपेक्षा अधिक कठोर शिक्षा देणा-या नव्या विधेयकाला मंजुरी देण्यात आली.

**नव्या तरतुदी काय आहेत?**

सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४ यामध्ये सरकारने सुधारणा करत सरकारने त्याला अधिक प्रभावी बनवले आहे. माध्यमात आलेल्या बातम्यांनुसार, पेपरफुटी प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे.पेपरफुटीच्या गुन्ह्यात सहभागी असलेल्यांना १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होउ शकते. सध्याच्या कायद्यानुसार, पेपरफुटी प्रकरणात दोषी आढळल्यास ३ ते ५ वर्षांचा कारावास आणि १० लाख रु पयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे.

हे सुधारित विधेयक सोमवारी (२७ जुलै) लोकसभेत मांडले जाण्याची शक्यता आहे.

**काँग्रेसची टीका-**दरम्यान नवे विधेयक आणून पेपरफुटीची प्रकरणे कशी थांबतील? अशी टीका काँग्रेसचे नेते पी. चिदंबरम यांनी केली आहे.पी. चिदंबरम आयएएनएस वृत्तसंस्थेशी बोलताना म्हणाले की, भारतीय दंड संहितेमध्ये आधीच अनेक तरतुदी असूनही मागच्या दहा वर्षांत १५० वेळा पेपरफुटीचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी त्यांच्या कार्यकाळात इतक्या वेळा पेपर का फुटले? याचे आधी उत्तर दिले पाहिजे.

# सौदीच्या राजकुमाराचा लंडनच्या हॉटेलमध्ये मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सौदीच्या २९ वर्षीय प्रिन्स अब्दुल्ला बिन फहद यांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी ब्रिटनच्या न्यायालयाने केलेली चौकशी पूर्ण झाली आहे. चौकशी अहवालातील माहितीनुसार, राजकुमाराचा मृत्यू आत्महत्या किंवा हत्येचा



प्रकार नसून रात्री केलेल्या पार्टीत मद्य, अमली पदार्थ यांचे अतिरिक्त सेवन केल्यामुळे झाला आहे. डाक्टरांनी दिलेली औषधे आणि अमली पदार्थ यांचा शरीरावर एकत्रित परिणाम झाल्यानंतर त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाल्याचे चौकशी अहवालात म्हटले आहे.चौकशी अहवालानुसार, प्रिन्स अब्दुल्ला १९ नोव्हेंबर रोजी लंडनच्या केंसिंग्टनमधील मॅरियट हाटेलमध्ये थांबले होते. जवळपास एक आठवडा ते या हाटेलमध्ये वास्तव्यास होते. मृत्यू होण्याच्या आदल्या दिवशी २४ नोव्हेंबर रोजी त्यांना हाटेलमधून बाहेर पडताना पाहिले गेले. सीसीटीव्हीतही ते बाहेर पडल्याचे दिसले.दुस-या दिवशी त्यांच्या खोलीत ते बाथरु ममध्ये बेशुद्ध पडल्याचे हाटेल कर्मचा-यांना दिसून आले. घटनास्थळी तात्काळ वैद्यकीय उपचार देण्याची व्यवस्था करण्यात आली. मात्र प्रिन्स अब्दुल्ला बिन फहद यांचा मृत्यू झाल्याचे डाक्टरांनी जाहीर केले. न्यायालयात सादर केलेल्या वैद्यकीय अहवालानुसार, त्यांच्या शरीरात मद्याची मात्रा ही इंग्लंडमधील वाहन चालवण्यासाठी ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा तीन पट अधिक होती. याशिवाय त्यांच्या शरीरात जीएचबी नावाचे पार्टी ड्रग, गांजा आणि नैराश्यविरोधी औषधांचे अंश मिळाले. डाक्टरांच्या माहितीनुसार, या सर्वांचे शरीरात मिश्रण झाल्यानंतर त्यांना कार्डियक अरेस्ट आला आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. न्यायालयात झालेल्या सुनावणीत असेही समोर आले की, प्रिन्स अब्दुल्ला काही काळापासून व्यसनाधीनतेशी निगडित समस्यांचा सामना करत होते. त्यांना मद्य आणि अमली पदार्थांचे सेवन करण्याचे व्यसन होते. २०२५ साली त्यांना लंडन आणि ब्रिटनमधील नामांकित व्यसनमुक्ती केंद्रातही ठेवले गेले होते. उपचारावेळी त्यांनी सहकार्य केल्याचे तेथील डाक्टरांनी सांगितले. मात्र उपचारानंतर त्यांनी फालोअप अपाइंटमेंटसाठी हजेरी लावली नाही.

# भारताची ऐतिहासिक झेप! 'कुशा' मिसाईलची पहिली यशस्वी चाचणी; 12 महिन्यांत तीन 'इंटरसेप्टर'ची चाचणी होणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**भारत आपली हवाई सुरक्षा यंत्रणा आणखी मजबूत करण्यासाठी प्रयत्न करत आहे. या अनुषंगानेच भारत अनेक शक्तिशाली बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी करत आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर भारताने क्षेपणास्त्र तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे या क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी भारतासाठी महत्त्वाची मानली जात आहे.भारताने आता संरक्षण क्षेत्रात आणखी एक महत्वाचा टप्पा गाठला आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओने कुशा या लांब पल्ल्याच्या जमिनीवरू न हवेत मारा करणा-या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली आहे. कुशा ही भारताच्या हवाई संरक्षण व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाची हवाई संरक्षण प्रणाली मानली जात आहे.



प्रोजेक्ट कुशा या अंतर्गत संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने पुढील १२ महिन्यांत तीन इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांची चाचणी घेण्याचं ठरवलं आहे. यातील पहिली यशस्वी चाचणी २३ जुलै रोजी पार पडली आहे. आता पुढील १२ महिन्यांत १२० किमी ते ४०० किमी पल्ल्याच्या तीन इंटरसेप्टर क्षेपणास्त्रांची चाचणी घेण्यात येणार आहे. या यशस्वी चाचण्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यास आणि क्षेपणास्त्रांच्या आयातीमध्ये संरक्षण प्रणालींवरील देशाचं अवलंबित्व कमी करण्याच्या अनुषंगाने हे एक महत्वाचं पाउल ठरणार आहे.

**कुशा इंटरसेप्टरची पहिली यशस्वी चाचणी-**डीआरडीओने गुरुवारी ओडिशाच्या किनारपट्टीवर १२० किमी पल्ला असलेल्या कुशा M-1' इंटरसेप्टरची पहिली चाचणी यशस्वीरीत्या पार पडली आहे. यानंतर आता लवकरच १५० किमी पल्ला असलेल्या 'M-2' आणि ४०० किमी पल्ला असलेल्या 'M-3' या इंटरसेप्टरची चाचणी घेतली जाणार असल्याची माहिती सांगण्यात आली आहे. प्रोजेक्ट कुशा या मोहिमेला २०२२ मध्ये मंत्रिमंडळ समितीने मंजुरी दिली होती. पण या प्रकल्पाला खरी गती ऑपरेशन सिंदूरनंतर मिळाली. कारण ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानने भारतावर अनेक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन डागले होते. पण त्यातील कोणतेही क्षेपणास्त्र किंवा ड्रोन भारताच्या भूमीवर धडकले नव्हते. कारण त्यांना भारताने क्षेपणास्त्र प्रणालीच्या माध्यमातून हवेतच यशस्वीरीत्या नष्ट केलं होतं. दरम्यान, प्रोजेक्ट कुशा अंतर्गत येणारी ही तिन्ही इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे सरफेस-टू-एअर (जमिनीवरू न हवेत मारा करणारी) आणि लांब पल्ल्याची आहेत. भारताच्या दिशेने येणा-या कोणत्याही हवाई धोक्याचा नायनाट करण्यासाठी ही तिन्ही इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे महत्वाची भूमिका बजावणार आहेत. यामध्ये M-1, M-2 आणि M-3 इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे भारताची ८० किमी पल्ल्याची मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे आणि 'S-400' हवाई संरक्षण प्रणाली यांच्यातील अंतर भरू न काढतील असं सांगितलं जात आहे. ती भारताच्या अँटी-बॅलिस्टिक क्षेपणास्त्र प्रणालीचा कणा ठरतील असा भारताला विश्वास आहे.

# माझी टीका राजकीय नेत्यांवर

**नागपूर :** दिल्लीतील आंदोलकांवर टीका करणारे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या पत्राला प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधी आणि काँग्रेसच्या नेत्यांनी



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाबाहेर केलेले आंदोलन नौटंकी असल्याची टीका आपण राजकीय नेत्यांवर केली होती. विद्यार्थ्यांचे आंदोलन लोकशाही मार्गाने होत असून त्यावर त्यांनी कधीही टीका केलेली नाही असा दावा बावनकुळे यांनी केला. शुक्रवारी नागपुरात ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

आंदोलन करण्याचा विद्यार्थ्यांना पूर्ण अधिकार आहे. मात्र या आंदोलनाच्या आडून काही राजकारणी राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असून राहुल गांधी यांनी पंतप्रधान कार्यालय आणि निवासस्थानाबाहेर केलेले आंदोलन ही एक प्रकारची नौटंकी होती. विद्यार्थी आंदोलकांशी दूरध्वनीवरू न चर्चा केली असून आंदोलकांनी सरकारवर विश्वाास व्यक्त केला असून आपण पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांनी व्यक्त केली, असे बावनकुळे यांनी सांगितले. मुंबईतील आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांशी गैरवर्तन व विनयभंग झाल्याच्या आरोपांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून संबंधित पोलिस अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. दोषी आढळणा-यांवर निश्चितपणे कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# एमबीबीएस पदवीधर आता बॉण्ड सेवेतून मुक्त

**नागपूर** : पांढरा कोट परिधान केल्यानंतरही पुढील शिक्षणासाठी प्रतीक्षा, अनिश्चितता आणि प्रशासकीय अडथळ्यांचा सामना करणा-या हजारो एमबीबीएस पदवीधरांच्या संयमाला अखेर फळ मिळाले आहे. एमबीबीएस पदवी पूर्ण करणा-या विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य असलेली एक वर्षाची सामाजिक दायित्व सेवा (बॉण्ड सेवा) रद्द करण्यात आली आहे. यामुळे पदव्युत्तर (पीजी) वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशातील मोठा अडथळाही दूर होणार आहे.आतापर्यंत



विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय शिक्षणावर शासनाचा निधी मोठ्या प्रमाणात खर्च होत असल्याने समाजाप्रति कर्तव्य म्हणून एमबीबीएसनंतर एक वर्ष सेवा करणे बंधनकारक करण्यात आले होते. मात्र, राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या वाढल्याने दरवर्षी उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांच्या तुलनेत सामाजिक दायित्व सेवेसाठी उपलब्ध पदे अत्यल्प ठरत होती. त्यामुळे अनेक पात्र विद्यार्थ्यांना वेळेत नियुक्ती मिळत नव्हती.परिणामी, सामाजिक दायित्व सेवा पूर्ण न झाल्याने त्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक पात्रता पूर्ण करता येत नव्हती.याशिवाय, केवळ पीजी प्रवेशासाठी ही सेवा पूर्ण करणारे अनेक नवोदित डॉक्टर नियुक्तीच्या ठिकाणी पूर्णक्षमतेने सेवा देत नसल्याचे तसेच नुकतेच पदवीधर झाल्यामुळे आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी ते पुरेसे सक्षम राहत नव्हते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत बाण्ड सेवाच रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. आता नव्या उमेदवाराला सामाजिक दायित्व सेवेचे वाटप करण्यात येणार नाही तसेच यासाठी तयार करण्यात आलेले ऑनलाइन पोर्टलही बंद करण्यात येणार आहे. ज्या उमेदवारांची सामाजिक दायित्व सेवा सध्या सुरू आहे किंवा ऑनलाइन वाटपानंतर ते संबंधित सेवास्थळी रु जू झाले आहेत, त्यांना निर्धारित कालावधीपर्यंत सेवा पूर्ण करणे बंधनकारक राहील. तसेच यापूर्वी दंडाची रक्कम भरू न सेवेतून सूट घेतलेल्या उमेदवारांना भरलेल्या दंडाची कोणतीही परतफेड मिळणार नसल्याचेही स्पष्ट केले आहे.

**विद्यार्थ्यांचा हिताचा निर्णय-** एमबीबीएसनंतरची एक वर्षाची बाण्ड सेवा रद्द करण्याचा शासनाचा निर्णय हा वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या हिताचा आणि स्वागतार्ह आहे. या निर्णयामुळे पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशातील मोठा अडथळा दूर होईल. यापूर्वी बाण्ड सेवा टाळण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांना लाखो रु पयांचा दंड भरावा लागत होता. आता त्या आर्थिक ओझ्यातूनही विद्यार्थ्यांची सुटका होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, एमबीबीएस पूर्ण केल्यानंतर पुढील शिक्षण, नोकरी किंवा करिअरचा मार्ग निवडण्याचे स्वातंत्र्य आणि नियोजन विद्यार्थ्यांना अधिक सहजपणे करता येईल.

# माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आयोजित 'संवादवारी' ज्ञानेश्वरी विशेष दालनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन





**पंढरपूर/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने आयोजित 'संवादवारी' ज्ञानेश्वरी विशेष दालनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी महोत्सवाच्या ठिकाणी आयोजित या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार गोपीचंद पडळकर, राजेंद्र राउत, समाधान आवताडे, अभिजीत पाटील, विजयकुमार देशमुख, उत्तमराव जानकर, नारायणराव पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन हरीश गायकवाड आदी उपस्थित होते.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारक-यांपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचविण्यासाठी हे विशेष दालन उभारण्यात आले आहे. 'संवादवारी' या उपक्रमातून शासन-जनता संवाद अधिक प्रभावी करण्याचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या उपक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण, कौशल्य विकास व गुंतवणूक, महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, नवीन शैक्षणिक धोरण २०२०, कृषी विभागाचे डिजिटल उपक्रम, जलयुक्तशिवार, गाळमुक्तधरण-गाळयुक्तशिवार, महात्मा फुले जनआरोग्य योजना, कामगार कल्याण योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, नमो शेतकरी महासन्मान निधी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, मागेल त्याला शेततळे, लेक लाडकी योजना, पीएम यशस्वी शिष्यवृत्ती योजना, आश्रम शाळा सुविधा, हरित उर्जा, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र गृहनिर्माण योजना, दिव्यांग धोरण, शाश्वत जलसंपदा व्यवस्थापन व विकास, आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र रोजगार हमी योजना आदी योजनांबाबत आकर्षक एलईडी चित्ररथ, पथनाट्य व प्रदर्शनाद्वारे जनजागृती करण्यात येत आहे.

# ठाकरे बंधूंच्या मोर्चात काँग्रेसही सहभागी होणार

**मुंबई/प्रतिनिधी :** नीट पेपरफुटी प्रकरण आणि दिल्लीतील जंतरमंतरवर विद्यार्थ्यांवर झालेल्या दडपशाहीच्या निषेधार्थ ठाकरे बंधूंनी (उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे) एकत्र येत शुक्रवार दि. २६ जुलै रोजी मुंबईत महामोर्चाची घोषणा केली आहे. या मोर्चाला आता मोठे स्वरूप प्राप्त होत असून काँग्रेसही ठाकरे बंधुंच्या मोर्चात सहभागी होणार असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.गेल्या काही दिवसांपासून देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला आता मुंबईत मोठे बळ मिळणार आहे. काल (२३ जुलै) राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेउन या मोर्चाची घोषणा केली होती आणि सर्व राजकीय पक्ष व पालकांना यात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले की जर विद्यार्थ्यांच्या मुद्यावर सर्व पक्ष एकत्र येत असतील, तर आम्हाला त्यात सहभागी होण्यास कोणतीही हरकत नाही. या मोर्चाची रणनीती ठरवण्यासाठी आज महाविकास आघाडीची (मविआ) एक विशेष बैठक पार पडणार आहे. त्यामुळे येत्या २६ जुलैला मुंबईच्या रस्त्यांवर राज ठाकरे, उद्धव ठाकरे



यांच्यासोबतच काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे नेतेही एकाच मंचावर दिसण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

**विद्यार्थ्यांसाठी युवासेनेचे सुरक्षा कवच-** या महामोर्चामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी होण्याची शक्यता आहे. दिल्लीतील जंतरमंतरवर विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या पार्श्वभूमीवर, मुंबईत तसा प्रकार घडू नये यासाठी शिवसेना(ठाकरे गट) आणि युवासेना विशेष खबरदारी घेत आहे.

**आदित्य ठाकरेंचे निर्देश-**या मोर्चाच्या पूर्वतयारीसाठी युवासेनेची एक महत्त्वाची ऑनलाइन बैठक पार पडली. यामध्ये शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी युवासेनेच्या पदाधिका-यांना स्पष्ट आदेश दिले आहेत. मोर्चात सहभागी होणा-या विद्यार्थ्यांची पूर्ण काळजी घ्या. या मुलांवर पोलिसांची कोणतीही कारवाई होणार नाही, याची दक्षता घ्या. युवासेनेने विद्यार्थ्यांसाठी सुरक्षा कवच म्हणून मैदानात उतरावे अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.

**फडणवीसांचा ठाकरे बंधूंवर जोरदार पलटवार-**ठाकरे बंधूंच्या या मोर्चावरू न सत्ताधा-यांनीही लगेचच पलटवार केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातील घोटाळयांची आठवण करू न देत त्यांच्यावर कडाडून टीका केली. फडणवीस म्हणाले मी उद्धव ठाकरेंना आठवण करू न देतो की, राज्याच्या इतिहासातील सर्वात मोठा टीईटी घोटाळा ते मुख्यमंत्री असतानाच झाला होता. या घोटाळयात आयएएस अधिका-यांपासून अनेक जण सामील होते.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# विस्कटलेले अर्थकारण

आखातातील युद्धसंघर्ष शस्त्रसंधी करारामुळे थांबेल,या अपेक्षेने सुटकेचा निःश्वास टाकलेले जग पुन्हा चिंताक्रांत झाले आहे. युद्धविरामाला केराची टोपली दाखवत ८-१० दिवसांपासून पुन्हा इराण आणि अमेरिका यांच्यात घनघोर युद्ध पेटले असून ते व्यापक होत आहे. आखाती देशांत महत्प्रयासाने उभे राहिलेले जल शुद्धीकरण प्रकल्प, वीजनिर्मिती प्रकल्प, बोगदे, पूल, बंदरे या संघर्षामध्ये बेचिराख होत आहेत. ट्रम्प प्रशासनाने इराणची आर्थिक कोंडी आणखी तीव्र करण्यासाठी त्यांची सुमारे ३४४ दशलक्ष डॉलर मूल्याची क्रिप्टोकरन्सी गोठवली. यामागचा उद्देश इराणच्या फंडिंग चॅनेलला पूर्णपणे वेसण घालणे हा आहे. युद्धबंदी करारावर स्वाक्षरीनंतर १२० डॉलरपर्यंत पोहोचलेले कच्चे तेल १५ ते २३ टक्क्यांनी घसरून ७५ डॉलरवर आले होते. गॅस पुरवठाही मुबलक आणि सुरळीत सुरू होता.खरिपातील शेती पिकांना संजीवनी देणाऱ्या खतांची आवक वाढली होती.एल निनोचे भीतीचे ढग मेघदूत बनून बरसण्यास सुरुवात झाली होती.यामुळे गंडांतर टळले या भावनेने भारतीय जनमानस सुखावले होते. पण नव्याने युद्धाचा वणवा पेटल्यामुळे पुन्हा निराशेची छाया पसरली आहे. होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा बंदिस्त झाल्यामुळे जागतिक तेल वाहतुकीपुढे अडथळे निर्माण झाले आहेत. भरीस भर म्हणजे लाल समुद्रातही येमेनमधील इराण समर्थक हूती बंडखोरांनी दक्षिण भाग आणि बाब अल-मंदेब सामुद्रधुनीमध्ये व्यापारी जहाजांना लक्ष्य केल्यामुळे आंतरराष्ट्रीय जलमार्गांवर गंभीर परिणाम झाला आहे. हूतींच्या नाकेबंदीमुळे अनेक प्रमुख तेल टँकर आणि मालवाहू जहाजांना सुरक्षिततेच्या कारणास्तव हा मार्ग टाळावा लागत आहे. आता जहाजांना आफ्रिकेच्या दक्षिण टोकावरील केप ऑफ गुड होपला वळसा घालून जावे लागत असल्यामुळे प्रवास वेळेत १० ते १४ दिवसांची वाढ झाली. परिणामी मालवाहतूक खर्च वाढला.चौथ्या तिमाहीपर्यंत तेल पुरवठा युद्धपूर्व पातळीच्या ४५ टक्क्यांपेक्षा कमी राहिला, तर कच्च्या तेलाचे दर १२० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे जातील, असा इशारा 'गोल्डमॅन सॅक्स'ने दिला आहे. ही वाढ ऊर्जा क्षेत्रापुरती मर्यादित न राहता महागाई, आर्थिक विकास आणि भारतासारख्या आयातदार देशांच्या वित्तीय स्थैर्यावर दूरगामी परिणाम करू शकते. चालू महिन्यामध्ये आलेले किरकोळ आणि घाऊक महागाईचे दर रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्के लक्ष्यित दराच्या चौकटी मोडणारे होते. सद्यःस्थितीत ब्रेंट क्रूडच्या दरांनी ९५ डॉलरची पातळी ओलांडली आहे. याचा नकारात्मक परिणाम रुपयाची वाटचाल आणि एफपीआय प्रवाहावर होऊ शकतो. बँक ऑफ बडोदाने आपल्या अहवालात महागाई वाढण्याचे अनुमान वर्तवले आहे. लवकरच भारतात सणासुदीचा हंगाम सुरू होईल. या काळात देशातील मागणी सर्वोच्च पातळीवर असते. सणवार, व्रतवैकल्ये, गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळीसारखे वर्षभरातील महत्त्वाच्या उत्सवांचे पर्व बाजारपेठेसाठी पोषक ठरते. पण अन्नधान्यासह सर्वच वस्तूंच्या किमतींमध्ये १५ ते २० टक्के वाढ झाल्यामुळे ग्राहकांच्या क्रयशक्तीवर परिणाम झाला आहे. महिनाभरात गव्हाच्या किमतींमध्ये आठ टक्क्यांहून अधिक वाढ झाली.सोयाबीन लागवड सहा टक्क्यांनी घटली असून पावसात आणखी विलंब झाल्यास प्रतिहेक्टर उत्पादनात पाच ते सात टक्के घट होईल. जागतिक बाजारात पाम तेलाची उपलब्धता कमी झाली असून भारताने आयातही कमी केली आहे. त्यामुळे देशांतर्गत साठ्यावर दबाव वाढू शकतो. सणासुदीत खाद्यतेलांची मागणी वाढते. ऑगस्टपासून बाजारातील मागणी वाढण्यास सुरुवात होईल आणि दिवाळीपर्यंत ती उच्चांक गाठेल. यामुळे किमतींवर आणखी दबाव येऊ शकतो. त्यातच जैवइंधनासाठी पाम तेलाचा वाढता वापर, सोयातेल आणि सूर्यफूल तेलाच्या जागतिक किमतींतील वाढ तसेच रुपयाच्या घसरणीमुळे वाढलेला आयात खर्च या घटकांमुळे खाद्यतेल स्वस्त होण्याची शक्यता नाही. स्वयंपाकघरातील आवश्यक वस्तू महागल्याने त्याचा फटका मध्यमवर्ग आणि अल्प उत्पन्न गटाला सोसावा लागत आहे. रुपया ९६.३६ प्रति डॉलरपर्यंत घसरल्याने आयातीचे अर्थकारण कोलमडले आहे. रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून चलन बाजारातील अस्थिरता नियंत्रित ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू असले, तरी तेलाच्या वाढत्या किमती आणि परकीय बाजारातील घडामोडी भारतीय चलनावर दबाव निर्माण करतात.शेअर बाजारातील घसरण, औद्योगिक कच्चा माल ते इलेक्ट्रॉनिक उपकरणांपर्यंत रुपयाच्या घसरणीचे परिणाम दिसून येतात. कंपन्यांना वाढता उत्पादन खर्च भरून काढण्यासाठी उत्पादनांच्या किमतीत वाढ करणे भाग पडते. परिणामी पुन्हा चलनवाढीस हातभार लागतो. महागाईचे हे दुष्टचक्र भेदल्याशिवाय आर्थिक विकासाचा गाडा सुचारू पद्धतीने पुढे सरकत नाही. ही सर्व स्थिती बऱ्याच अंशी जागतिक घडामोडींवर अवलंबून असल्याने केवळ भारतच नव्हे सर्वच विकसनशील देश, विकसित देश यामध्ये होरपळून निघत आहेत. दुर्दैवाने ना अमेरिकेला याची फिकीर आहे, ना इराणला. इराण आपल्या मदतीसाठी धावून येण्यास तयार आहे; पण अमेरिकेची धोरणे भारताच्या विकासाला हातभार लावण्याऐवजी अडचणी वाढवणारी आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी औषधांच्या आयातीवर अतिरिक्त टॅरिफची घोषणा केल्याने भारतीय औषध उद्योग अडचणीत आला. निर्यातीतील संकटे, वाढलेला उत्पादन खर्च, आयातीचा वाढीव खर्च, आक्रसलेली क्रयशक्ती आणि चलनवाढ यामुळे देशातील उद्योगविश्व अडचणीत आहे. केंद्र सरकार आणि आरबीआयने संयुक्तरीत्या या संकटावर मात करण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे.आरबीआयने मागील पतधोरणात रेपो दर ५.२५ टक्क्यांवर स्थिर ठेवत 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेतली होती. कारण व्याज दर वाढविल्यास महागाईवर काही प्रमाणात नियंत्रण मिळू शकते; मात्र उद्योगांना कर्ज महाग होते, गुंतवणुकीचा वेग कमी होतो आणि आर्थिक वाढीवर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, व्याज दर स्थिर ठेवल्यास विकासाला चालना मिळू शकते; परंतु महागाई नियंत्रणाबाहेर जाण्याचा धोका वाढतो. त्यामुळे महागाई आणि विकास यांच्यात समतोल राखणे ही रिझर्व्ह बँकेपुढील मोठी कसोटी असणार आहे. सर्वांत मोठा प्रश्न इराण आणि अमेरिकेत नव्याने समेट कोण घडवून आणणार हा आहे. संयुक्त राष्ट्रे बघ्याची भूमिका सोडण्यास तयार नसल्याने या युद्धाचा शेवट कधी आणि कसा होणार, हा कळीचा प्रश्न अनुत्तरित आहे. भविष्यकाळ बिकट बनवणाऱ्या या संकटांमुळे सरकारची अग्निपरीक्षा असणार आहे. सर्वसामान्यांना महागाईच्या चक्रातून दिलासा मिळेल अशी धोरणे आखणे गरजेचे आहे. अन्यथा मागणीपासून बचतीपर्यंत सर्वच गोष्टी प्रभावित होऊन आर्थिक मंदीचा फेरा येऊ शकतो.

### वातावरण बदल आणि सुपर 'एल निनो'चे संकट !!

# अन्नदाता शेतकऱ्याचा वाली कोण?

भारत हा आजही शेतीप्रधान देश आहे. आजही ५० टक्के जनता शेती व्यवसायावर आधारीत जीवन जगत आहे.त्यामुळे वातावरण बदल आणि सुपर 'एल निनो' चे संकट फक्त शेतीवर जगणा-यांचेच जीवन संकटात टाकत नाही तर देशाची अर्थव्यवस्थाही संकटात आणते.

पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगांवकर म्हणतात की, १९९० पासूनच जगात पर्यावरण बदलाची चर्चा सुरु झाली होती. प्रश्न हाच आहे की त्या दिशेने आपण काय उपाययोजना राबवत आहोत? 'एल निनो'चे संकट तर निसर्गाचे चक्र आहे. ते दर २-३ वर्षानी येतच असते. भारतात २००४-०५, २००६-०७, २००९-१०, २०१४-१६, २०१८-१९, २०२३-२४ व यंदा २०२६-२७ ला सुपर 'एल निनो'चा धोका आहे.त्याचा अनुभव आपण घेत आहोत. जून महिन्यात पाऊसच झाला नाही. संपूर्ण देशात ४५ टक्यांपेक्षा कमी पाऊस झाला तर आपल्या राज्यात काही भागात ५० से ८० टक्के कमी पाऊस झाला. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच मुबंई, पुणे, नाशिक या भागात अतिवृष्टी झाली, त्या तुलनेत मराठवाडा, विदर्भात कमी पाऊस झाला. आज २२ जुलै २०२६, पण पावसाचा तुटवडा १५ ते २० टक्के आहे. हवामानाचा अंदाज हे सांगतो की २५ जुलैपर्यंत पाऊस नाही. सुपर 'एल निनो'च्या पार्श्वभुमीवर पाऊस पडणारच नाही असे नाही तर काही भागात पाऊस कमी-जास्त पडे. म्हणजेच या पावसाचे वितरण (distribution) असमान राहील. शेती उत्पादनाला ही परिस्थीती मारक आहे.

ज्याप्रमाणे १९९० नंतर जगात पर्यावरण बदलाची चर्चा सुरू झाली, त्याच सुमारस जगात नवीन अर्थव्यवस्थेची चर्चा सुरू झाली. ती व्यवस्था म्हणजे खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण (खाऊजा). आम्ही १९८० ते १९९० शेतकरी संघटनेच्या मंचावरुन अस्मानी-सुलतानी संकटाचा सामना करणाऱ्या ग्रामिण जनतेचे प्रबोधन करताना म्हणायचों की, हा देश दोन देशात विभागाला आहे. एक आहे 'इंडीया,' व दुसरा, 'भारत'. परंतू १९९० नंतर जे 'खाऊजा' धोरण आपण स्विकारले त्याचा परिणाम असा झाला की इंडीयाचा सुपर इंडीया झाला व भारताचा सुदान (अफ्रिका) सारखा भुकमरा देश झाला, ८५ कोटी जनतेला ५ किलो फुकट अन्न देवून आम्ही वास्तविकतेला मान्यताच दिली आहे.

शेतीच्या शोषणाचा इतिहास फार जुना आहे. एका दाण्याचे हजार दाणे करण्याचा चमत्कार तर निसर्गति म्हणजेच शेतीतच आहे. राजे-महाराजे, जमीनदार इमारदार किंवा देशाला गुलाम करून शेतीला लुटण्याचा इतिहास आहे. गो-या इंग्रजांच्या काळात (वसाहतवादी गुलामी) शेतीची लुट होत होती. महात्मा ज्योतीबा फुलेंनी शेतकयांच्या 'आसुड' च्या माध्यमातून जे प्रबोधन केले आहे ते आजही ही उपयोगाचे आहे. त्या काळात अस्मानी संकटाचा सामना करणा-या जिरायत शेतकऱ्यांना ओलीताची (सिंचनाची) सोय करून देण्याची मागणी त्यांनी केली आहे. सरकारी कर्मचा-यांचे आर्थिक संरक्षण सरकार कसे करते व त्यामुळे शेतकरी कसे कर्जबाजारी होत आहे, हे शेतक-यांच्या आसूड मधील प्रकरण तिसरे. याच्या पाहिल्या वाक्यातच स्पष्ट केलेले आहे ते म्हणतात, 'आर्य बाम्हण इराणातून कसे आले व शुद्र शेतकरी यांची मुळ पीठीका व हल्लीचे आमचे सरकार, एकंदर सर्व आपले कामगारास मनमानेल तसे पगार व पेन्शने देण्याचे इरादयाने नाना प्रकारचे नित्य नवे कर शेतक-यांच्या बोडक्यावर बसवून, त्यांचे द्रव्य मोठ्या हिकमतीने गोळा करू लागल्यामुळे शेतकरी अट्टल कर्जबाजारी झाले आहे.'

भारतात १९४७ ते १९९० शेती व शेतक-यांची लुट होत होती. तीच लुटीची व्यवस्था अधिक गतीमान झाली. १९९० नंतरच्या खाऊजा धोरणांच्या माध्यमातून.सरकारी कर्मचा-यांच्या वेतन आयोगाचे उदाहरण देवूनच हे स्पष्टच करता येईल.पांचव्या वेतन आयोगाचे कमीत कमी वेतन २,५५० रु., सहाव्या वेतन आयोगाचे कमीत कमी वेतन ७००० रु., सातव्या वेतन आयोगाचे कमीत कमी वेतन १८००० रु. प्रती महिना ठरविण्यात आले. या तुलनेत शेतमजूर- असंगठीत कामगारांच्या वेतनात व ते हिशेबात घेऊन शेतीमालाच्या हमी किंमतीत वाढ झाली का? याचे उत्तर नाही असेच आहे.

जागतीक व्यापारावर नियंत्रण ठेवण्यासाठी १ जाने १९४८ साली गॅट (Gencel Agreement on Tarad Terif) नावाची संस्था स्थापन झाली होती ही संस्था बरखास्त करुन १ जाने १९९५ला खाउजा धोरण राबविण्यासाठी 'विश्व व्यापार संघटना,' स्थापन करण्यात आली. 'गॅट' या संस्थेत शेती व्यापाराचा विषय नव्हता. तो विश्व व्यापार संघटनेत (WTO.) समाविष्ट करण्यात आला होता. विश्व व्यापार संघटनेच्या स्थापने साठी १९८६ मध्ये चर्चा सुरु झाली होती ती १ जाने १९९५ का संपली. शेतीला दिली जाणारी अनुदाने (subsidy) कशी नियमीत करायची, या विषयावर चर्चा लांबली होती. याच चर्चेमुळे तुमच्या-माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला हे कळले की जगात कुठेही विकसीत श्रीमंत देशात शेती ही सरकारच्या मदती (सबसीडी) शिवाय शक्य नाही. मुक्त अर्थव्यवस्थेचे समर्थक याप्रश्नाचे उत्तर देत नाही. विदर्भ-मराठवाड्यात १९९५ नंतर शेतक-यांच्या आत्महत्येच्या दुर्देवी घटना का वाढल्या? व या तुलनेत महाराष्ट्राच्या ऊस पटट्यात शेतक-यांच्या आत्महत्या का वाढल्या नाहीत? मी आदरणीय शरद पवार साहेबांना हा प्रश्न विचारणार नाही तर मा. मा. श्री जयंत पाटील, मा. सौ. सुप्रीयाताई सुळे, पंकजाताई मुंडे यांनी तरी हे सांगावे की ऊसाचे व साखरेचे अर्थकारण आमच्या देशात मुक्त अर्थव्यवस्थेचे आहे का?

विश्वव्यापार संघटनेत जो शेतीचा करार (Agreement on Agriculture) करण्यात आला आहे, त्यात असे म्हटले आहे की, श्रीमंत देशातील शेतक-यांच्या अनुदानात (subsidy) कपात करण्यात येईल व गरीब-विकसनशील देश, शेतक-यांच्या अनुदानात वाढ करू शकतील. पण वास्तवात झाले उलटेच. शेती करारात शेतीच्या अनुदानाला नियमात बसविण्यासाठी तिन प्रकार ठरविण्यात आले आहेत. (१)ॲम्बर बॉक्स (२) निळा (Blue) बॉक्स (३) ग्रीन बॉक्स. श्रीमंत देशांनी शेतक-यांच्या सबसीडी कमी तर केल्याच नाही तर पर्यावरण बदलाच्या माध्यमातून 'ग्रीन बॉक्स'च्या माध्यमातून अनुदानात वाढ केली आहे.

पर्यावरण बदल व सुपर एलनिनोचे संकट या पार्श्वभुमीवर २०४७ चे विकसीत भारताचे स्वप्न दाखविणारे प्रधानमंत्री मोदीजींच्या नावावर ज्या प्रधानमंत्री पीक विमा योजनेचे ढोल वाजविले जात आहे ती शेतक-यांना संरक्षण देणारी आहे का? शेतक-यांना विचारले तर ते म्हणतील नाही. कारण पीक विमा योजना पूर्व प्रधान मंत्री स्व. मनमोहनसिंगजीच्या काळातली की आजच्या गुणात्मक काहीच फरक नाही. उद्देश चांगला आहे पण अमंलबजावणी शेतकरी हिताची नाही. फडणवीस सरकारने शेतक-यांची कर्जमाफी वारंवार करावी लागू नये म्हणून एक अधिकारी श्री परदेशी यांची समिती नेमली आहे. समितीने पीक विमा योजनेत बदल करण्याचे सुचविले आहे, म्हणजेच ते हे मान्य करतात की,आजची योजना परिपूर्ण नाही. पण सध्या तरी महाराष्ट्र सरकारने हा बदल मान्य केलेला नाही.

अधिक खर्चाची अर्थव्यवस्था, पर्यावरण बदल, सुपर एल निनोचा धोका या सर्व पार्श्वभुमीवर भारतीय शेती आणि शेतकऱ्यांना सरकारच्या तिजोरीतून (वेतन आयोगा प्रमाणे) मदतीची गरज आहे. आम्ही शेतकरी अज्ञानी, आम्हचे नका ऐकू पण उद्योगाचे प्रतिनिधी पण या विषयावर बोलत आहेत, लिहीत आहे. काही दिवसांपूर्वीच एक लेख, श्री बूर्जिस गोदरेज व श्रीमती अँजेला लुसिगी यांचा लेख 'इकॉनॉमीक टाईम्स' मध्ये प्रकाशीत झाला आहे. त्या लेखाचे शिर्षकच आहे, 'स्मार्ट शेतीची बीजे पेरा, कारण पुढची क्रांती केवळ अधिक उत्पादनापुरती मर्यादीत नसेल.' (९-७-२६ Economic Times)'

भारत सरकारच्या शेती आयोगाचे अध्यक्ष भारतरत्न डॉ. स्वामीनाथन यांनी पण असेच म्हटले आहे की, 'शेतीचा विकास किती उत्पादन वाढत यांनी न मोजता शेतक-यांचे उत्पन्न किती वाढते यांनी मोजले पाहिजे.'

श्री-गोदरेज यांच्या लेखातील अनेक वाक्य फार महत्वाची आहेत. एखादा विषय समजून घेण्यासाठी दोन वाक्यातला गर्भीत अर्थ (Reading between the line) समजवून घेणे महत्वाचे असते. या लेखाचा शेवट मी त्यांच्याच लेखातील शेवटच्या वाक्यांनी करतो, 'पुढील टप्पा म्हणजे स्वतंत्र उपक्रमांपासून दूर जाऊन अधिक एकात्मिक दृष्टीकोन स्विकारणे, जो कृषी प्रणालीचे नियोजन, वित्तपुरवठा आणि व्यवस्थापन करण्याच्या पद्धतीत हवामान बदलाचा धोका अंतर्भूत करेल. हवामानातील टोकाचे बदल अधिक, वारंवार होत असल्याने, उपजीविका आणि अन्न सुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी शेतकरी समुदायची अंदाज लावण्याची, जुळवून घेण्याची आणि सावरण्याची क्षमता मजबूत करणे आवश्यक असते.'

**विजय जावधिया**
शेतकरी संघटना पाईक
मो.नं.९४२१७२७९९८

## जेन-झी ची चळवळ

कॉक्रोच जनता पार्टीने ठिणगी टाकली आणि वणवा पेटला आहे.भाजप-संघ परिवाराच्या विरोधात जेन झी रस्त्यावर उतरली. केरळपासून ते मिझोरामपर्यंत अनेक शहरांत तरुण निदर्शने करत आहेत.चळवळ उत्क्रांत होते आहे. केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा किंवा त्यांना पाठिशी घालणाऱ्या पंतप्रधानांचा राजीनामा हवा आहे की गेली बारा वर्षे सत्तेवर असलेल्या पक्षालाच पदच्युत करायचे आहे जेणेकरून शैक्षणिक धोरण आणि व्यवस्था यामध्ये आमूलाग्र परिवर्तन शक्य आहे. तरुणांना नेमके काय हवे आहे, हे आज पुरेसे स्पष्ट नाही.

कारण कॉकरोच जनता पार्टी ही एक संघटना नाही. ती एक उत्स्फूर्त चळवळ आहे. ती व्हर्च्युअल नाही तर वास्तविक आहे. या चळवळीचा एक सर्वमान्य नेता नाही. सोनम वांगचुक आपले समर्थक आहेत, याबद्दल तरुणांच्या मनात आदर आणि प्रेमाची भावना आहे. परंतु ते आपले नेते नाहीत ही बाब त्यांनी दडवून ठेवलेली नाही. तीच गत नेहा बोरा आणि अन्य डाव्या विद्यार्थी संघटनांच्या कार्यकर्त्यांची आहे.

अभिजीत दिपके आणि कॉकरोच जनता पार्टीचे दोन प्रवक्ते, एवढीच या पार्टीची संघटनात्मक रचना आहे.यांना आणि या आंदोलनात सामील झालेल्या तरुणांना नगरसेवक,आमदार,खासदार, मंत्री, मुख्यमंत्री वा प्रधानमंत्री बनण्याच्या आकांक्षा नाहीत. त्यामुळे नावात पार्टी हा शब्द असला तरिही तो राजकीय पक्ष नाही. या आंदोलनाला दडपायचे कसे,याची रणनीती केंद्र सरकार आणि भाजप आखत आहे. तर या आंदोलनावर स्वार होऊन सत्ताधारी भाजपचा पराभव कसा करायचा याची रणनीती विरोधी पक्ष ठरवत आहेत.

कॉकरोच जनता पार्टी नव्या टेक्नॉलॉजीची पैदाईश आहे. इन्स्टाग्रामची गांधीवाद, आंबेडकरवाद, नेहरूवाद, इत्यादी कोणताही विषय काही सेकंदांच्या रिल्समध्ये मांडण्याची सर्जनशीलता या पिढीकडे आहे. आणि प्रत्यक्ष कृतीला आवाहन करण्याचे कौशल्यही आहे. कॉकरोच जनता पार्टी फुटबॉल खेळत आहे आणि राजकीय नेते,विश्लेषक,निरीक्षक क्रिकेटच्या नियमांनी त्यांचा खेळ जोखत आहेत. त्यांनी गोल मारला तर तो चौकार की षट्कार यावर निरीक्षक,विश्लेषक चर्चा करतात.

कारण तरुणांमधील ही वैचारिक क्रांती,राजकीय सत्ताबदलामध्ये कशी परिवर्तीत होईल याची चिंता राजकीय निरीक्षक,विश्लेषक यांना आहे. त्यामुळे ऐतिहासिक दाखले देत, उदा. जेपी आंदोलन, अण्णा हजारेंचे आंदोलन, इत्यादीचे संदर्भ देत ते चर्चा करतात. लोकशाही वाचवणे हे अभिजीत दिपकेला सर्वाधिक महत्वाचे वाटते. सत्ताधारी पक्ष आणि न्यायपालिका, गोदी मिडिया यांच्यातील मिलीभगत त्याने अचूक जाणली आहे. हीच जाण आंदोलकांमध्येही आहे. म्हणून तर गोदी मिडियाच्या पत्रकारांची अवहेलना आंदोलकांनी केली. गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांचे फोटो निदर्शकांच्या हातात होते. साहजिकच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला ते झिडकारतात.

या आंदोलनाला समाजातील विविध घटकांकडून पाठिंबा मिळतो आहे. अनेक चित्रपट अभिनेते, लेखक, कवी, गीतकार, संगीतकार आपण तरुणांच्या पाठिशी आहोत असे सांगत आहेत. पोलीसी अत्याचारांचा निषेध करत आहेत. सर्वोच्च न्यायलयातील वकील संघटीत होऊन या अत्याचारांच्या विरोधात दाद मागत आहेत. सोशल मिडियाचा वापर करून जेन झी एक राजकीय शक्ती निर्माण करते आहे हे पाहाताना विलक्षण रोमांचित व्हायला होते. बदल झाला आहेच. राजकीय सत्ताबदल होईल की नाही, हा प्रश्न सध्या तरी इर्रेलेव्हंट आहे.

-सुनील तांबे

# होय, धर्मेंद्र प्रधानांची चूक झालीच!

नाट-युजी२०२६ चा पेपर फुटला.लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षेच्या व्यवस्थेत एवढी गंभीर सुरक्षा त्रुटी झाली, याची जबाबदारी सरकार आणि शिक्षण मंत्रालयाने स्वीकारलीच पाहिजे.पण त्यानंतर धर्मेंद्र प्रधानांनी एकामागून एक भयंकर 'चुका' केल्या. ३ मे २०२६ रोजी नीट-युजी ची परीक्षा झाली. पेपरफुटीचे प्रकरण समोर आले, तपास सुरू झाला आणि पेपरफुटीमागची साखळी उघड होऊ लागली.इथे प्रधानांची पहिली चूक झाली.त्यांनी प्रकरण दाबून टाकले नाही. उलट तपास यंत्रणा कामाला लागल्या आणि पेपर तयार करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित लोक,मध्यस्थ आणि पेपर बाहेर पोहोचवणाऱ्या नेटवर्कपर्यंत तपास पोहोचला.मे महिन्याच्या अखेरपर्यंत सीबीआयने या प्रकरणात १३ जणांना अटक केली होती.

प्रधानांची दुसरी चूक!आपल्या देशात एखादे प्रकरण चौकशी समिती नेमून सहा महिने थंड बस्त्यात टाकण्याची सुंदर परंपरा असताना यांनी आरोपी पकडायला सुरुवात केली.पण एवढ्यावर प्रधान थांबले नाहीत.३० मे २०२६ रोजी संपूर्ण नीट-युजी २०२६ परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.ही त्यांची आणखी मोठी चूक.

'वीस-पंचवीस लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे, आता काहीही बदलता येणार नाही' असे म्हणून हात वर करता आले असते.पण नाही.पेपरच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न निर्माण झाला आहे, तर परीक्षा पुन्हा घ्या, असा निर्णय घेतला.मग प्रधानांनी आणखी एक चूक केली.पुनर्परीक्षा सहा महिन्यांनी किंवा पुढच्या वर्षी ठेवून विद्यार्थ्यांचं शैक्षणिक वर्ष वाया घालवले नाही. स्वतः बैठका घेतल्या,एनटीए च्या तयारीचा आढावा घेतला, परीक्षा सुरक्षेची व्यवस्था तपासली आणि तातडीने पुनर्परीक्षेची तारीख निश्चित केली.२१ जून २०२६ रोजी देशभर नीट-युजी ची पुनर्परीक्षा घेण्यात आली.ही तर अक्षम्य चूक!

कारण ज्यांना खरंच डॉक्टर व्हायचे होते, ज्यांना खरंच नीट द्यायची होती, ते विद्यार्थी आंदोलनात महिने घालवत बसले नाहीत. त्यांनी पुन्हा अभ्यास केला, पुन्हा परीक्षा दिली आणि आपल्या पुढच्या आयुष्याकडे वळले.प्रधानांनी इथे तरी थांबायला हवे होते. पण नाही.रद्द झालेल्या परीक्षेमुळे विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ नये, परीक्षा प्रक्रिया पुन्हा व्यवस्थित उभी राहावी आणि प्रवेशाचे वेळापत्रक आणखी बिघडू नये यासाठी यंत्रणा वेगाने चालवली.

आणि मग,१६ जुलै २०२६ रोजी पुनर्परीक्षेचा निकालही जाहीर झाला. म्हणजे ३ मे च्या परीक्षेतील पेपरफुटीनंतर परीक्षा रद्द झाली, तपास झाला, आरोपी पकडले गेले, २१ जूनला पुन्हा परीक्षा झाली आणि १६ जुलैला निकालही लागला.ज्यांना खरंच नीट द्यायची होती, ते परीक्षा देऊन निकाल घेऊन पुढच्या प्रवेश प्रक्रियेकडे निघूनही गेले.पण धर्मेंद्र प्रधानांची सर्वात धोकादायक चूक अजून बाकी होती.त्यांनी फक्त २०२६ चा गोंधळ निस्तरून विषय संपवला नाही.



नीट-युजी २०२७ पासून संपूर्ण परीक्षा Computer-Based Test, म्हणजेच संगणकाधारित पद्धतीने घेण्याचा निर्णय घेतला.पेन-पेपर आणि ओएमआर आधारित परीक्षा बंद.छापील प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीवरचे अवलंबित्व कमी.पेपर हातोहात फिरण्याची साखळी कमी.परीक्षा अधिक नियंत्रित आणि सुरक्षित करण्याचा प्रयत्न. कशाला? पुढच्या वर्षी पुन्हा पेपर फुटला असता, पुन्हा आंदोलन झाले असते, पुन्हा राजकारण करता आले असते!पण यांनी तर व्यवस्थाच बदलायला घेतली.म्हणून नीट पाहिले तर धर्मेंद्र प्रधानांनी चुका भरपूर केल्या.

#### पेपरफुटी नेमकी कुठे शक्य होते?

प्रश्नपत्रिका तयार होते. छापली जाते.तिच्या प्रती बनतात. ती साठवली जाते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाते. परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचते.या साखळीत जितके जास्त मानवी हात,तितक्या पेपर फुटण्याच्या जास्त शक्यता.म्हणून प्रधानांनी या व्यवस्थेच्या मुळावरच घाव घालण्याची आणखी एक 'चूक' केली.

पेपरफुटीचे प्रकरण दाबले नाही, ही पहिली चूक.तपास लावला,ही दुसरी. आरोपींना अटक झाली,ही तिसरी.३० मे रोजी परीक्षा रद्द केली,ही चौथी.विद्यार्थ्यांना वर्षभर लटकवले नाही,ही पाचवी.२१ जूनला पुनर्परीक्षा घेतली,ही सहावी.१६ जुलैला निकाल लावून विद्यार्थ्यांना पुढे जाऊ दिले, ही सातवी.आणि या सगळ्यातून धडा घेऊन २०२७ पासून नीट पूर्णपणे संगणकाधारित करण्याचा निर्णय घेतला, ही तर सर्वात मोठी व्यवस्थात्मक चूक!

त्यानंतर त्यांनी काय केले, किती लवकर केले, किती आरोपी पकडले, परीक्षा किती लवकर पुन्हा घेतली, निकाल किती लवकर लावला, पुढची पेपरफुटी रोखण्यासाठी संपूर्ण परीक्षा पद्धत बदलली की नाही,या सगळ्याला काही अर्थ उरत नाही.कारण आपल्या इथे आधी नेता कोणत्या पक्षाचा आहे हे ठरते.मग त्याची चूक ठरवली जाते. आणि त्यानंतर त्या निष्कर्षाला सोयीची तथ्ये शोधली जातात.धर्मेंद्र प्रधानांची सर्वात मोठी चूक हीच आहे की ते नरेंद्र मोदी सरकारचे शिक्षणमंत्री आहेत..बाकी परीक्षा पुन्हा झाली.निकाल लागला.विद्यार्थी पुढे गेले.आरोपी पकडले गेले.व्यवस्था बदलली.२०२७ ची नीट संगणकाधारित झाली.पण आंदोलन मात्र सुरूच आहे.कारण काही लोकांसाठी प्रश्न सुटणे महत्त्वाचे नसते.प्रश्न जिवंत राहणे राजकीयदृष्ट्या जास्त फायद्याचे असते...

**मिलिंद आरोलकर**

शनिवार, दि. २५ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# लोहारा कोलाम पोड शाळेच्या निकृष्ट बांधकामाची उच्चस्तरीय चौकशीची मागणी..!

## दोषींवर गुन्हे आणि निधी वसुलीची मागणी मानवाधिकार असोसिएशनचा आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. २४ :** यवतमाळ जिल्ह्यातील लोहारा येथील कोलामपोड परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेच्या धोकादायक अवस्थेविरोधात आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशन, नवी दिल्ली (यवतमाळ शाखा) यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून निकृष्ट बांधकामाची उच्चस्तरीय चौकशी, दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करणे आणि शासनाच्या निधीची वसुली करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, सन २०११-१२ मध्ये उभारण्यात आलेली शाळेची मुख्य इमारत अवघ्या १० ते १२ वर्षांतच मोडकळीस आली असून भिंतींना तडे, प्लास्टर कोसळणे आणि संरचनेची दयनीय अवस्था यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. तसेच २०१४-१५ मध्ये बांधण्यात आलेल्या दुसऱ्या इमारतीलाही मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने दोन्ही इमारतींच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. संघटनेने या प्रकरणात तत्कालीन जिल्हा परिषद अभियंते, संबंधित प्रशासकीय अधिकारी आणि कंत्राटदार यांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. निकृष्ट बांधकामामुळे शासनाच्या निधीची झालेली हानी संबंधितांकडून वैयक्तिक मालमत्तेतून वसूल करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. यासोबतच चौकशी पूर्ण होईपर्यंत शाळेच्या इमारतीवर कोणतीही डागडुजी किंवा पाडकाम करून पुरावे नष्ट होणार नाहीत, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत तातडीने पर्यायी वर्गखोल्यांची व्यवस्था करून शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, अशीही संघटनेची भूमिका आहे.दरम्यान, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अन्यथा बालकांच्या सुरक्षेसाठी आणि कथित भ्रष्टाचाराविरोधात व्यापक जनआंदोलन उभारण्यात येईल तसेच प्रकरण मानवाधिकार आयोगापर्यंत नेण्यात येईल, असा इशारा आंतरराष्ट्रीय मानवाधिकार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष विवेक वानखडे यांनी दिला. यावेळी राहुल वासनिक, विजय मालखेड, विशाल बावनथडे, रवीश वाघ, सय्यद मतीन आणि कलीम खान यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

# 'नारायणा आयएएस अकॅडमी'च्या नावावर प्रशिक्षण की निधीचा खेळ?

## महिलांचे प्रशिक्षणच नाही, चौकशी अहवालावरही संशय

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २४ :** डीपीसी अंतर्गत किमान कौशल्य विकास कार्यक्रम (२०२४-२५) मध्ये नारायणा आयएएस अकॅडमी, नागपूर यांच्या माध्यमातून महिलांचे प्रशिक्षण राबविण्यात आल्याची नोंद असताना, प्रत्यक्षात कोणतेही प्रशिक्षण झाले नसल्याचा दावा संबंधित महाविद्यालयाने केला आहे.

महाविद्यालयाने यापूर्वीच स्पष्ट केले आहे की, संस्थेसोबत कोणताही कायदेशीर MoU झाला नव्हता आणि प्रशिक्षणासाठी कोणताही निधीही प्राप्त झाला नव्हता. त्यामुळे प्रशिक्षणाच्या नावाने शासनाचा निधी नेमका कुठे खर्च झाला, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकरणात ३० एप्रिल २०२६ रोजी तत्कालीन सहायक आयुक्त प. भ. जाधव यांनी विभागीय उपआयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, अमरावती यांना सादर केलेल्या अहवालाबाबतही विविध स्तरावर चर्चा सुरू आहे. काही तक्रारदारांकडून हा अहवाल वस्तुस्थिती न दर्शविणारा असून शासनाची दिशाभूल झाल्याचा आरोप केला जात आहे. या आरोपांबाबत तत्कालीन सहायक आयुक्त प. भ. जाधव यांची प्रतिक्रिया जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केल्याची माहिती समोर आली. दरम्यान, पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिल्याचे यापूर्वी सांगण्यात आले होते. मात्र त्या चौकशीचे पुढे काय झाले, अहवाल सादर झाला का, दोषींवर कोणती कारवाई झाली, याबाबत अधिकृत माहिती अद्याप सार्वजनिक झालेली नसल्याने महिला आणि नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी स्वतः या प्रकरणात लक्ष घालून स्वतंत्र चौकशीचे आदेश द्यावेत, तसेच कौशल्य विकास विभागाचा मूळ आणि संपूर्ण अहवाल जनतेसमोर जाहीर करावा, अशी मागणी होत आहे. अन्यथा या प्रकरणी व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशारा तक्रारदारांकडून देण्यात येत असल्याची माहिती समोर येत आहे.

# जंतर-मंतर लाठीचार्ज प्रकरणी अमित शहा, धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दारव्हा, दि. २४ :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ दारव्हा तालुका महाविकास आघाडी, मित्रपक्ष, विविध सामाजिक संघटना व विद्यार्थी संघटनांनी शुक्रवारी उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन सादर केले.

या निवेदनातून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, तसेच नीट सह विविध स्पर्धा परीक्षा मधील कथित पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनीही तत्काळ पदाचा राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणे अत्यंत निषेधार्ह असून या घटनेमुळे देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. तसेच नीटसह विविध स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर परिणाम झाला असून देशातील परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. या दोन्ही प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित मंत्र्यांविरुद्ध आवश्यक कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष राहुल ठाकरे, दारव्हा तालुका काँग्रेस प्रेस कमिटीचे अध्यक्ष गजानन बिबेकर, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय गाडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य पंढरीनाथ सिंहे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) तालुकाध्यक्ष संजय शेळके, युवक काँग्रेसचे अतुल राजहंस, मसूद खान, लोकसभा बहुजन मुक्ती पक्षाचे विनोद मुथाने, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक सरफराज खान यांच्यासह विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनावर विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या करून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

# रेतीमाफियांचे साम्राज्य चार वर्षांपासून बेकायदा ठिय्यांवर प्रशासनाचे मौन..!

## महसूल व पोलीस विभागाच्या भूमिकेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. २४ :** दिग्रस शहरात गेल्या चार वर्षांपासून बेकायदा रेती साठवणूक आणि विक्रीचा प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. शासनाने रेती उत्खनन, साठवणूक व विक्रीसंदर्भात कठोर नियम लागू केले असतानाही शहरातील विविध भागांत खुलेआम रेतीचे ठिय्ये सुरू असल्याचा दावा नागरिक करत आहेत.

या प्रकाराकडे महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोपही नागरिकांनी केला असून, संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, शहरात ट्रकच्या ट्रक काळी आणि पिवळी रेती आणून दिवसाढवळ्या विक्री केली जात आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या व्यवहारांवर संबंधित यंत्रणांची नजर कशी नाही, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. कायद्याची अंमलबजावणी सर्वसामान्य पुरतीच मर्यादित आहे का, अशी संतप्त प्रतिक्रियाही व्यक्त होत आहे. काही नागरिकांनी महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. शहरात सुरू असलेल्या या प्रकारामुळे प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. तथापि, या आरोपांबाबत संबंधित विभागाकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही. नागरिकांनी जिल्हाधिकारी स्तरावर स्वतंत्र चौकशी समिती नेमून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी, बेकायदा रेती ठिय्यांवर तातडीने कारवाई करावी आणि दोषी आढळणाऱ्या व्यक्तींसह संबंधित अधिकाऱ्यांवरही नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. चौकशीनंतर वस्तुस्थिती जनतेसमोर आणून प्रशासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## थोडक्यात




### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी युवा संमेलन उत्साहात संपन्न..!

**१२१ युवकांचा सहभाग राष्ट्रनिर्मितीसाठी सेवा.**

**वणी :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रममालेंतर्गत वणी येथील एस.बी. लॉन येथे युवा संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. १६ ते ३५ वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थी व विविध क्षेत्रातील व्यावसायिक अशा १२१ युवकांनी संमेलनात सहभाग नोंदविला. प्रमुख वक्ते म्हणून प्रांत शारीरिक प्रमुख प्रशांतजी दाणी यांनी युवकांनी बदलत्या सामाजिक परिस्थितीत जागरूक राहून देश, धर्म आणि संस्कृतीच्या जतनासाठी त्याग, सेवा व समर्पणाची भावना जोपासावी, तसेच चारित्र्यसंपन्न युवकच देशाची दिशा बदलू शकतात, असे प्रतिपादन केले. उद्घाटन सत्रात नगर संघचालक किरण बुजोने यांनी संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. जिल्हा कार्यवाह दीपक नवले यांनी प्रास्ताविक केले, तर तालुका संघचालक हरिहर भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती. पाच तास चाललेल्या संमेलनात शाखा प्रात्यक्षिके, संवाद, चर्चासत्र, देशभक्तिपर गीत, मैदानी खेळ तसेच पुस्तक, वाद्य व सेवा कार्याची प्रदर्शनी आयोजित करण्यात आली. सुमारे ७० स्वयंसेवकांनी व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळली.



### विद्युत रोहित्र व वाढीव पोल करीता कार्यकारी अभियंता यांना निवेदन

**झरी :** खडकी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या रामपुर या गावी आजपर्यंत स्वतंत्र विद्युत रोहीत्र लागलेले नाही.विद्युत रोहीत्र नसल्यामुळे गावातील विजपुरवठा हे शेतीकरीता असलेल्या विद्युत रोहीत्रावरून गावाकरीता जोडण्यात आले आहे . परंतु शेतातील विद्युत रोहीत्रावरून विद्युत हि जास्त वेळ राहत नाही.वारंवार विजपुरवठा खंडीत होत असते त्यामुळे गावातील ग्रामस्थाचे विद्युत उपकरणे हे निकामी होत आहेत व ग्रामस्थाचे आर्थिक नुकसान होत आहे . या सर्व बाबीचा विचार करून रामपुर या गावाकरीता स्वतंत्र विद्युत रोहीत्र व गावाकरीता विद्युत वाढीव पोल मिळण्यासाठी कार्यकारी अभियंता झरी राजेश झिजीलवार यांना रामपुर ग्रामस्था कडुन निवेदन देण्यात आले निवेदन देताना सामाजीक कार्यकर्ते गणेश बेलेकर , सुरेन्द्र गेडाम , रूतीक लोनगाडगे, श्रेयस डवरे , विठ्ठल निब्रड , सौरभ मोहितकर , पंकज अलाम , समिर निब्रड इत्यादी उपस्थित होते . कार्यकारी अभियंता राजेश झिजीलवार यांनी लवकरात लवकर उपायोजना करण्याचे आश्वासन दिले .

# जंतर-मंतरवरील कथित पोलिस कारवाईच्या निषेधार्थ यवतमाळचे वकील रस्त्यावर"..!

## उच्चस्तरीय चौकशी, विद्यार्थ्यांशी थेट संवाद आणि मागण्या मान्य करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २४ :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या महिनाभरापासून विविध मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित पोलिस लाठीचार्ज आणि बळाच्या वापराचा तीव्र निषेध नोंदवत यवतमाळ जिल्ह्यातील वकिलांनी एकत्र येत जिल्हा न्यायालय ते जिल्हाधिकारी कार्यालय असा पैदल मोर्चा काढला.

द्यिार्थ्यांच्या लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर अशा प्रकारची कारवाई ही लोकशाही मूल्यांना धक्का देणारी असल्याचे मत व्यक्त करत, या घटनेची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना सादर करण्यात आलेल्या निवेदनात, विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी, आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून तोडगा काढावा तसेच शिक्षण आणि परीक्षा व्यवस्थेशी संबंधित प्रलंबित प्रश्न तातडीने निकाली काढावेत, अशी मागणी करण्यात आली. यावेळी ॲड. गोडे, ॲड. गाडबैले, ॲड. रविशेखर बदनोरे, ॲड. राजेंद्र धात्रक, ॲड. जयसिंह चव्हाण, ॲड. राजेश चव्हाण, ॲड. विपिन ठाकरे, ॲड. अमोल बोरखडे, ॲड. बारडकर, ॲड. अजय चमेडिया, ॲड. बजाज, ॲड. धनंजय मानकर, ॲड. नरेंद्र मेश्राम, ॲड. सचिन लोखंडे, ॲड. हर्षवर्धन देशमुख, ॲड. जयपाल पाटील, ॲड. राहुल पाटील, ॲड. प्रशांत किर्दक, ॲड. प्रवीण धूळधुळे, ॲड. कपिल परचाके, ॲड. अनिल बघाडे, ॲड. मनोज इंगडे, ॲड. अतुल वाघ, ॲड. शरण मेश्राम, ॲड. हर्षल राठोड, ॲड. मनीष राठोड, ॲड. वैभव चिचोडकर, ॲड. शोएब शेख, ॲड. विशाल मेश्राम, ॲड. फराज जमील, ॲड. सोहराब खान, ॲड. मुद्दशीर शेख, ॲड. मनीष भगत, ॲड. तौसिफ अली, ॲड. सय्यद, ॲड. निलय माहुरे, ॲड. रजनी मेश्राम, ॲड. निकत खान, ॲड. श्रेया आनंद, ॲड. अबोली भगत, ॲड. जागृती तिवारी, ॲड. श्रेया मत्तेवार, ॲड. आयेशा खान, ॲड. पायल मुनेश्वर, ॲड. प्रज्ञा बोबडे, ॲड. भाग्यश्री खडसे, ॲड. वैशाली शेंद्रे, ॲड. ममता डोईफोडे, ॲड. प्रतीक्षा भगत, ॲड. अंकिता आसकर यांच्यासह १५० हून अधिक वकील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पेपरफुटी, बेरोजगारी अन् शेतकरी प्रश्नांवर मनसेचा एल्गार..!

## शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २४ :** दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थी व युवकांच्या आंदोलनाला पाठिंबा देत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पुसद तहसील कार्यालयासमोर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केले. परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमितता, पेपरफुटी आणि वाढती बेरोजगारी यासाठी केंद्र सरकारला जबाबदार धरत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.स्पर्धा व शैक्षणिक परीक्षांमध्ये पारदर्शकता, परीक्षा शुल्क ₹०० पेक्षा जास्त नसावे, युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, तसेच शेतमालाला हमीभाव, पीकविमा व नुकसानभरपाई तातडीने मिळावी, अशा मागण्याही करण्यात आल्या. विद्यार्थी, युवक आणि शेतकऱ्यांचे प्रश्न शासनाने तातडीने सोडवावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला. मनसे पदाधिकाऱ्यांसह विविध राजकीय पक्ष, शेतकरी संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी उपोषणाला उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला. मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री यांच्याकडे सादर करण्यात आले.

# यवतमाळ आर्णी माहुर किनवट आदिलाबाद रेल्वे मार्ग बनण्यासाठी पाठपुरावा करू

## (खा.प्रतिभा धानोरकर यांचे प्रतिपादन,दत्तशिखर येथे रेल्वे कृती समितीची विचार विनिमय बैठक संपन्न)

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे



**महागाव, दि. २४ :** यवतमाळ - आर्णी - हिवरा - माहुर किनवट - आदिलाबाद रेल्वे मार्ग निर्माण करण्यात यावा याकरिता शासन दरबारी पाठ पुरावा करू असे प्रतिपादन चंद्रपुर - आर्णी लोकसभा मतदार संघाच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केले आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तेलंगणा राज्यात आपला शेतमाल विक्रीसाठी नेता यावा तसेच भगवान दत्त प्रभु यांचे जन्मस्थान, महासती अनुसया माता,साडेतीन शक्तीपीठांपैकी एक माता रेणुका ,प्राचीन पांडव लेण्या ,दत्त प्रभूंचे निद्रस्थान देवदेवेश्वर, अष्टादश शक्तिपीठांपैकी आठवे शक्तिपीठ श्री एकविरा देवी संस्थान यांसारख्या ठिकाणी देशभरातील भाविक,पर्यटकांना येण्याकरीता त्याच प्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शहरात जाण्यासाठी सोयीचा ठरणारा यवतमाळ - आर्णी - हिवरा- माहुर - किनवट - आदिलाबाद रेल्वे मार्ग निर्माण करण्यात यावा याकरिता आपण रेल्वे कृती समितीच्या सोबत असुन हा मार्ग होण्यासाठी आपण केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे प्रतिपादन खा.प्रतिभाताई धानोरकर यांनी केले आहे. हा रेल्वे मार्ग होण्यासाठी रेल्वे कृती समितीच्या वतीने श्री दत्त शिखर संस्थान येथे विचार विनिमय सभा आयोजित करण्यात आली होती. या वेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना त्या बोलत होत्या. यावेळी किसनराव वानखेडे,(आमदार उमरखेड विधानसभा), राजुभाऊ तोडसाम(आमदार राळेगाव आर्णी),डॉ. सौ.आरतीताई फुपाटे(जिल्हाध्यक्षा,भाजपा पुसद जिल्हा),प्रकाशराव पाटील देवसरकर,(माजी आमदार),विजयराव खडसे(माजी आमदार.), नामदेवराव ससाने(माजी आमदार) शिवाजीराव राठोड( माजी जि.प.सदस्य),साहेबराव पाटील हिवरेकर(माजी जि.प.सदस्य.), जितेंद्र मोघे(माजी जि.प.सदस्य), फिरोज डोसानी(नगराध्यक्ष माहूर.),केने महाराज,आरिफ बेग(प्रदेश उपाध्यक्ष,काँग्रेस),डी.बी.नाईक(माजी सभापती,प.स.महागाव.), अर्जुनराव आडे(माजी जिल्हा परिषद सदस्य.),दीपकराव आडे(माजी सभापती,बाजार समिती महागाव),जगदीशराव नरवाडे, (संस्थापक अध्यक्ष जन आंदोलन आधार संघर्ष समिती), प्रदीपराव नरवाडे(काँग्रेस जिल्हा सरचिटणीस.),बेबीताई प्रदीप नाईक(ज्येष्ठ नेत्या,राष्ट्रवादी काँग्रेस), समाधान जाधव(माजी उपाध्यक्ष,जिल्हा परिषद नांदेड),अर्चित नाईक(युवा नेते) यांच्यासह मान्यवर मंडळी उपस्थित होती.

# जंतर-मंतरवरील कथित लाठीहल्ल्याचा उमरखेड काँग्रेसकडून तीव्र निषेध

## पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांची माफी मागावी, शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २४ :** नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान झालेल्या कथित लाठीहल्ल्याचा निषेध करत उमरखेड काँग्रेसने दोषी पोलिसांवर कठोर कारवाई, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे. यासंदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, २१ जुलै २०२६ रोजी देशभरातील विद्यार्थी शैक्षणिक हक्क, रोजगाराच्या संधी आणि परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकतेसह विविध मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करत होते. मात्र आंदोलनादरम्यान झालेला कथित लाठीहल्ला लोकशाही मूल्यांना धक्का देणारा असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. तसेच विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी गेलेल्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावरील कथित कारवाईचाही निषेध नोंदविण्यात आला. काँग्रेसने नीट पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा, कथित गैरवर्तन करणाऱ्या पोलिसांवर कारवाई, विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय तसेच संविधानाने दिलेल्या शांततापूर्ण आंदोलनाच्या अधिकाराचे संरक्षण करण्यासह सात प्रमुख मागण्या केंद्र सरकारसमोर मांडल्या आहेत. यावेळी माजी प्रदेश सरचिटणीस तातू देशमुख, शहराध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल, तालुकाध्यक्ष अनिल कदम, सोनू खतीब, गोपाल अग्रवाल, दत्तराव शिंदे,शिवाजी वानखेडे,गजानन देशमुख,खाजा कुरेशी अभय पवार,यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# नागरिकांपर्यंत पोहोचून सेवा देण्यासाठी उपक्रम-पालकमंत्री

## पालकमंत्र्यांची तीन महाराजस्व शिबिरांना उपस्थिती

**अमरावती/का.प्र.**

शासकीय सेवा नागरिकांपर्यंत पोहोचून देण्यासाठी राज्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना विविध सोयी या उपक्रमात उपलब्ध करून देण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आणि माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त नागरिकांपर्यंत सेवा पोहोचवण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

जिल्ह्यात एकाच दिवशी तिवसा, अमरावती आणि चिखलदरा या तीन ठिकाणी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महाराजस्व शिबिराला भेट दिली. तिवसा येथील कार्यक्रमात पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, शिवाजी महाराजांचा आदर्श ठेवून लोकाभिमुख आणि पारदर्शी प्रशासन राबविण्यासाठी महाराजस्व शिबिर घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्ती आणि विज बिल माफ करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार या आश्वासनांच्या पूर्तता करणे सुरू झाले आहे. ३५ लाख शेतकऱ्यांची कर्जमुक्ती होणार असून पहिल्या टप्प्याला सुरुवात झाली आहे. तसेच गेल्या पंधरा वर्षातील विज बिल माफ करण्यात आले असून याचा लाभ ४५ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांना फायद्याचे ठरणारे पांदण रस्ते राबविण्यावर भर देण्यात येणार आहे.

जिल्ह्यात राबविण्यात आलेला महसुली तंटामुक्त गाव अभियान राज्यस्तरावर राबविण्यात येणार आहे. यामुळे गावातील तंटे कमी होण्यास मदत होईल. त्यासोबतच शेतीमध्ये काम करणाऱ्या मजुरांनाही शेतकऱ्यांचा दर्जा देण्यात येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना मिळणारे सर्व लाभ त्यांना मिळू शकतील. जिल्ह्यातील बोगस बियाण्याबाबत कठोर कारवाई करण्यात आली असून कंपनीविरुद्ध ३५ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई आणि दुबार पेरणीसाठी मदत दिली जाणार आहे, असे सांगितले.तिवसा येथील कार्यक्रमाला आमदार प्रविण पोटे, राजेश वानखेडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



अमरावती येथील कार्यक्रमात इर्विन चौकातील जमीन संपादन करण्यास यश मिळाले असून या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्वांग सुंदर स्मृतीस्थळ उभारण्यात येणार आहे. यासाठी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. याठिकाणी असलेली जागा लवकर तब्येत घेऊन विदर्भातील सुंदर स्थळ उभारण्यात येईल. त्यासोबतच अमरावती शहरात सीसीटीव्हीचे जाळे विणण्यात येणार असून अमरावती सुरक्षित करण्यावर भर देण्यात येईल, असे सांगितले. अमरावती येथील कार्यक्रमाला आमदार किरण सरनाईक, रवी राणा, नवनीत राणा, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे आदी उपस्थित होते.

चिखलदरा येथील कार्यक्रमात बावनकुळे यांनी मेळघाटसारख्या दुर्गम भागात वीज पोचवण्याचे कार्य करण्यात आले आहे. तसेच २२ गावांसाठी सौरऊर्जेमार्फत वीज पोहोचवण्यासाठी निधी देण्यात आला आहे. त्यासोबतच स्वतंत्र वीज उपकेंद्र मंजूर करण्यात आले आहे. आदिवासींच्या वनपट्ट्यांना नियमित करण्यासाठी सात ई आणि बारा ई मध्ये आणण्यात येणार आहे. येत्या तीन महिन्यात वनपट्ट्यांबाबत कारवाई करण्यात येणार आहे. मेळघाटच्या विकासासाठी इको टुरिझम विकसित करण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक निधी देणार आहे. रोजगार निर्मितीसाठी उपाय करण्यात येणार आहे. चिखलदरा पर्यटन विकास आराखडा तयार करण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. लवकरच ही कामे पूर्ण करण्यात येणार आहे. यावेळी आमदार प्रविण पोटे, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखेडे, नवनीत राणा, नगराध्यक्ष शेख अब्दुल उपस्थित होते.

महाराजस्व अभियानाच्या निमित्ताने नगरसेवक आल्हाद कलोती यांच्या संकल्पनेतून चिखलदरा येथे हृदयरोग तपासणी करण्यात आली. यात एक ते अठरा वयोगटातील १५ हजार रुग्णांची टुडी इको तपासणी करण्यात आली. यातील गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांना पूर्ण मदत केली जाणार असून उपचाराचा खर्च शासनातर्फे केला जाणार आहे. जिल्ह्यातील आजच्या तीनही महाराजस्व अभियानात योजनेतील लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरूपात लाभाचे वाटप करण्यात आले.

# बाजार चौकात विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी सर्वपक्षीय स्वाक्षरी मोहीम

**लेहेगाव/वार्ताहर**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध स्पर्धा परीक्षा व भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार, पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी, युवक व युवतींवर करण्यात आलेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ नेरपिंगळाई येथील बाजार चौकात सर्वपक्षीय विद्यार्थी, पालक, सामाजिक, शैक्षणिक, शेतकरी व राजकीय कार्यकर्त्यांच्या संयुक्त विद्यमाने निषेध सभा, स्वाक्षरी मोहीम आणि जाहीर सभा घेण्यात आली.

या आंदोलनाला गावातील विविध संघटना, पक्ष व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सभेच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आदी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा निषेध व्यक्त करत स्वाक्षरी मोहिमेला सुरुवात झाली. उपस्थित नागरिकांनी मोठ्या संख्येने स्वाक्षऱ्या करून विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा दर्शविला. यावेळी वक्त्यांनी सांगितले की, देशातील लाखो विद्यार्थी अनेक वर्षे कठोर परिश्रम करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. मात्र वारंवार होणारी पेपरफुटी, परीक्षा रद्द होणे, निकालातील विलंब, भरती प्रक्रियेतील अनियमितता आणि



**राष्ट्रपतींना तहसीलदारामार्फत निवेदन**

त्यानंतर न्याय मागणाऱ्या विद्यार्थ्यांवर होणारी दडपशाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निराकरण करण्याऐवजी त्यांच्यावर लाठीमार करणे हे लोकशाही मूल्यांना काळिमा फासणारे असून अशा प्रकारच्या दडपशाहीचा सर्व स्तरातून निषेध करण्यात आला.

यावेळी नागरिकांनी स्वाक्षरी केलेले निवेदन भारताच्या राष्ट्रपतींना उद्देशून मोर्शीच्या तहसीलदारांमार्फत पाठविण्यात आले.

निवेदनात दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, परीक्षा घेणाऱ्या यंत्रणांच्या कार्यपद्धतीची चौकशी करून आवश्यक सुधारणा कराव्यात, परीक्षा व भरती प्रक्रिया पारदर्शक, विश्वासार्ह व सुरक्षित करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारावी, तसेच परीक्षा प्रक्रियेतील अनियमित तेमुळे प्रभावित विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. तसेच संबंधित प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. आंदोल नात अमर मालगे, शेख साजीद शेख नझीर, सुमेध तायवाडे, लोचन डोंगरे, नरेश भोजने, राहुल कनेर, किरण अडणे, राहुल इंगळे, राजेश सावरकर, गौरव गोबाडे, निखील झोलेकर, राहुल मंगळे, सुरज अवचार, नरेंद्र फसाटे, गजानन तायवाडे, विलास खासबागे, संजय मोहोकर, चंद्रकांत देशमुख, अफसर खान पठाण, पुण्यवर्धन राऊत, अरुण पातुरकर, रमा इंगळे, अल्पजा बडासे, मंगला मंगळे, दिलीप पांडे यांच्यासह सर्वपक्षीय विद्यार्थी, पालक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# रूफटॉप सोलर योजनेने उजळणार गरिबांचे घर

## अवघ्या २,५०० रुपयांत वीज बिलातून सुटका

### योजनेचा लाभ घेण्याचे महावितरणचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) ,तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील घरगुती वीज ग्राहक ज्यांचा वीज वापर महिन्याला १०० युनिटपेक्षा कमी आहे. अश्या ग्राहकांना कायमस्वरूपी वीजबिलातून दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलार (स्मार्ट)' योजना सुरू केली आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य शासनाच्या एकत्रित अनुदानामुळे बीपीएल ग्राहकांना अवघ्या २,५०० रुपयांत १ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारता येणार आहे.

'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर योजना राबविण्यात येत असून, पात्र नागरिकांनी त्वरित अर्ज करावेत, असे आवाहन मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी केले आहे.अमरावती परिमंडळातील ४ लाख ३९ हजार ८०९ ग्राहक या योजनेसाठी पात्र आहेत. यात अमरावती जिल्ह्यात २ लाख १३ हजार ५९२ आणि यवतमाळ जिल्ह्यात २ लाख २६ हजार २५७ ग्राहकांचा समावेश आहे. प्रारंभी वर्ष २०२६ - २७ ला परिमंडळातील १९ हजार ४३ लाभार्थ्यांना योजनेत सहभागी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यात दारिद्र रेषेखाली पात्र असलेल्या २ हजार ८८ ग्राहकांचा समावेश असून सर्वसामान्य ग्राहकांची संख्या १६ हजार ९५५ आहे.

१ किलोवॅट सौर प्रकल्पासाठी अंदाजे ५० हजार रुपये खर्च येतो. केंद्र सरकारच्या 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' अंतर्गत ३० हजार रुपयांचे अनुदान मिळते. त्यावर राज्य शासनाकडून बीपीएल लाभार्थ्यांना १७,५०० रुपये अतिरिक्त अनुदान दिले जाणार आहे.त्यामुळे या ग्राहकांना केवळ २५०० रूपयेच आपला लाभार्थी हिस्सा भरायचा आहे. त्याच प्रमाणे अनुसूचित जाती-जमातींसाठी राज्यशासनाचे अतिरिक्त अनुदान १५ हजार रूपये असल्याने या वर्गवारीतील लाभार्थ्यांना ५ हजार रूपये भरून योजनेचा लाभ घेता येतो, तर इतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील लाभार्थ्यांना १० हजार रूपये भरून योजनेचा लाभ घेता येणार आहे.

परिमंडळात ८ हजार ८२ नागरीकांनी या योजनेत लाभ घेण्यासाठी अर्ज केला असून त्यांची तांत्रिक बाबिंचा सर्वे करून मान्यता देण्यात आली आहे. परंतू केवळ ३ जणांनीच सहभागी होण्यासाठी आवश्यक रकमेचा भरणा केला आहे.योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार घरगुती वीज ग्राहक असणे, वैध वीजजोडणी, छतावर सौर पॅनेल बसविण्यासाठी जागा, मागील १२ महिन्यांचा सरासरी वीजवापर १०० युनिटपेक्षा कमी असणे आणि यापूर्वी कोणत्याही सौर अनुदानाचा लाभ न घेतलेला असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांना भारतीय बनावटीच्या आयईसी प्रमाणित सौर पॅनेलसह पाच वर्षांची मोफत देखभाल दिली जाणार आहे.

या प्रणालीमुळे वीजबिल जवळपास शून्यापर्यंत येण्याबरोबरच अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्न मिळविण्याची संधीही ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. पात्र ग्राहकांनी राष्ट्रीय सौर पोर्टलवर नोंदणी करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.


## श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात

# 'रस्ता सुरक्षा-जीव सुरक्षा' विषयावर जनजागृती व मार्गदर्शन

**अमरावती/का.प्र.**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती तथा शहर वाहतूक शाखा पोलिस स्टेशन, गाडगे नगर यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे 'रस्ता सुरक्षा – जीव सुरक्षा' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी विशेष जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करणे, सुरक्षित प्रवासाचे महत्त्व पटवून देणे तसेच भविष्यात जबाबदार नागरिक म्हणून वाहतुकीचे नियम पाळण्याची सवय लावणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्रसाद देशमुख होते.त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून अशा जनजागृतीपर उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेची जाणीव अधिक दृढ होऊन त्याचा सकारात्मक परिणाम समाजावरही होईल, असा विश्वास व्यक्त केला.यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या प्रतिनिधी ऐश्वर्या



बलखंडे यांनी विद्यार्थ्यांना रस्त्यावर सुरक्षितपणे चालण्याचे नियम, झेब्रा क्रॉसिंगचा योग्य वापर, वाहतूक सिग्नलचे महत्त्व, रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी, सायकलस्वारांनी पाळावयाचे नियम तसेच वाहतुकीदरम्यान मोबाईलचा वापर टाळण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यानंतर शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक विनोद धोटे व अनंत लोखंडे यांनी वाहतुकीचे नियम मोडल्यास होणारे दुष्परिणाम, हेल्मेट व सीटबेल्टचा अनिवार्य वापर, वाहन परवाना व आवश्यक कागदपत्रांचे महत्त्व, अल्पवयीनांनी वाहन चालविण्याचे धोके तसेच अपघात घडल्यास नागरिकांनी कोणती जबाबदारी पार पाडावी याबाबत अत्यंत सोप्या भाषेत आणि प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. संपूर्ण मार्गदर्शन सत्र विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व उपयुक्त ठरले असून उपस्थित विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला.

समारोपाप्रसंगी मुख्याध्यापक देशमुख यांनी विद्यार्थ्यांकडून वाहतूक नियमांचे प्रामाणिकपणे पालन करण्याची तसेच स्वतः सुरक्षित राहून इतरांनाही सुरक्षिततेचा संदेश देण्याची प्रतिज्ञा करून घेतली. स्वागत किशोर सोनकुसरे,शिक्षिका चौखंडे यांनी केले.संचालन शारीरिक शिक्षक विस्मय ठाकरे यांनी केले. याप्रसंगी शालेय वाहन चालक संघटनेचे श्री. रंगारी, कय्युम खान, नंदू खताळे, धनंजय ढोके, बागल, गौरव लिंघोट, मयूर काळे, चौरसिया, हिवराळे, स्वप्नील धर्माळे, अतुल वाकोडे, काळबांडे व दाभाडे यांचीही विशेष उपस्थिती लाभली. तसेच विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.


# श्री ह.व्या.प्र. मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाला

## यूजीसी व विद्यापीठाची अधिकृत मान्यता

**अमरावती/का.प्र.**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, अमरावती या महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'स्वायत्त' महाविद्याल याचा दर्जा प्रदान केला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील ही अत्यंत अभिमानास्पद आणि ऐतिहासिक उपलब्धी मानली जात असून, यामध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सहकार्य आणि सकारात्मक भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे.

श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाने स्वायत्त दर्जासाठी सादर केलेला प्रस्ताव संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शिफारस केल्या नंतर विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) कडून स्वायत्त दर्जा प्रदान करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. यासंदर्भात विद्यापीठाने अधिसूचना प्रसिद्ध केलेली आहे. स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्यामुळे महाविद्यालयाला अभ्यासक्रम रचना, मूल्यांकन पद्धती, उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविता येणार आहेत. विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, आधुनिक अभ्यासक्रम आणि रोजगाराभिमुख संधी उपलब्ध



करून देण्यासाठी या दर्जाचा मोठा लाभ होणार आहे. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, प्रा. दीपाताई कान्हेगावकर यांनी अमरावती विद्यापीठाचे आभार तर अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. दाळू, विभागप्रमुख, प्राध्यापक व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे. हे यश मंडळाचा गौरव वाढवणारे असून मंडळाचे समस्त पदाधिकारी, प्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि विद्यार्थ्यां मध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### सिंधु मनोहर यांचे निधन

अमरावती-गुरुदेवनगर येथील रहिवासी सिंधु पंजाबराव मनोहर (वय ८१) यांचे १९ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. यांचे पश्चात चार मुले प्रशांत,



अविनाश, सुधीर,सतीश व मुलगी विना व बराच मोठा आप्तपरिवार आहे. सर्व अभियान अंतर्गत विषय साधनव्यक्ती सतीश मनोहर यांच्या त्या आई होत्या. त्यांच्या निधनाने कुटुंबीय, आप्त व मित्रपरिवारावर शोककळा पसरली आहे.

# संक्षिप्त

### गुरुपौर्णिमा पर्वानिमित्त 'चंदन-उटी' उत्सव

**चांदूर रेल्वे-** तालुक्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र सावंगा (विठोबा) येथे आषाढी गुरुपौर्णिमा पर्वानिमित्त पारंपरिक 'चंदन-उटी' उत्सव व गुरुपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने २९ जुलै बुधवार रोजी दु.४ वा. हजारो भाविकांच्या उपस्थितीत चंदन-उटी सोहळा पार पडणार आहे. त्यानंतर ३० जुलै गुरुवार रोजी सकाळी गुरुपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.नुकत्याच पार पडलेल्या निज ज्येष्ठ अमावस्येच्या चंदन-उटी उत्सवाला हजारो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला होता. कापूर प्रज्वलित करून आपल्या मनोकामना व्यक्त करत भाविकांनी भक्तिमय वातावरणाचा अनुभव घेतला.संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल, तसेच विश्वस्त वसंत शेंडे,गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रवीण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर आणि स्वप्नील चौधरी उपस्थित राहणार असून, विश्वस्त मंडळ उत्सव यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहे.कार्यक्रमानंतर संस्थानच्या महाप्रसाद (अन्नदान) समितीच्या वतीने बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.अमरावती आणि चांदुर रेल्वे येथून श्रीक्षेत्र सावंगा विठोबा करिता नियमित दररोज सकाळी आणि संध्याकाळी एस.टी.बसेस चालू असून भाविकांनी अवैध वाहनांनी प्रवास न करता एस.टी.बसनी सुरक्षित प्रवास करून एस.टी.महामंडळला सहकार्य करावे,अशी भाविकांना विनंती करण्यात आली आहे.

### शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती-** शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम १६३ (१)(२)(३) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. सदर आदेश २२ जुलै ते दि. ५ ऑगस्टच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी कळविले आहे.

### विधी स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यशाळा

**अमरावती-** जिल्हा व सत्र न्यायालय येथे विधी स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. सदर कार्यशाळेला ७३ नवनियुक्त विधी स्वयंसेवक प्रशिक्षणासाठी प्रत्यक्षरित्या, तसेच तालुकास्तरावर नवनियुक्त २०७ विधीस्वयंसेवक आभासी पद्धतीने उपस्थित होते.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या उज्वला नंदेश्वर, जिल्हा व सत्र न्यायालय जिल्हा न्यायाधीश ए. जी. जोशी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, तसेच जिल्हा सहकारी वकील परिक्षीत गणोरकर यांचे हस्ते उद्घाटन झाले.यावेळी उज्वला नंदेश्वर यांनी विधी स्वयंसेवक यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देऊन स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये विधी स्वयंसेवक यांना विविध विषयावर प्रमुख वक्ते यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेमध्ये विधी स्वयंसेवक यांना ॲड. सपना काळे,विधळे, पॅनल अधिवक्ता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती सखी वन स्टॉप सेंटरच्या समुपदेशिका वर्षा देशमुख, सायबर सेलचे निखील माहुरे,प्रा. रचना पिंपळगावकर,महिला व बाल कल्याण समितीच्या सदस्या सुचिता बर्वे, वाहतुक शाखेच्या पोलीस निरीक्षक दीप्ती ब्राम्हणे, समुपदेशिका वनिता राऊत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयामधील उपमुख्य अधिवक्ता ॲड. अमित सहारकर, पंजाबराव विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

### लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांना अभिवादन

**अमरावती-** लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अधिक्षक निलेश खटके यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी लोकमान्य टिळक यांच्या राष्ट्र निर्मितीतील योगदानाला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा जागर करण्यात आला. यावेळी अन्य अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.



### वाचनालयात लोकमान्य टिळक जयंती

**तिवसा-** श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयामध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने वाचनालयात विशेष अभिवादन व फोटो पूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यानंतर उपस्थित मान्यवरांनी व विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्यलढ्यातील आणि पत्रकारितेतील अमूल्य योगदानाचा गौरव केला. कार्यक्रमाला वाचनालयाचे ग्रंथपाल, सर्व संचालक मंडळ, वाचक वर्ग आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला विशाल गडलिंग, हृषीकेश गंधे, अनिकेत पांडे, मोनाली येवले, प्रणाली कमळापुरे, प्रिया डहाके,आचल मुंदाणे, रुपाली राऊत व इतर वाचक वर्ग उपस्थित होते.



# मीठ ते Neet...

***मूठभर मीठ हातात घेऊन लढलेल्या फकिराने ब्रिटीश साम्राज्याला हादरून सोडल. ज्यात लाल, बाल,पाल आणि भगतसिंग, नेताजीसारखे शूरवीर फकिरासोबत होते. मात्र आज NEET च्या निमित्ताने 'झोळी चा फकीर' पोलीस यंत्रणेची पॉलिसी वापरत आहे.***




तिच्या पार्श्वभागावर ज्या पोलिसाने दांडा वापरण्याचा प्रयत्न केला; त्याच्या मानसिकतेची पोलीस प्रशासनाने दखल घेतली नाही तर या देशातील युवा पिढी उत्तरे देण्यासाठी सक्षम आहे.२० जुलै २०२६ रोजी घडलेल्या आंदोलन दरम्यान प्रसारित झालेला दिल्लीतील व्हिडिओने हे स्पष्ट केले की ज्यांचेवर रक्षणाची जवाबदारी सोपवली त्यांच्याकडून असे दृष्कृत्य झाले याची दखल घ्यायला पाहिजे.१२ मार्च १९३० मध्ये देशातील जनतेचे प्रतिनिधित्व स्वीकारून ज्या फकिराने पदयात्रा सुरू केली. तो विषय अगदी तकलादू आहे असे समजून त्या फकिराचा उपहास केला.मात्र त्या फकिराने आपले उदिष्ट कायम ठेवत प्रवास सुरू ठेवला आणि ब्रिटिश साम्राज्याचा पाया डगमगायला सुरुवात झाली.

ग.दी.माडगूळकर यांनी यावर गीत लिहिले,'उचलले मीठ मुठभर आणि स्वातंत्र्याचा रचला पाया'.एक फकीर देशातील जनतेला कुठलेही आवाहन न करता फक्त मीठ ह्या अन्न घटकावर सरकारने चढविलेल्या 'करा' विरुद्ध हा सत्याग्रह इतिहासात दांडी यात्रा म्हणून नोंदला गेला.मोतीलाल नेहरू यांनी गांधींना या सत्याग्रहात काय विशेष आहे म्हणून दीर्घ पत्रप्रपंच केला.फकिराने उत्तर लिहून पाठवले 'करीने जूओ'! (करून पहा) तेव्हा सत्याग्रहात सहभागी गर्भश्रीमंत वक्तीने अनुभवले की सत्याग्रह आणि आंदोलन काय असते.कारण २४ दिवस सत्याग्रहात सहभागी झालेल्या मोतीलाल नेहरु यांना ३० जून १९३० मध्ये नैनी मध्यवर्ती कारागृहात ब्रिटिशांनी बंदिस्त केले.यावेळी मुलगा जवाहरलाल नेहरू सुद्धा सोबत होते. सत्याग्रहात सहभागी झाल्यानंतर मोतीलाल नेहरु यांनी फकिराला उत्तर दिले 'करके देखा'! म्हणून उत्तर दिले.कारण यावेळी ब्रिटिश हुकमी भारत होता.साम्राज्य सर्वदूर ब्रिटिशांनी व्यापले होते.कायदे त्यांचे,यंत्रणा त्यांच्या आणि अंमलदार मात्र आमच्या देशातील शिक्षित वर्ग मामलेदार ते सुभेदार पर्यंत सर्व उच्च शिक्षित होते. त्यांच्या कडून देशातील जनतेचे शोषण होत असताना सुद्धा कुठल्याच मुद्यावर आवाज करण्याची ताकद अंमलदार करू शकत नव्हते.

ब्रिटीशांच्या कायद्याला आम्ही मानणार नाही म्हणून फकिराने सविनय कायदेभंग चळवळ लगेच सुरू केली. मिठापासून सुरू केलेला प्रवास पुढे पुढे 'चले जाव'! पर्यंत टिकून राहिला आणि सरते शेवटी आमच्या देशातून १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश राजवट समाप्त झाली. २६ जानेवारी १९५०. पासून प्रजासत्ताक भारताची सुरुवात झाली.असा हा इतिहास अनुभवलेले आजोबा आणि आई वडिलांची पिढी जिवंत आहे.त्यांनी अनुभवलेले राज्य आताची पिढी सुखाने उपभोगत असताना पुन्हा २५जून१९७५ ते २१ मार्च १९७७ या २१ महिन्याच्या कालावधीत आणीबाणी हे राष्ट्रीय अनुशासन पर्व सुरू झाले आणि देशाला हुकूमशाहीचे बळी द्यावे लागले.

सध्या सुमारे पन्नास वर्षाच्या कालखंडात पुन्हा नव्याने देशात सुरू झालेल्या अनामिक आंदोलनात NEET चे निमित्त धारण करून, दिल्ली येथे युवा शक्तीने जोर धरला. त्यामुळे आंदोलनाचे उदिष्ट आणि त्याचे परिणाम याचा थोडा फार अंदाज लावून संभाव्य धोक्यांना टाळता आले तर आंदोलनात बळी जाण्याऐवजी आमचे बळ कसे वाढतील यावर विचार करणारी डोके देशात आहे का ह्याचा विचार नक्कीच केला पाहिजे.कोक्रोज या उपसाहात्मक शब्दाने विद्यमान सरकारच्या विरोधात असलेला असंतोष उग्र झाला हे खरे आहे.परंतु या उद्रेगाचा परिणाम आम्हाला कायमस्वरुपी सकारात्मक करता येईल का?याचे उत्तर नक्कीच देता येईल.

स्वातंत्र्यानंतर आम्ही गमावलेला फकीर आणि धर्म परिवर्तनानंतर दगावलेला विश्वरत्न यांच्या नजरेतून भारताची रचना व्हायला पाहिजे. GEN-Z ने असलेल्या युथने आमच्या देशाचा पूर्ण अभ्यास करून त्याला योगदान देण्याचे कार्य केले,तर आम्ही विद्यमान सरकारला त्वरीतच खाली खेचण्यासाठी सक्षम असू.

स्वातंत्र्यानंतर रचनात्मक भारत हा इथल्याच साधनसमृध्दीने सक्षम करणारे तंत्रज्ञान विकसित व्हावे,म्हणून फकिराने देशाला दिलेली नीती ही स्वाभिमान,मानवी हक्क आणि श्रम सन्मानाची आहे.त्यामुळे देश अठरा पगड जनतेच्या बळावर सक्षम राहील ही छत्रपती शिवबाची संकल्पना स्वराज्य म्हणून स्थापित राहील, यासाठी फकिराने सर्व सेवा संघ ही यंत्रणा स्थापन केली. अठरा पगड एकत्र आले तर मंदिर,मज्जिद,चर्च,गुरुद्वारा,विहार ऐवजी कला,कसब,कसरत,कौशल्य विकसित करण्याची शाळा,महाविद्यालये या देशात तयार होईल.म्हणून बाबासाहेबांच्या मसुद्याचे संविधान आम्ही स्वीकारले.

पंडित नेहरू यांनी रचनात्मक भारताला आधुनिकतेच्या बाजूने नेत जागतिक ओळख निर्माण करून दिली.स्वातंत्र्याच्या सोळाव्या वर्षात नेहरू गेले.'जय जवान जय किसान'चा अजरामर नारा देणारे लाल बहादूर शास्त्रींनी देशाला सांभाळताना त्यांचा सुद्धा सस्पेक्टेड मृत्यू झाला.अशा घटनेत देशातील नागरिकांनी काय परिणाम भोगले याचा इतिहास फार जवळचा आहे. नंतर आणीबाणीत काय झाले.'संपूर्ण क्रांती'चा नारा जयप्रकाश नारायण यांनी लावला.मात्र आज पर्यंत संपूर्ण क्रांतीची प्रतिकृती तयार झाले नाही.त्यामुळे मीठ पासून ते NEET पर्यंत चा आंदोलन प्रवास आपण नीट समजून घ्यायला तयार असेल तर पिढ्यानपिढ्या हे स्वातंत्र आम्ही अबाधित ठेऊ शकतो.नीट परीक्षानिम्मित आपण एकत्र येऊन नीट विचार करून सार्वजनिक कारभार आम्ही चालवण्याची जवाबदारी स्वीकारावी का? मग आमचा जाहीरनामा आम्ही तयार केलेला असावा.विद्यमान सरकार ज्या यंत्रणेच्या आधारावर द्विगृहातून कायदे तयार करून वापरत आहे.त्याला आम्ही स्वीकारत आहे का?

मूठभर मीठ हातात घेऊन लढलेल्या फकिराने ब्रिटिश साम्राज्याला हादरून सोडले ज्यात लाल, बाल,पाल आणि भगतसिंग, नेताजी सारखे शूरवीर फकिरासोबत होते. मात्र आज NEET चे निमित्ताने 'झोळी चा फकीर' पोलिस यंत्रणेची पॉलिसी वापरत आहे.आम्ही भारताचे लोक हे नीट अजूनही समजून घेतले नाही,ज्याने जगभरात भारताच्या आब्रुला बेअब्रू करण्यात उच्चांक गाठला.शिवाय देशातील बुद्धिमान माणसाचा सन्मान फक्त 'यूज अँड थ्रो' ही ट्रीटमेंट बाहेर च्या देशात मिळू लागल्याने आर्थिक मंदीचे बळी म्हणजे 'आत्महत्या' हे नीट ची पेपरफुटीने दिलेली धोक्याची घंटा आहे.मग आम्ही घंटा वाजवत देवळात बसून राहिले तरी आम्ही भारताचे लोक स्वातंत्र उपभोगू शकणार नाही...

उचलले मीठ मुठभर, स्वातंत्र्याचा रचला पायाला तर आता NEET निमित्ताने एकत्र आलेल्या भारतीय युवकांनी पूर्ण संविधानातील अधिकार सोबतच नागरी कर्तव्याची जबाबदारी घ्यावी.स्वतंत्र भारत समजून हिंदू, मुस्लिल,शीख, इसाई,बुद्ध, पारशी मध्ये आम्ही भारताचे लोक असावे,ज्यामुळे सनातनची तणातन थांबेल. बंदुकीचे बळ आपल्या एकीच्या बळाने त्वरित नाहीसे होईल.म्हणून फकिराची अहिंसा या आंदोलनचे कवच होईल.बाबा साहेबांच्या मसुद्याचे संविधान हे कर्तव्य निष्ठेचे प्रमाण राहील.मग आम्ही लोकशाहीच्या चारही स्तंभाला वठणीवर आणू शकतो.मीठ हे नीट वापरात आले तर रक्त दाब स्थिर राहतो. असेच NEET चे आंदोलन हे 'कायदेभंग' चळवळ म्हणून करू कारण जे कायदे लोक हिताचे नसेल ते संपवण्याचा हक्क या देशातीले लोकांना आहे.मीठ हे ताटातील औषध आहे.NEET हे आरोग्याचे औषध ओळख करून देणारी पात्रता आहे.लोकांनी नीट विचार करून स्वराज्य तेव्हढे लक्षात ठेवले तर हा देश जागतिक आदर्श असेल कारण देश अजून लोकांचा आहे. सत्याग्रही फकिराची आणि युद्ध विरामाला बुद्धाची ओळख अजूनही जगात कायम आहे.बाकी सारे अडानी चे सोबती...

**डॉ. प्रवीण कुमार राऊत**
सदस्य भारत सेवक समाज. मो.७७९८६४५५६५

## शिक्षण प्रणालीमध्ये नक्कीच बदल होईल?

'तुझे काहीच कसे मत नाही? तुला गेल्या काही वर्षात झाले काय? भूमिका घ्यायची भीती वाटते आहे का? तिकडे दिल्लीमध्ये काय चालले, तुला काहीच कसा फरक पडत नाही? तू तर मेडिकल स्टुडंट्स सोबत दोन- तीन वर्ष काम केले आहेस, तुला कसे काय काही वाटत नाही?' माझी मैत्रीण काल जंतर-मंतर वरून फोन करून मला बोलत होती.

मी फार आधीपासून हा नियम स्वतःला घातला आहे की कोणत्याही पॉलिटिकल मुद्दयावर सोशल मीडियावर व्यक्त व्हायचे नाही. एकतर त्या सो-कॉल्ड व्यक्त होण्याने काही फरक पडतो असे मला वाटत नाही आणि दुसरे म्हणजे या निमित्ताने लोकांच्या मनातला विखार बाहेर येतो जो मला अजिबात पटत नाही.गेल्या कित्येक दिवसांत नीट परीक्षेच्या पेपरफुटीवरून सुरु झालेल्या प्रकरणाची घौडदौड, लाठीमार,जेन झीची त्यातली इन्व्हॉल्व्हमेंट,मग आंदोलन असे स्वरूप घेईल असे कोणालाही वाटले नसणार. राजकारणाची सगळ्यात खास बात हीच की तवा एकदा गरम झाला की सगळे जण लुटुपुटु त्यावर आपापल्या पोळ्या भाजायला येतात. तवा गरम करण्यासाठी चुलीमध्ये कोणाची लाकडे जळत आहेत याचा कोणीही विचार करत नाही. सगळ्यांचे फक्त 'माझी पोळी कशी भाजून घेता येईल' याच्याकडेच लक्ष असते. पोळी पहिला भाजतो,जाते ती दुसऱ्याच्या पोटात आणि ढेकर तिसराच कोणीतरी देतो.लाकडाची मात्र चुलीमध्ये जाळून राख होऊन जाते. अजून एक गमतीचा भाग असा की पोळी भाजल्यानंतर त्यामुळे कोणाची कुठली भूक भागणार आहे हे पण आपल्याला माहीत नसते. आणि अशा पाच हजार दोनशे अडुसष्ट कारणांमुळे राजकारण या विषयाचा मला तिटकारा आहे.

एखाद्या गोष्टीबद्दल भूमिका घेणे म्हणजे नक्की काय हा फार मोठा प्रश्न आहे. खूपदा असे होते की तुम्ही भीड का एक हिस्सा होऊन जाता. एखादा प्रश्न सोडवायचा असतो तेव्हा लार्जर पिक्चर काय आहे याचा कोणी विचार करते का? नीट सारख्या परीक्षेचा पेपर जेव्हा फुटतो आणि त्यामुळे कित्येक विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होते हा तसा प्रश्न मोठाच आहे आणि गेल्या कित्येक वर्षांपासून हे होते कोणीतरी यावर आवाज उठवला, जेन झी ने ते प्रकरण धरून ठेवले. त्या निमित्ताने कोणतीही अकाउंटेबिलिटी न घेणारी ही तरुण पिढी थोडी जबाबदार बनली ही मला आशेची बाब वाटते.निदान कशासाठी तरी यांना काहीतरी वाटतंय हा या सगळ्या सो कॉल्ड आंदोलनातला मला एक पॉझिटिव्ह पार्ट वाटतो. तुम्हाला सिस्टीममध्ये राहूनच सिस्टीम बदलावी लागते. आता सिस्टम कशी बदलायची हा ज्याचा त्याचा निर्णय आहे. एखाद्या आंदोलनामध्ये सामील होऊन तिथे नारेबाजी करायची किंवा सोशल मीडिया वरती आंदोलन कसे चांगले आहे किंवा कसे मूर्खपणाचे आहे यावर लांबलचक पोस्ट लिहायच्या किंवा आंदोलन करणारे किती मूर्ख आहेत किंवा मग समाज परिवर्तक आहेत हे दाखवून द्यायचे किंवा अमुक एक राजकीय पक्ष हा किती चांगला आहे किंवा वाईट आहे. हे सांगण्यासाठी अगदी आपल्या जवळच्या माणसांना, मित्र मैत्रिणीवर सुद्धा शिंतोडे उडवायला कमी करायचे नाही ...वाटेल ते बोलायचे...हे सगळे जिथे सर्रास चालू आहे तिथे खरंच विद्यार्थ्यांसाठी आपण काय करतो आहोत याचा कोणी विचार करत आहे का? एखाद्या मिनिस्ट्रीचा हेड हा त्या विषयामधले ज्ञान असणारी आणि जाण असणारी सुजाण व्यक्ती असायला हवी हे बेअर मिनिमम आहे आणि आशा आहे यामध्ये निदान आतातरी काही आशादायक बदल घडेल.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरची उभारणी करत असताना,गेली दोन तीन वर्ष, कित्येक मेडिकल सायन्सच्या शिक्षकांसोबत, विद्यार्थ्यांसोबत मी जवळून काम केले आहे.१२ वि नंतर मी स्वतः मेडिकल एन्ट्रन्स एक्झाम दोनदा दिली होती आणि त्यासाठी एक वर्ष मी काढून अभ्यास केला होता. एवढे करूनही मी डॉक्टर होऊ शकले नाही आणि त्याची खंत सुरुवातीची काही वर्ष मला वाटायची. आपल्याकडे डॉक्टरी हि व्हाईट कॉलर समजली जाणारी एक फील्ड आहे पण आता आता बऱ्यापैकी त्याचे बाजारीकरण झाले आहे. लोहाराचा मुलगा लोहार, कामगाराचा मुलगा कामगार, डॉक्टरांचा मुलगा डॉक्टर असे एक गणित इथेही आहेच. आता एखादा सामान्य घरातला विद्यार्थी जेव्हा नीट परीक्षा देऊन,ती पास होऊन एखाद्या गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजमध्ये जातो, तिथे ५-५.५ वर्ष तो घालवतो, त्यानंतर पुन्हा पोस्ट ग्रॅज्युएशनची मेडिकल एन्ट्रन्स एक्झाम देतो. त्या सगळ्या काळामध्ये त्याच्यावर असणारे प्रेशर हे किती जास्त आहे, हे मी काही गेल्या वर्षात फार जवळून पाहिलेय. आई-वडील डॉक्टर नसताना डॉक्टरीचा सो-कॉल्ड व्यवसाय एस्टॅब्लिश करणे ही फार अवघड गोष्ट आहे आणि असे असले तरीही इतकी अवघड एन्ट्रन्स एक्झाम देशभरातले कित्येक मुले जीवाचे रान करून, अभ्यास करून देतात आणि त्या परीक्षेचा पेपर फुटतो आणि त्यानंतर त्या गोष्टीची अकाऊंटेबिलिटी गव्हर्नमेंट घेत नाही, याहून वाईट गोष्ट काहीच असू शकत नाही. याला कोणत्याही प्रकारचा राजकीय रंग देण्यापेक्षा आपण आपली शिक्षण पद्धती कशी सुधारू शकतो, याचा विचार केला गेला पाहिजे. मला व्यक्तिशः माहित



नाही की या आंदोलनामुळे, या कॉकरोच जनता पार्टीमुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये किती अमूलाग्र बदल घडून येणार आहेत, पण मला नक्कीच असे वाटते की या निमित्ताने जर का मनातला एखादा कोपरा जागा झाला असेल, तर आपण ओव्हरऑल शिक्षण प्रणालीमध्ये काय कॉन्ट्रिब्युट करू शकतो, याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे. आज आपल्यातले कित्येक लोके, जे सोशल मीडिया वरती भरभरून पोस्ट लिहित आहेत, ते वेगवेगळ्या शिक्षण संस्थांमध्ये जाऊन या विद्यार्थ्यांना स्वेच्छेने मार्गदर्शन करू शकतात.

शिक्षण पद्धतीमध्ये किंवा विद्यार्थ्यांमध्ये खरंच रिफॉर्म व्हावा असे वाटत असेल तर ज्या कोणत्या फील्डमध्ये तुम्ही आत्ताच्या क्षणी काम करत आहात, त्यांचे ज्ञान तुम्हाला आहे, त्या डोमेन मधली माहिती विद्यार्थ्यांना जाऊन तुम्ही नक्कीच देऊ शकता. आज ढिगभरानेकॉलेजेस सगळीकडे पसरलेले आहेत. कॉलेजेस गेस्ट लेक्चर अरेंज करतात. आपण त्यांना आपला पोर्टफोलिओ पाठवू शकतो की मी अमुक अमुक काम करतो आहे, हा हा माझा एक्सपिरियन्स आहे आणि तुमच्या विद्यार्थ्यांशी मला बोलायला आवडेल. किंवा एखाद्या रिजनल इन्क्युबेशन सेंटरमध्ये जाऊन मला स्टार्टअपसाठी मेंटरशिप करायला आवडेल, मी महिन्यामधला अमुक अमुक तास देऊ इच्छितो, असे तुम्ही सांगू शकता. मी स्वतः स्टार्टअप इकोसिस्टममध्ये काम करते आणि मला हे सांगण्यास फार आनंद होतो की बाहेरच्या देशांमध्ये मेंटरशिपसाठी कित्येक एस्टॅब्लिश्ड करिअर असणारे प्रोफेशनल्स स्वतःहून तयार असतात. पण आपल्या भारतामध्ये मात्र मोठमोठ्या पदांवर असलेले लोक आपल्याच देशातल्या मुलांच्या भवितव्यासाठी महिन्यातले काही तास देखील देऊ इच्छित नाहीत. भूमिका घेणे म्हणजे नक्की काय असतं मला सांगा? जर मला शिक्षण प्रणालीबद्दल कळवळा आहे, मला विद्यार्थ्यांबद्दल वाईट वाटत आहे, तर मोठा मोठ्या पोस्ट लिहून या आंदोलन किती चांगले वा वाईट आहे हे लिहून नक्की काय फरक पडणार आहे?

सो जर तुम्हाला या मुद्द्यांबद्दल खरंच कळवळा असेल, तर याला कुठलाही पॉलिटिकल रंग देण्यापेक्षा मी माझ्या आत्ताच्या पोझिशननुसार विद्यार्थ्यांना काय देऊ शकतो आणि मी काय देतो आहे याचा विचार नक्कीच केला गेला पाहिजे. जेव्हा देशातले विद्यार्थी इन्होवेशन शिकतील, शिक्षण संस्थांमध्ये चांगले लोक जेव्हा रुजू होतील, मुलांपर्यंत योग्य त्या गोष्टी पोहोचतील,फक्त पुस्तकी ज्ञान नाही तर ते व्यवहारिक ज्ञान, डोमेन नॉलेज जेव्हा त्यांना मिळेल, तेव्हा आपण नवीन उद्योजक घडवू, तेव्हा आपण नवीन शास्त्रज्ञ घडवू आणि तेव्हा आपण चेंज मेकर्स घडवू. मला असे वाटते की भूमिका घेणे म्हणजे हे आहे. आज मी ज्या जागी आहे तिथून मी विद्यार्थ्यांसाठी किंवा ही सो कॉल्ड शिक्षण प्रणालीमध्ये बदल घडवण्यासाठी काय करू शकते याचा खरंच विचार करायची आत्ता गरज आहे. ज्यांची मन जागृत आहे त्यांनी या मुद्द्यांसाठी खरंच काहीतरी ग्राऊंड लेव्हलला काम केले पाहिजे. मला आशा आहे की, या निमित्ताने जेनझी रस्त्यावर उतरली आहे सो एखाद्या गोष्टीसाठी वाहून नेणे काय असते हे जरी त्यांना या निमित्ताने कळले तरी ती फार मोठी गोष्ट असेल. तुमच्यापैकी प्रत्येकाने ज्याने या आंदोलनाच्या विरोधात किंवा आंदोलनाच्या बाजूने जी काही मते मांडली आहेत त्या निमित्ताने दुसऱ्यांवरती जे काही शिंतोडे उडवले आहेत ते सगळे बाजूला ठेवून शिक्षण पद्धती अधिक प्रभावी करण्यासाठी, विद्यार्थ्यांपर्यंत चांगल्या गोष्टी पोहोचवण्यासाठी मी काय करू शकतो आणि मी काय करायला पाहिजे याचा विचार केला तर येणाऱ्या काही वर्षात शिक्षण प्रणालीमध्ये नक्कीच बदल होईल असा माझा ठाम विश्वास आहे. आपण मिळून अधिक सजग, क्युरीयस, बुद्धिमान, स्ट्रीट स्मार्ट, इनोव्हेटिव्ह माईंडसेट असणारे, स्वप्न उराशी ठेवून देशाचे नाव जागतिक रिसर्चमध्ये पुढे नेणारे विद्यार्थी निर्माण करू.

**सानिया भालेराव**

## रुख्मिणी रुसली नि...हसली



रुख्मिणी रुसली विठ्ठलावरी।
काही काळजी ना हरिसी बरी।
भक्त करिती पायी वारी ।
शिणले बहू भक्त वारकरी।।

उभा विटेवरी सावळा हरी ।
युगे अठ्ठावीस नरहरी ।
जयजय पांडुरंग हरी ।
गरजे भिमातिरी पंढरी ।।

भक्त आले द्वारावरी ।
विठ्ठलाची पाहुनी घाई ।
बोले विठ्ठलासी रखुमाई ।
भक्त आले पायी द्वारी ।।

भुकेले झाले भक्तमंडळी ।
पाकसिद्धी करते सत्वरी ।
उभे तुम्ही कर कटेवरी ।

आलेऽ होऽ द्वारी तुका नरहरी।।

रुख्मिणी केले पाकसिद्धी ।
लाडू बासुंदी खीर पुरी ।
सुगंध पसरला जो पंढरी ।
विठ्ठल नाचतो विटेवरी ।।

विठ्ठल बोले रुख्मिणीसी, ।
आई तू भक्तांची असशी ।
मग कां काळजी कान्हयासी।
मज आनंद हृदयासी ।।

मृदुंग टाळांचा गजर ।
विठ्ठल नामे जागर ।।
दिंड्यांचा महापूर ।
बेधुंद नाचे गिरिधर ।।

पाहुनी नाचता पांडुरंग ।
भक्तमंडळी हरिनाम गुंग ।।
हसली रुख्मिणी सत्वर ।
हसला विठ्ठल रमावर ।।

**'स्वरचैतन्य' डॉ. मिलिंद इंदूरकर ( मनवा )**
मो.९५५२६०७६४६

## विठ्ठल महिमा

घेता मुखी नाम,कर टाळी
मनाची पापवृत्ती,तो टाळी
अवघे साधू संत,ही म्हणती
नामे भवताप,हो हरती..

विठ्ठल विठ्ठल,म्हणता वाचे
स्पंदने वाढती,हो हृदयाचे
हृदय विकार,त्यांचे टळती
विज्ञानालाही आली प्रचिती..

विठ्ठल विठ्ठल म्हणता वाचे
आपल्या 'बा'चे काय जाते..
नित्य संत्संग,करता घरी
नकारात्मक उर्जा,होते दुरी

चंचल मन,ते स्थिर होई
टेन्शन मनाचे ,निघून जाई
मन करा, रे प्रसन्न
सर्व सिद्धीचे,असे कारण..

**- प्रा अशोक सारडा, मेहकर**
**मो.९४२१३९४३३९**

## 'विठ्ठलाला एक विनवणी'

विठ्ठला..
पंढरीच्या रस्त्यांवर पावलं टेकणाऱ्या विठ्ठला,
तुझ्या मूठभर करुणेच्या सावलीखाली
शेकडो जीवांची आस लपलेली आहे.
'विठ्ठल-विठ्ठल' नादात गुंजणाऱ्या तुझ्या नावाला
आज पुन्हा एकदा हाक देतो.
तू ऐक...तू जाण
कारण आभाळ तुटले आहे
आणि माती तहानलेली आहे..
विठ्ठला...
चांगला पाऊस येऊ दे
शांत,समृद्ध करणारा,
ज्याने धरतीचा पदर ओलाचिंब होईल,
ज्याने वाऱ्याच्या गंधात हिरवळ रुजेल
आणि माणसाच्या डोळ्यांत पुन्हा आशेचा थेंब चमकेल..
शेतकऱ्यांच्या हातांना पुन्हा सुरकुत्यांऐवजी
मृदू धरणीचा माळ लाभू दे,
कुदळीचा आवाज
म्हणूनच तर जीवंत वाटतो,
त्यांच्या घामातून
अन्न जन्मतं.
त्या अन्नाला नांगराची ओळख
आणि तुझ्या कृपेची साथ मिळू दे.
पण विठ्ठला..
फक्त शेतीच नाही
तर....
माणसंही ओलावा हरवून बसली आहेत.
डोळे सुने झालेत,
हृदयाची दारं लावून घेतलीत..
कधीकाळचं 'आपुलकी' नावाचं झाड
सुकून उन्मळून पडलंय कुठंतरी.
विठ्ठला...
माणसांमध्ये माणुसकी रुजव,
धर्माच्या नावावर जळणारे वणवे विझव,
भेदांच्या भिंती पाड
तू जो 'तुका' होता, जो 'नामा',
त्यांच्या शब्दात 'भाव' होता
तो भाव परत दे,
जेणेकरून माणूस माणसाला
पुन्हा मिठीत घेईल,
डोळ्यांतून हसू वाहील
आणि कुणी 'दु:खी' दिसलाच
तर 'आपलाच' समजेल.
विठ्ठला..
निसर्गही आता थांबू पाहतोय.
कधी वादळ,कधी रणरण,
कधी पाण्याचा महापूर...
निसर्गही 'श्वास घेतो',
त्याला दुखतं,
त्याला भीती वाटते
संकट केवळ माणसांवर नाही,
संकट निसर्गावरही आहे..
म्हणून तुला साकडं...
माणसाला सद्बुद्धी दे,
तो स्वार्थाच्या झाऱ्यातून बाहेर पडो
आणि निसर्गाची पाठ थोपटू लागो,
जंगल राखो...
नद्या वाचवो,
जमिनीत हरवलेला माणुसकीचा गंध
पुन्हा शोधो...
बा विठ्ठला...
तू पंढरीचा राजा असला
तरीपण तुझं राज्य
आमच्या हृदयात असावं,
जिथं माणूस आणि निसर्ग
हातात हात घालून
'हे विश्वची माझे घर' म्हणत
एकत्र नांदतील..
विठ्ठला..
पावसासारखी कृपा कर,
निसर्ग हिरवागार कर
आणि
माणसात माणूस जागा कर.
हीच आर्त,उघड, सच्ची प्रार्थना
आज आषाढी एकादशीला
तुझ्या पायांपाशी ठेवतो आहे..
कारण...
तूच माझ्यासाठी
विश्वात्मक देव आहेस!!

**डॉ.प्रमोद गारोडे**
परतवाडा, जि अमरावती
मो ९४०५४२७९६२

## हेल्मेट!

प्रशासन म्हणते दुचाकीवर तुम्ही घालाच हेलमेट ..
समजा पडले..आपटले त
डोकसं..फुटणार नाई थेट!!
ना चालन तुमची मूजोरी
ना चालन विरोध मोर्चे बंड
जितके दिसतीन बोडखे अन
बोडख्या..
साऱ्याहिले करू दंड!!
आता जिथं तिथं उभे करसान तुम्ही..
तुमच्या चेकिंग चे अड्डे
पर पह्यले चष्मा लावू लावू पाहाना
हे हातभर्याचे खोल खड्डे!!
राँग साइड वाल्याहिले ..
तुम्ही कधी कधीच धरता
हाय स्पीड ओव्हरलोड ले
कानाडोया करता!!
बर हेल्मेटची बाकीच्याहिले
करता तुम्ही सक्ती
मंग पगडीवाल्या सरदारजीवर
काहून तुमची भक्ती?
हेल्मेटचा त्याहीले नियम नाई लागू
अन बाकीच्याहिले म्हणता
का दंड भर बाबू!!
म्हणून पावसाळी अधिवेशनात
आता नेते हो असा आग्रह धरा
का हेल्मेट ऐवजी पगडीवाल्याहिले
बिलकुल अलावू करा!!

**राजा धर्माधिकारी**
**परतवाडा**

# मेळघाटात गोवंश तस्करीचा डाव उधळला
# चार बैल जप्त, आरोपी जंगलातून पसार

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वनविभागाची धडक कारवाई; गुन्हा दाखल, आरोपींचा शोध सुरू

■ प्रतिनिधी | हिवरखेड ■

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या संरक्षित वनक्षेत्रातून अवैधरित्या गोवंशाची वाहतूक करण्याचा प्रयत्न वनविभागाने उधळून लावत चार बैल जप्त केले. मात्र, कारवाईची चाहूल लागताच संबंधित आरोपी जंगलाच्या दिशेने पळ काढण्यात यशस्वी झाले. या प्रकरणी भारतीय वन अधिनियम व वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

वनविभागाच्या माहितीनुसार, शुक्रवारी (२४ जुलै) सकाळी साडेसातच्या सुमारास वान वनपरीक्षेत्राचे वनपरीक्षेत्र अधिकारी सुधीर (एस. ए.) आंबेकर व त्यांचे पथक दक्षिण नागरतास बिटातील वनखंड क्रमांक १२६० मध्ये नियमित गस्त घालत होते. त्यावेळी चार बैलांची संशयास्पदरीत्या जंगलातून वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आले. वन कर्मचाऱ्यांनी तातडीने कारवाई करून चारही बैल ताब्यात घेतले. मात्र, आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.



या प्रकरणी भारतीय वन अधिनियम, १९२७ च्या कलम ५२ तसेच वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ मधील कलम २७, २९, ३१ आणि ५१ अन्वये वनगुन्हा क्रमांक ०१/२०२६ दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी वनविभागाने विशेष पथक कार्यरत केले आहे. ही कारवाई उपवनसंरक्षक आर. एस. टोलीया (भा.व.से.) व सहाय्यक वनसंरक्षक जी. पी. टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. मोहिमेत वनपाल आर. के. तायडे, वनरक्षक प्रमिला जावरकर, अर्पिता कास्देकर, राजपाल मावस्कर तसेच वनमजूर सहभागी होते.

### वनक्षेत्रात बेकायदेशीर प्रवेश टाळा

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघांसह विविध वन्यजीवांची संख्या वाढत असल्याने संरक्षित क्षेत्रात बेकायदेशीर प्रवेश, अवैध वनचराई आणि गोवंश तस्करीस सक्त मनाई आहे. वनकायद्यांचे उल्लंघन करणाऱ्यांवर सात वर्षांपर्यंत कारावास व दंडाची तरतूद असल्याचे वनपरीक्षेत्र अधिकारी सुधीर आंबेकर यांनी स्पष्ट केले. वनक्षेत्रात कोणताही संशयास्पद प्रकार आढळल्यास नागरिकांनी १९२६ या टोल-फ्री क्रमांकावर तातडीने माहिती देऊन वनविभागाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

# 'फेक' व्हॉट्सअॅप चॅटचा सापळा

## सामाजिक कार्यकर्त्या व महिला पत्रकाराला बदनाम करण्याचा कट?

**मोबाईल क्रमांक, प्रोफाईल फोटोचा गैरवापर करून अश्लील संभाषणाचे बनावट स्क्रीनशॉट व्हायरल; अकोट शहर पोलिसांकडे तक्रार, सायबर तपासाची मागणी**

■ प्रतिनिधी | अकोट ■

डिजिटल माध्यमांचा गैरवापर करून व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळविण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असताना अकोट शहरात असाच एक गंभीर प्रकार समोर आला आहे. एका महिला सामाजिक कार्यकर्त्या, फ्रीलान्स पत्रकार आणि नगराध्यक्षपदाच्या माजी उमेदवाराच्या नावाने व्हॉट्सअॅपवर अश्लील संभाषणाचे कथित बनावट (फेक) स्क्रीनशॉट तयार करून ते विविध व्यक्तींमध्ये प्रसारित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित महिलेने अकोट शहर पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल करून संपूर्ण प्रकरणाचा सखोल सायबर तपास करून दोषींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, संबंधित महिलेला एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने स्वतःचे नाव रंगनाथ जाधव असल्याचे सांगत, तिच्या नावाने आणि मोबाईल क्रमांकासह प्रोफाईल फोटो वापरून अश्लील स्वरूपाचे व्हॉट्सअॅप संभाषण तयार करण्यात आले असून त्याचे स्क्रीनशॉट मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असल्याची माहिती दिली.

यानंतर संबंधित महिलेने सदर स्क्रीनशॉटची पाहणी केली असता, तो पूर्णपणे बनावट असल्याचा दावा केला आहे. स्क्रीनशॉटमधील एका ठिकाणी 'डॉ. अनुराधा' असे नाव दिसत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. यामुळे या प्रकरणामागे एकापेक्षा अधिक व्यक्तींचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, फोन करणाऱ्या व्यक्तीने हे स्क्रीनशॉट त्याला अकोट येथील शुभम बोडखे यांच्या मोबाईलवरून प्राप्त झाल्याचे सांगितले. त्यानंतर संबंधित महिलेने शुभम बोडखे यांच्याशी संपर्क साधून विचारणा केली असता समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, तक्रारदार महिला या अकोट नगरपालिकेच्या निवडणुकीत शिंदे शिवसेनेकडून नगराध्यक्षपदाच्या उमेदवार राहिलेल्या असून त्या भूमी फाउंडेशन या संस्थेमार्फत विविध सामाजिक उपक्रम राबवितात. त्याचबरोबर त्या फ्रीलान्स पत्रकार म्हणूनही कार्यरत आहेत. त्यामुळे आपली वाढती सामाजिक ओळख, सार्वजनिक कार्य आणि पत्रकारिता यामुळेच काही व्यक्तींनी जाणीवपूर्वक बदनामीचे षड्यंत्र रचल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

डिजिटल माध्यमातून बनावट चॅट, मॉर्फिंग, खोटे स्क्रीनशॉट किंवा सोशल मीडियावर दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करणे ही केवळ नैतिकदृष्ट्या चुकीची बाब नसून, अशा प्रकारांमुळे संबंधित व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा, मानसिक स्वास्थ्य आणि व्यावसायिक विश्वासार्हतेवर गंभीर परिणाम होऊ शकतो. अशा प्रकरणांमध्ये सायबर फॉरेन्सिक तपासाद्वारे मूळ स्त्रोत, मोबाईल क्रमांक, आयपी तपशील, संबंधित उपकरणे आणि संदेश प्रसारित करणाऱ्या व्यक्तींचा मागोवा घेणे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

दरम्यान, तक्रारदार महिलेने पोलिस प्रशासनाकडे या संपूर्ण प्रकरणाचा तातडीने डिजिटल फॉरेन्सिक व सायबर तपास करण्याची, बनावट स्क्रीनशॉट तयार करणारे, प्रसारित करणारे आणि त्यामागील सूत्रधार यांचा शोध घेऊन भारतीय न्याय संहिता (BNS), माहिती तंत्रज्ञान अधिनियम तसेच लागू असलेल्या अन्य कायदेशीर तरतुदींनुसार गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

आता अकोट शहर पोलिस या तक्रारीवर कोणती भूमिका घेतात, सायबर तपासाची दिशा काय राहते आणि कथित बनावट स्क्रीनशॉटच्या मागील सूत्रधारांचा पर्दाफाश होतो का, याकडे अकोटसह संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# 'टिपू सुलतान' नामकरणावरून अकोल्यात नवा वाद

## स्थायी समिती सभागृहाचे नाव बदलण्याची उपमुख्यमंत्री शिंदेंकडे मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहाला देण्यात आलेले 'शहीदे वतन हजरत टिपू सुलतान' हे नाव रद्द करून त्याऐवजी सर्व समाजघटकांना मान्य, वादमुक्त आणि प्रेरणादायी नाव देण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेचे शहरप्रमुख रमेश गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीमुळे अकोला महानगरपालिकेतील जुन्या नामकरणाच्या निर्णयावर पुन्हा एकदा राजकीय आणि सामाजिक चर्चा रंगण्याची चिन्हे दिसत आहेत.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, काही वर्षांपूर्वी तत्कालीन नगरसेवक तथा विद्यमान आमदार साजिद खान पठाण यांच्या मागणीनुसार स्थायी समिती सभागृहाला 'शहीदे वतन हजरत टिपू सुलतान' हे नाव देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला होता. या ठरावाचे सूचक तत्कालीन महापौर विजय अग्रवाल होते. त्या वेळच्या सभागृहातील बहुमताच्या आधारे हा निर्णय झाला असला, तरी सध्याच्या सामाजिक परिस्थितीत या

**शहरप्रमुख रमेश गायकवाड यांचे निवेदन**



नामकरणाबाबत विविध समाजघटकांमध्ये मतभेद निर्माण झाल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. निवेदनानुसार, टिपू सुलतान यांच्या ऐतिहासिक भूमिकेबाबत देशभरात परस्परविरोधी मतप्रवाह आहेत. त्यामुळे महानगरपालिकेच्या विकासात्मक निर्णयांचे केंद्र असलेल्या स्थायी समिती सभागृहाला अशा प्रकारचे वादग्रस्त ठरू शकणारे नाव कायम ठेवणे शहराच्या सामाजिक सलोख्याच्या दृष्टीने योग्य ठरणार नाही, असा मुद्दा मांडण्यात आला आहे. स्थायी समिती सभागृहात शहराच्या विकासाशी संबंधित आर्थिक मंजुरी, रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, विकास आराखडे आणि इतर महत्त्वाचे निर्णय घेतले जातात. त्यामुळे या सभागृहाचे नाव कोणत्याही वादाशी जोडले जाण्याऐवजी लोकशाही, विकास, समता आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक असावे, अशी भूमिका निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. शिवसेनेने या विषयाचा पुनर्विचार करण्याची मागणी करताना सदर नामकरणाचा ठराव पुन्हा स्थायी समिती अथवा सर्वसाधारण सभेपुढे चर्चेस ठेवावा, सर्वपक्षीय चर्चा घडवून आणावी आणि त्यानंतर सर्वमान्य निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.

यासोबतच छत्रपती शिवाजी महाराज स्थायी समिती सभागृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्थायी समिती सभागृह, सावित्रीबाई फुले स्थायी समिती सभागृह, महात्मा गांधी स्थायी समिती सभागृह, संविधान सभागृह, लोकशाही भवन, अकोला गौरव सभागृह, जनकल्याण सभागृह, विकास भवन, समता-सौहार्द सभागृह आणि एकात्मता सभागृह अशा पर्यायी नावांचाही प्रस्ताव निवेदनात देण्यात आला आहे. या विषयाकडे राजकीय चष्म्यातून न पाहता सामाजिक समन्वय, शहराचे दीर्घकालीन हित आणि सर्वसमावेशकतेच्या दृष्टीने निर्णय घ्यावा, तसेच आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी रमेश गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. दरम्यान, या निवेदनामुळे अकोल्यातील नामकरणाच्या राजकारणाला पुन्हा एकदा ऊत येण्याची शक्यता असून, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यावर कोणती भूमिका घेतात, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### पंढरपूर येथे सखा श्रीहरी वारकरी निवासाचे भूमिपूजन

**अकोला :** पंढरपूर येथे येणाऱ्या वारकऱ्यांची मोफत निवास व्यवस्था व्हावी यासाठी पंढरपूर येथील गोपाळपूर रोडवरील रिद्धी सिद्धी नगरात साकारत असणाऱ्या सखा श्रीहरी सदन, वारकरी निवासाचा भूमिपूजन सोहळा गुरुवारी मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला. विदर्भा समवेत अन्य गावावरून पायी येणाऱ्या वारकऱ्यांची योग्य निवास व्यवस्था व्हावी यासाठी हे वारकरी निवास भवन निर्माण होत आहे. या भूमिपूजन सोहळ्यास श्रीसंत सखाराम महाराज संस्थान, सखारामपुर इलोराचे हभप तुकाराम महाराज सखारामपुरकर, विठ्ठल रुक्मिणी संस्थानचे विश्वस्त हभप प्रकाश महाराज जवंजाळ, मलकापूरचे आ. चैनसुख संचेती, हभप पुरुषोत्तम महाराज उगले मुंबई, रामलिंग बलभीम खारवणे बार्शी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी हभप तुकाराम महाराज सखारामपुर कर यांनी जमिनीवर कुदळ चालवून रीतसर भूमिपूजन केले. सर्वप्रथम हभप पुरुषोत्तम महाराज उगले यांनी दीप प्रजवलन करून प्रारंभ केला.

### सर्व विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्यात 'ग्रीन वसुधा' अभियान

**अकोला :** विक्रमी ४७ अंश सेल्सिअस तापमानामुळे अकोल्याची ओळख देशातील उष्ण शहरांमध्ये झाली आहे. ग्लोबल वॉर्मिंग आणि पर्यावरणीय ऱ्हासामुळे संपूर्ण जग गंभीर संकटाचा सामना करत आहे. दरवर्षी लाखो झाडे लावली जातात; मात्र त्यातील मोठा हिस्सा काही महिन्यांतच नष्ट होतो.

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ७०/२०२६ कलम - १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव** - श्री. संत गजानन महाराज उद्यान मंदिर चॅरीटेबल ट्रस्ट, लहरिया प्लॉट, मुर्तीजापूर, ता. मुर्तीजापूर जि. अकोला

**अर्जदार : -** श्री. सतिश बाबुराव शेगावकर रा.मु.पो.लहरिया नगर, स्टेशन विभाग, मुर्तीजापूर ता.मुर्तीजापूर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **१००१/- रुपये श्री. सतिश बाबुराव शेगावकर यांचे जवळ जमा..**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २४/०७/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला

# मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा उपक्रम; पणजमध्ये ५१ जणांचे रक्तदान



■ प्रतिनिधी | पणज ■

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी अकोट ग्रामीण मंडळाच्या वतीने पणज येथे आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कांताई मंगल कार्यालयात झालेल्या या शिबिरात ५१ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमात युवक, महिला, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' या भावनेतून अनेकांनी प्रथमच रक्तदान करत समाजसेवेचा संकल्पही व्यक्त केला.

रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा साठा वाढावा आणि आपत्कालीन परिस्थितीत गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करत अशा सेवा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश जात असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतीय जनता पार्टी अकोट ग्रामीण मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध परिश्रम घेतले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमातून सामाजिक उत्तरदायित्व जपत 'सेवा हीच संघटना' या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देण्यात आली. रक्तदानासारख्या उपक्रमांमुळे समाजात सेवाभावाची भावना अधिक बळकट होत असल्याची प्रतिक्रिया उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

### कापसाला कीड आणि अळीचा प्रादुर्भाव

**अकोला :** भारतातील कापूस लागवडीला एकाच वेळी अनेक रस शोषणाऱ्या किडींना सामोरे जावे लागते. कीटकामध्ये वाढणारी प्रतिकारशक्ती, अनेक प्रकारच्या कीटकांचा एकाच वेळी प्रादुर्भाव आणि कीट व्यवस्थापनासाठी मर्यादित उपायांमुळे पिकाला सतत वाढत्या दबावाला सामोरे जावे लागत आहे. या आव्हानांमुळे अनेकदा पिकांची वाढ खुंटते, उत्पन्न कमी होते आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढतो. या बदलत्या गरजा लक्षात घेऊन बायरने विकसित केलेले ट्रान्स दोन प्रगत रसायनांना एकत्र आणते ज्यांची कार्यपद्धती एकमेकांना पूरक आहे. आधुनिक शेतीसाठी तयार केलेले ट्रान्स हे पिकामध्ये दुहेरी मार्ग प्रणाली आणि पर्णपटल-पार क्रियेने काम करते. ज्यामुळे विद्यमान पाने आणि नवीन येणारी पाने या दोन्हींचे संरक्षण शक्य होते.

### सार्वजनिक सूचना

सर्व संबंधित शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका, संस्था तसेच सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचित करण्यात येते की, 'मोहम्मद शहबाल मोहम्मद इर्शाद' तसेच 'कच्चेखोर मोहम्मद शहबाल मोहम्मद इर्शाद' ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची असून ती परस्पर एकमेकांच्या पर्यायी (Alias) नावांनी ओळखली जातात.

म्हणून कोणत्याही शासकीय अथवा खासगी कागदपत्रांमध्ये, व्यवहारांमध्ये, पत्रव्यवहारात, नोंदींमध्ये किंवा इतर कोणत्याही दस्तऐवजात वरीलपैकी कोणतेही नाव नमूद असल्यास ते एकाच व्यक्तीचा संदर्भ असल्याचे समजण्यात यावे. भविष्यात कोणताही गैरसमज किंवा संभ्रम निर्माण होऊ नये, या उद्देशाने ही सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

स्थळ : अकोला
दिनांक : / / २०२६

**सूचनादार**
**(मोहम्मद शहबाल मोहम्मद इर्शाद)**
उर्फ कच्चेखोर मोहम्मद शहबाल मोहम्मद इर्शाद

### तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे कार्यालय, अकोला ता. जि. अकोला

क्र. कक्ष/प्रस्तु-३/कावि/२०१९/२०२६ दिनांक: २४/०७/२०२६

**जाहीरनामा**

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार, शितल राहुल देशमुख, रा. बोरगाव मंजु, ता.जि. अकोला यांनी मौजे, बोरगाव मंजु भाग-३, गट क्र. ४३५/३ मधील शेतीच्या ७/१२ मधील इतर अधिकाराच्या रकान्यातील मृत झाडांची संख्या कमी करुन देणेबाबत विनंती अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे.

त्यानुसार, अर्जदार, शितल राहुल देशमुख, रा. बोरगाव मंजु, ता. जि. अकोला यांनी मौजे, बोरगाव मंजु भाग-३, गट क्र.४३५/३ मधील शेतीच्या ७/१२ मधील इतर अधिकाराच्या रकान्यातील मृत झाडांची संख्या कमी करुन देणेबाबत कोणाला काही आक्षेप/हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासुन सुट्टीचे दिवस वगळून सात दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करण्यात यावे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का

**(कुणाल झाल्टे)**
तहसिलदार, अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ७३/२०२६ जा. क्र. १८९७/२०२६
ने.ता. २९/०८/२०२६ दिनांक : २२/०७/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला, शाखा- वाशिम

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** दिपक बळीराम भुसारी व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. १) दिपक बळीराम भुसारी
रा. नवोदय विद्यालयासमोर, काटा रोड, वाशिम ता. जि. वाशिम

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,२३,३९९/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. २९ माहे ऑगष्ट, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरजहेरीत दाव्याची/वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. तसेच तुम्हाला अशीही दखल देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पुर्वी तुम्ही बचावासाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल. आज दि. २२ माहे जुलै, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे.मा. न्यायाधीश यांचे हुकूमान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. २२२/२०२६ जा. क्र. १८९१/२०२६
ने.ता. २८/०८/२०२६ दिनांक : २१/०७/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला शाखा -अकोट

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** सौ. पुष्पा निलेश रावळे व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. १) सौ. पुष्पा निलेश रावळे रा. गवळीपुरा, बुधवार वेस, अकोट ता. अकोट जि. अकोला क्र. २) निलेश मोतीराम रावळे रा. गवळीपुरा, बुधवार वेस, अकोट ता. अकोट जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. ५८,१३९/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. २८ माहे ऑगष्ट, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची/वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दि. २१ माहे जुलै, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ३६१/२०२५ जा. क्र. १८८९/२०२६
ने.ता. १०/०८/२०२६ दिनांक : २१/०७/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला, मुख्य शाखा- अकोला

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** सोनाली दिपक माळोकार व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. १) सोनाली दिपक माळोकार रा. मोठी उमरी, फत्तेपुर वाडी, अकोला ता. जि. अकोला क्र. २) दिपक रामदासपंत माळोकार रा. मोठी उमरी, फत्तेपुर वाडी, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,२३,२५८/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. १० माहे ऑगष्ट, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरजहेरीत दाव्याची/वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. तसेच तुम्हाला अशीही दखल देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पुर्वी तुम्ही बचावासाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा बचाव रद्द होण्यास पात्र ठरेल. आज दि. २१ माहे जुलै, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे हुकूमान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०३/२०२६ प्रोसेस नं.८३५/२०२६
चौ.ता. ०२/०९/२०२६ दिनांक : २२/०७/२०२६

**अर्जदार :** १. नारायण संपत राव वय अं. ५८ वर्ष धंदा - मजुरी रा. कोसगांव पो.माळराजुरा पातुर ता. पातुर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : १. संपत सोनाजी राव २. गयाबाई संपत राव
**पत्ता :-** रा. कोसगांव ता.पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संपत सोनाजी राव यांचा मृत्यु दि.१०/१२/१९८८ रोजी कोसगांव ता. पातुर नि.अकोला येथे झाला. तसेच मयत गयाबाई संपत राव यांचा मृत्यु दि.२०/०१/२०२० रोजी कोसगांव ता. पातुर जि. अकोला येथे झाला. तसेच संपत सोनाजी राव यांची आई ही बरेच वर्षापुर्वी मयत झालेली आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्यांशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- २२/०७/२०२६
पातुर

शिक्का

**आदेशानुसार**
प्र सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# रस्ते सुरक्षेसाठी आरटीओचा कठोर निर्णय; विना हेल्मेट टोलवर 'नो एन्ट्री'

## 'पादचारी व दुचाकीस्वार वाचवा अभियान '

## चालकासह मागील आसनावरील प्रवाशालाही हेल्मेट सक्तीचे

**वर्धा/ जनमाध्यम**

रस्ते अपघातांमधील मृत्यू आणि गंभीर दुखापती रोखण्यासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने 'पादचारी व दुचाकीस्वार वाचवा अभियान २०२६' अंतर्गत जिल्हाभर विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत सर्व टोल नाक्यांवर विना हेल्मेट दुचाकीस्वारांना प्रवेश नाकारण्यात येणार असून मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाईही केली जाणार आहे.




आरटीओने स्पष्ट केले आहे की, दुचाकी चालकासह मागील आसनावरील प्रवाशालाही हेल्मेट परिधान करणे बंधनकारक आहे. हेल्मेट हा केवळ कायद्याचा भाग नसून अपघाताच्या वेळी डोक्याचे गंभीर दुखापतींपासून संरक्षण करणारे प्रभावी सुरक्षा कवच आहे.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे यांनी नागरिकांना प्रत्येक दुचाकी प्रवासात हेल्मेट वापरण्याचे आवाहन केले आहे. रस्ते अपघातांतील जीवितहानी कमी करण्यासाठी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे त्यांनी म्हटले आहे.

हेल्मेट वापरा, जीव वाचवा हा संदेश जनमानसात पोहोचविण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असून, सर्व वाहनचालकांनी जबाबदार नागरिक म्हणून हेल्मेटचा नियमित वापर करून स्वतःचा आणि कुटुंबीयांचा जीव सुरक्षित ठेवावा, असे आवाहन आरटीओकडून करण्यात आले आहे.

# सेलूतील गाजलेल्या दरोडा प्रकरणाचा पर्दाफाश

## तीन आरोपी जेरबंद; ५.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त, एक आरोपी फरार

**सेलू/ जनमाध्यम**

सेलू शहरातील जयस्वाल लेआउट परिसरात घडलेल्या गाजलेल्या घरफोडी व दरोडा प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत उलगडा करत मोठे यश मिळविले आहे. या कारवाईत तीन अट्टल आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मारुती सुजुकी रिट्झ कारसह एकूण ५ लाख ७१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या टोळीतील एक आरोपी अद्याप फरार असून, त्याच्या शोधासाठी पोलिसांचे विशेष पथक कार्यरत आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जयस्वाल लेआउट येथील रहिवासी राहुल गजानन फटिंग हे १६ जुलै रोजी कुटुंबासह बाहेरगावी गेले होते. घर बंद असल्याची संधी साधत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे २ लाख २६ हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी सेलू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेतली. घटनास्थळावरील पुरावे, सीसीटीव्ही फुटेज,



मोबाईल तांत्रिक विश्लेषण, गोपनीय माहिती आणि संशयितांच्या हालचालींचा बारकाईने अभ्यास करून पोलिसांनी आरोपींपर्यंत धागेदोरे मिळवले. त्यानंतर राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत तीन आरोपींना अटक करण्यात यश आले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये मोहम्मद जाकीर मोहम्मद शाहिद अन्सारी (वय २५, रा. यास्मिन प्लॉट, समोसा ग्राउंड, बडा ताजबाग, नागपूर), सोनू उर्फ मोहम्मद शाहिद मोहम्मद रशीद (वय २३, रा. गोटा ताजबाग, दर्ग्याजवळ, नागपूर) आणि फैजान युनूस खान (रा. हिंगणघाट, जि. वर्धा) यांचा समावेश आहे. तर शेख आफताब शेख अब्दुला उर्फ गोलू हा आरोपी अद्याप फरार असून, त्याचा कसून शोध सुरू आहे. आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, मारुती सुजुकी रिट्झ कार (MH-01-AL-7330) तसेच इतर मौल्यवान वस्तू असा एकूण ५ लाख ७१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला असून, जिल्ह्यातील अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसण्यास मदत होणार असल्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सोरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. या मोहिमेत पो.उपनि. आशीषसिंह ठाकूर, पो.उपनि. विजयसिंह गोमल्लाडू, पो.नि. योगेश कुमार लाडे, शेखर डोंगरे, अरविंद येणुरकर, जगदीश डफ, रोशन निमकर, रवी पुरोहित, सागर भोसले, विकास मुंडे, आशीष उमेकर, सुगम चौधरी, शुभम राजूत, अखिल इंगोले, रितेश गोळे, दिनेश बांधेकर आणि गोविंद मुंडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या यशस्वी कारवाईमुळे सेलूसह संपूर्ण वर्धा जिल्ह्यातील नागरिकांमध्ये पोलिसांविषयी विश्वास अधिक दृढ झाला असून, फरार आरोपीला अटक झाल्यानंतर या प्रकरणातील आणखी बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## विदर्भाच्या पंढरपुरात आज विठ्ठलनामाचा अखंड गजर

**सुकळी (बाई)/ जनमाध्यम**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आज वर्धा जिल्ह्यातील सेलू तालुक्यातील सुकळी (बाई) येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी देवस्थान भक्तिरसाने न्हाऊन निघणार आहे. विदर्भाचे पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असलेल्या या तीर्थक्षेत्रात विविध धार्मिक, आध्यात्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, हजारो भाविकांच्या उपस्थितीची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. श्री महादेव बाबा सेवा समिती (ट्रस्ट), शक्तिधाम सुकळी यांच्या वतीने पहाटे काकड आरती, श्री विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा, हरिनाम संकीर्तन, भजन, कीर्तन, प्रवचन आणि सामूहिक नामस्मरण अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिवसभर विठ्ठलाच्या नामघोषाने मंदिर परिसर दुमदुमणार असून भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.आषाढी एकादशीला विठ्ठल भक्तांसाठी विशेष धार्मिक महत्त्व असल्याने दरवर्षीप्रमाणे यंदाही विदर्भातील विविध जिल्ह्यांतून वारकरी, दिंड्या आणि भाविक मोठ्या संख्येने सुकळी येथे दाखल होत आहेत. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी समितीच्या वतीने आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. यात सहभागी होऊन श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घ्यावे आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री महादेव बाबा सेवा समिती (ट्रस्ट), शक्तिधाम सुकळी यांच्या वतीने करण्यात आले.

## अतिमद्यप्राशनामुळे तरुणाचा मृत्यू

**वर्धा** - शहरातील अशोकनगर परिसरात राहणाऱ्या शेरसिंग उपाध्ये (वय ३५) यांचा अतिमद्यप्राशनामुळे मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. प्रकृती बिघडल्याने त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील चौकशी सुरू केली आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. अतिमद्यप्राशनामुळे होणाऱ्या मृत्यूच्या घटनांबाबत नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहनही करण्यात येत आहे.

# कृषी माऊली सोहळ्यातून गरजू महिलांना शेती किटचे वाटप

## मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण मंडळाचा सामाजिक उपक्रम, सेंद्रिय शेतीवर मार्गदर्शन

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त हिंगणघाट ग्रामीण मंडळातर्फे वेळा येथे आयोजित कृषी माऊली सोहळा उत्साहात व यशस्वीरित्या पार पडला. या निमित्ताने गरजू व विधवा महिलांना शेती विषयक किटचे वाटप करून त्यांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.




कार्यक्रमात कृषी सहाय्यक अधिकारी चौधरी यांनी 'माती परीक्षण व सेंद्रिय शेती' या विषयावर मार्गदर्शन केले. माती परीक्षणाचे महत्त्व, सेंद्रिय शेतीचे फायदे आणि आधुनिक शेती पद्धतींचा अवलंब करून उत्पादनवाढ कशी साधता येईल, याबाबत त्यांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश महामंत्री व वर्धा जिल्ह्याच्या प्रभारी माया ननावरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ तसेच जिल्हाध्यक्ष वैशाली येरावार यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सारिका ठोंबरे, जिल्हा महामंत्री श्रेया देशमुख, जिल्हा महामंत्री रवीला आखाडे, सहसंयोजक उमा पानवटकर, जिल्हा विधानसभा प्रमुख चित्रा ठाकूर, हिंगणघाट ग्रामीण अध्यक्ष कीर्ती सायंकार, अलका लोणकर, ममता डुकरे,कांचन खाटिक,कविता धारणे,भारती महाकाळकर,भारती गोडे, वैशाली बालपांडे, सोनाली नौकरकार, मंगला कुमरे,सुनीता कामडी तसेच महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमात सामाजिक बांधिलकी आणि शाश्वत शेतीचा संदेश देत महिलांच्या सक्षमीकरणाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत अशा सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

**प्रेस विज्ञप्ती**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की. अर्जदार तौसिफ सैय्यद रईसुद्दीन, रा. संत कबिर वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे तौसिफ सैय्यद रईसुद्दीन यांची जन्म तारीख १५/०४/१९९६ ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकंमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज/ प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-
दिनांक :- ०९/०६/२०२६

**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

## शेतातील सौर मोटारपंपावर चोरट्यांचा डल्ला

**हिंगणघाट**-तालुक्यातील वणी शिवारात अज्ञात चोरट्यांनी शेतातील सौरऊर्जेवर चालणारा पाच एचपी क्षमतेचा मोटारपंप चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. लता नव्हाते यांच्या तांबारी शिवारातील शेतात विहिरीवर सिंचनासाठी हा मोटारपंप बसविण्यात आला होता. शेतात गेल्यानंतर मोटारपंप चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व इतर तांत्रिक बाबींच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला असून आरोपींचा शोध घेतला जात आहे.

## दारूच्या नशेत दुचाकी चालविणाऱ्यावर कारवाई

**वर्धा**-वाहतूक नियमांचे उल्लंघन करून दारूच्या नशेत दुचाकी चालविणाऱ्या चालकावर वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी कारवाई केली. इतवारा चौकात नियमित तपासणीदरम्यान लहानेश्वर चौधरी (वय ५७, रा. रामनगर) हा मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालवत असल्याचे निदर्शनास आले. त्याची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर मद्यप्राशन केल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिसांनी त्याच्याविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करून दुचाकी जप्त केली. मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध अशी मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा वाहतूक शाखेने दिला.

# वर्धा मर्चंट पतसंस्थेच्या ठेवीदारांना आर्थिक गुन्हे शाखेचे आवाहन

## १३ टक्के व्याजाचे आमिष दाखवून कोट्यवधींची फसवणूक

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा मर्चंट नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,समता नगर,वर्धा येथे आरडी, एफडी व इतर विविध योजनांमध्ये १३ टक्के व्याजाचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची सुमारे ४ कोटी ५० लाख ५८ हजार ७६६ रुपयांची फसवणूक झाल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेने सर्व ठेवीदारांना महत्त्वाचे आवाहन केले आहे. ज्या गुंतवणूकदारांनी अद्याप परतफेडीसाठी अर्ज सादर केलेला नाही, त्यांनी उपलब्ध कागदपत्रांसह सात दिवसांच्या आत आर्थिक गुन्हे शाखा, वर्धा येथे उपस्थित राहून दावा नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या प्रकरणात भीमराव ऊर्फ भीमा राजेंद्र शंभरकर (रा. समता नगर, वर्धा) यांच्याविरुद्ध वर्धा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९८३/२०२६ नोंद असून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(५), ३१८(४) तसेच एमपीआयडी कायदा, १९९९ अंतर्गत



कारवाई करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि प्रभारी पोलीस उपअधीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धीरज खोब्रागडे व आर्थिक गुन्हे शाखेचे पथक या गुन्ह्याचा तपास करीत आहे आर्थिक गुन्हे शाखेने स्पष्ट केले आहे की, संबंधित पतसंस्थेत ज्यांनी गुंतवणूक केली असून अद्याप परतफेडीसाठी अर्ज भरलेला नाही, त्यांनी गुंतवणुकीचे पुरावे, पावत्या, एफडी-आरडी प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत आर्थिक गुन्हे शाखा, वर्धा येथे हजर राहून माहिती सादर करावी. तपासाच्या दृष्टीने ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

## गांगापूरला ३०लाख विकासाचा दिलासा सिमेंट रस्ता व विद्युत पोलचे काम पूर्ण

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

हिंगणघाट तालुक्यातील गांगापूर गावातील वार्ड क्रमांक २ मध्ये ३० लाख रुपये खर्चून साकारण्यात आलेल्या सिमेंट काँक्रीट रस्ता व विद्युत पोल उभारणीच्या कामाची पूर्तता झाली आहे. या विकासकामामुळे अनेक वर्षांपासून चिखल, अंधार आणि गैरसोयींना सामोरे जाणाऱ्या ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निधीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते सचिन महाजन तसेच ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले. गावातील सुमारे ५०० फूट रस्ता गेल्या २५ ते ३० वर्षांपासून खराब अवस्थेत होता. पावसाळ्यात महिला, विद्यार्थी, शेतकरी व वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच परिसरात स्ट्रीट लाईट व विद्युत पोलची सुविधाही उपलब्ध नव्हती. आता सिमेंट रस्ता आणि विद्युत पोलचे काम पूर्ण झाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या



विकासकामाचा शुभारंभ माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव चंदखेडे, माजी सभापती गंगाधर कोल्हे,भाजप तालुका महामंत्री विकास इंगळे, उपसरपंच रुपाली नैताम,ग्रामपंचायत सदस्य गजू राऊत, विलास झिले आदींच्या उपस्थितीत सामाजिक कार्यकर्ते सचिन महाजन यांच्या हस्ते करण्यात आला होता. काम पूर्ण झाल्यानंतर ग्रामस्थांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पाठपुरावा करणाऱ्या सचिन महाजन यांचे आभार व्यक्त केले.

**जाहीरनामा**

माझे पक्षकार, **श्री. प्रशांत दादाजी भिमटे वय ४४ वर्ष व्यवसाय- नौकरी , राहणार- नंदोरी रोड, संत तुकडोजी वार्ड, हिंगणघाट जिल्हा. वर्धा** उपरोक्त पत्त्यावर राहत असून माझे पक्षकाराने व धिरज चिमनलाल जोशी यांनी दिनांक १९-०३-२०२१ रोजी श्री. संजय तेजमल ओस्तवाल वय ५६ वर्ष, व्यवसाय-व्यापार राहणार- गांधी वार्ड हिंगणघाट जिल्हा वर्धा यांचेसोबत त्यांचे मालकी व कब्जाचा मौजा पिंपळगाव मौजा नंबर १०३ ता. हिंगणघाट जि.वर्धा येथील नगरपालीकेचे कक्षेत येणारा संत तुकडोजी वार्ड मधील सर्व्हे नं. ७६/ब मधील परावर्तीत असलेला प्लाट नं. २७ याची एकुण आराजी १३०.०० चौ.मी.म्हणजे १४०० चौ.फुट याची लांबी रूंदी खालील प्रमाणे - रूंदी उत्तर दक्षिण दोन्ही बाजु १०.०० मी. असुन. लांबी - पुर्व पश्चिम दोन्ही बाजु १३.०० मी. आहे. एकुण आराजी १४०० चौ. फुट म्हणजेच १३०.०० चौ. मिटर आहे. याची चर्तुः सिमा येणे प्रमाणे पुर्वेस- प्लॉट क्रमांक ३७ पश्चिमेस- ९ मीटर फुट रूंदीचा लेआऊट मधिल रोड. उत्तरेस- प्लाट न. २६ दक्षिणेस- प्लॉट क्रमांक २८ . सदरच्या प्लाट दि. १९/०३/२०२१ ला दस्त क्र १८३९/२०२१ रू. ३,८४,०००/- इतक्या मोबदल्यात घेतलेला आहे. उपरोक्त जाहीरनाम्यान्वये सर्व आम जनतेस कळविण्यात येते की, सदर प्लॉट चे विक्रीपत्राचे दस्त क्र. १८३९/२०२१ तारीख १९-०३-२०२१ चे मुळ प्रत गहाळ झालेली आहे. सदर प्लॉटचे अनुशंगाने माझे पक्षकार श्री. प्रशांत दादाजी भिमटे वय ४४ वर्ष व्यवसाय- नौकरी , राहणार- नंदोरी रोड, संत तुकडोजी वार्ड, हिंगणघाट जिल्हा. वर्धा आणि प्रज्ञा प्रशांत भिमटे वय ३७ वर्ष , व्यवसाय- नौकरी, राहणार- नंदोरी रोड, संत तुकडोजी वार्ड, हिंगणघाट जिल्हा. वर्धा यांनी महिंद्रा होम फायनान्स शाखा हिंगणघाट जि. वर्धा येथे होम लोन घेण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. वरील वर्णनाचे स्थावर प्लॉट मालमत्तेबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप, हरकत असल्यास किंवा उपरोक्त मिळकतीचे अनुशंगाने कोणतेही हितसंबंधी व्यक्ती, वारसान, प्रतिनिधी वा अन्य कोणीही, संस्था, बँक वगैरे यांना कोणत्याही स्वरूपाचा आक्षेप असल्यास तथा यापूर्वीच कोणाचेही हितसंबंध, हक्क व अधिकार, बोजा, कोणत्याही लेखाने हस्तांतरण, विल्हेवाट झालेले असल्यास किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा उजर उपरोक्त मिळकतीसंबंधी असल्यास खाली नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क करून तथा पत्त्यावर प्रत्यक्ष सर्व कागदपत्रांसह ७ दिवसाचे आत भेटून हरकत नोंदवावी, त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीस वा आक्षेप, हरकत विचारात घेतली जाणार नाही व त्याकरीता माझे पक्षकार कोणत्याही प्रकारे कायदेशीररित्या जबाबदार राहणार नाहीत व सदरचे मिळकतीचे पंजीबध्द दस्ताचे अनुशंगाने होम लोन प्राप्त करून घेतील.

वर्धा दि.२४/०७/२६

**अॅड.आर.आर.तिवारी,**
**रामनगर,मो. ९८२२४२६२६८**

# शब्दांच्या सुरांनी रंगली काव्यमैफिल

## साहित्य संमेलनातील निमंत्रितांच्या कवीसंमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

विदर्भ साहित्य संघ, नागपूर पुरस्कृत तिसऱ्या वर्धा जिल्हा साहित्य संमेलनानिमित्त आयोजित निमंत्रितांच्या कवीसंमेलनात विविध मान्यवर कवींनी आपल्या आशयघन आणि संवेदनशील कवितांद्वारे रसिकांना मंत्रमुग्ध केले. सामाजिक वास्तव, प्रेम, निसर्ग, राष्ट्रप्रेम, मानवी मूल्ये आणि समकालीन जीवनावरील कवितांना उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

कवीसंमेलनाचे अध्यक्षस्थान प्रख्यात कवी व गझलकार संजय इंगळे (तिगावकर) यांनी भूषविले. अध्यक्षीय मनोगतात



त्यांनी कविता हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगत नवोदितांनी सातत्याने वाचन, चिंतन आणि लेखनाची साधना करावी, असे आवाहन केले. विशेष अतिथी प्राचार्य उमेश तुळसकर यांनी काव्य ही संस्कृती व संवेदनशीलतेची जपणूक करणारी अभिव्यक्ती असल्याचे नमूद केले. प्रमुख पाहुणे सुधीर मोते यांनी साहित्य समाजाला नवी विचारदिशा देत असल्याचे प्रतिपादन केले.

प्रविण आडेकर, प्रदीप देशमुख, अनिल पिट्टलवार, सुनील बावणे, विजय वासाडे, प्रमोद नारायणे,विद्यानंद हाडके, हितेश गोमासे, प्रकाश बनसोड, निरज आत्राम, कविता बेदरकर, प्रीती वाडीभस्मे, भारती लखमापूरे, एम. ए. रहिम, प्रशांत झिलपे, आरती झोटिंग आदी कवींनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत कविता सादर करून काव्यमैफिल रंगविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भाग्यश्री साबळे व डॉ. ज्ञानेश्वर वाघमारे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समितीच्या सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले. साहित्यप्रेमी, कवी आणि रसिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कवीसंमेलन संस्मरणीय ठरले.

**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

**प्रेस विज्ञप्ती**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते को, अर्जदार सैय्यद एजाज सैय्यद रहिफउद्दीन, रा. इंदिरा गांधी वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे सैय्यद एजाज सैय्यद रहिफउद्दीन यांची जन्म तारीख २१/०४/१९९९ ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज/ प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**ठिकाण :-**
**दिनांक :- ०९/०६/२०२६**

**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २३८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# शहर काँग्रेसचे केंद्र सरकारविरोधात धिक्कार आंदोलन
# धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा- शहराध्यक्ष बबलु शेखावत

**अमरावती/ प्रतिनिधीः-** 'धर्मेंद्र प्रधान इस्तीफा दो, विद्यार्थीयोंको न्याय दो, नरेंद्र मोदी हटाव देश बचाव .... अशा संतप्त आणि जोशपूर्ण घोषणांनी आज अमरावती शहरातील जयस्तंभ चौक व संपूर्ण मार्केट परिसर दणाणून गेला. अमरावती शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने केंद्र सरकारच्या कथित विद्यार्थीविरोधी भूमिकेच्या निषेधार्थ आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी महात्मा गांधी पुतळा, जयस्तंभ चौक येथे धिक्कार आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते.या आंदोलनाचे नेतृत्व अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलु शेखावत यांनी केले. माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, महानगरपालिका विरोधी पक्षनेते विलास इंगोले यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शहरातील काँग्रेसचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी, माजी व विद्यमान लोकप्रतिनिधी,



नगरसेवक-नगरसेविका, युवक काँग्रेस, एनएसयूआय, महिला काँग्रेस, सेवादल, ओबीसी, एससी, एसटी, अल्पसंख्याक विभाग, सोशल मीडिया विभाग तसेच विविध सेल व विभागांचे पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

नेत्यांनी सांगितले की, जंतर-मंतर, नवी दिल्ली येथे विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जमध्ये अनेक विद्यार्थी जखमी झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी असून त्याचा निषेध देशभरातून होत आहे. या घटनेची जबाबदारी निश्चित करून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

याप्रसंगी स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल,महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे,संजय वाघ,सलीम मिरावले,अशोक डोंगरे,अर्चना आत्राम,सुझाता अनिल झाडे,गुड्डू हमीद,मोहम्मद रेहान मोहम्मद यासीन उर्फ बल्ला भाई,प्रशांत महल्ले,संजय शिरभाते,फिरोज खान,सुरेश रतावा,राजश्री जढाळे,मैथिली पाटील,वंदना थोरात,अनिला काझी यांच्या सह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.


## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्कः**
९४२२८५७१६९,
९४२२९१८५६९


# सेवाभावी कार्यातून मिळते समाजऋण फेडण्याची संधी-आ.संजय खोडके

**अमरावती/ प्रतिनिधी: -** समाजाने आपल्याला खूप काही दिले आहे. त्यामुळे आपलेही समाजासाठी काही देणे लागते. या भावनेतून आज प्रत्येकाने सामाजिक बांधिलकी जोपासणे आवश्यक आहे. विकासाच्या संकल्पनेत पायाभूत सुविधा जितक्या महत्वाच्या आहेत. तितक्याच नागरिकांचे जीवनमान उंचाविण्यासाठी , गरजूंना आधार देण्यासाठी लोकहिताचे उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जोपासणे सुद्धा महत्वाचे आहे. सेवाभावी कार्यातून समाजऋण फेडण्याची संधी मिळत असून जनहिताचे उपक्रम हेच खऱ्या अर्थाने लोकसेवेचे माध्यम असल्याने प्रत्येकाने अशा उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी केले.

दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित जनसेवा सप्ताह अंतर्गत अमरावती शहरात विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## ई-निविदा सुचना
## पंचायत समिती, अमरावती

पंचायत समिती, अमरावती ता.जि.अमरावती महाराष्ट्र अंतर्गत ग्रामपंचायत / गावामध्ये मंजूर विविध विकास कामांकरीता पात्र व नोंदणीकृत कंत्राटदारांकडून महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा सुचनेमध्ये निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २४.०७.२०२६ पासून ०७.०८.२०२६ पर्यंत उपलब्ध आहे.

| अ. क्र. | योजना | ग्रामपंचायत | कामाचे नांव | मंजूर रक्कम लक्ष | निविदा फी रु. | बयाणा रक्कम १ टक्का | ई-निविदा क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | जिल्हा नियोजन समिती अमरावती- मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे प्रशासकीय मान्यता आदेश क्र.९९५/२०२५-२६ दिनांक ०३.११.२०२५ | पिंपळखुटा | सिमेंट कॉ.रस्ता | १०.०० | ५००/- | १००००/- | २०२६-AMRAV -१३२११११-३ |
| २. | | पोहरा | रस्ता व नाली | १५.०० | ५००/- | १५०००/- | २०२६-AMRAV -१३२११११-४ |
| ३. | वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजना - शासन निर्णय, महाराष्ट्र शासन इतर मागास बहुजन कल्याण विभाग क्र. तांसुयो-२०२५/ प्र.क्र. १५१/योजना-५ दिनांक १० ऑक्टोबर २०२५ | नांदुरा बु. | रस्ता बांधकाम करणे | १०.०० | ५००/- | १००००/- | २०२६-AMRAV -१३२११११-५ |
| ४. | | पोहरा | सभागृह बांधकाम करणे | १५.०० | ५००/- | १५०००/- | २०२६-AMRAV -१३२११११-६ |
| ५. | | कस्तुरा | नालीचे बांधकाम करणे | १०.०० | ५००/- | १००००/- | २०२६-AMRAV -१३२११११-७ |
| ६. | | परसोडा | सभागृह बांधकाम करणे | १५.०० | ५००/- | १५०००/- | २०२६-AMRAV -१३२११११-१ |
| ७. | | पिंपळखुटा | सभागृह बांधकाम करणे | १०.०० | ५००/- | १००००/- | २०२६-AMRAV -१३२११११-२ |

**इच्छुक कंत्राटदारांनी ई-निविदा सादर करावी**

टिप -
१. निविदा प्रसिध्द दिनांक २४.०७.२०२६ पासून ०७.०८.२०२६ पर्यंत
२. निविदा उघडण्याचादिनांक १०.०८.२०२६

**स्वा/-**
**गटविकास अधिकारी,**
**पंचायत समिती, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१३९३/२०२६
**शोभा व इतर विरुध्द देविदास व इतर**
पुढील ता.२७.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Shobha Sadashivrao Motghare, Age 73 Yrs. Occu.: Household R/o. Naya Akola, Tq. & Dist. Amravati
2. Sheelabai Domaji Borkar, Age 54 Yrs. Occu.: Household R/o. Lasnapur Road, Sukali, Tq. Dist. Amravati
3. Jyoti Bhimrao Sahare, Age 52 Yrs. Occu.: Household R/o. Near Bhimjyoti Mandal, Frezarpura, Rukhmini Nagar, Amravati
4. Savita Jivan Meshram, @ Rubina Majid Shaikh Age 47 Yrs. Occu.: Household R/o. S.T. Road Near Sai Mandir, Room No. 46, Subhashchandra Bose Nagar, Chembur,Mumbai

-- विरुध्द --

गैरअर्जदार :
1. Devidas Shravanji Wasnik, Age- Adult Yrs. Occu.: Labour R/o. Kondeshwar Temple, Anjangaon Bari, Tq. & Dist. Amravati
2. Dnyaneshwar Dharampal Wasnik, Age Adult, Occu.: Labour R/o. Dipak Nagar, Rahatgaon, Tq. & Dist. Amravati
3. Punam Sharad Manware, Age 29 Yrs. Occu.: Labour R/o. Rahatgaon, Tq. & Dist. Amravati
4. Nisha Bhimrao Wasnik, Age- Adult , Occu.: Labour
5. Shrvan Bhimrao Wasnik, Age- 12 Yrs. Occu.: Educatoin

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत श्रावण दवलत वासनिक हे** दिनांक २७.०५.१९९६ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शोभा व इतर विरुध्द देविदास व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अर्जदार शोभा व इतर विरुध्द देविदास व इतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
अमरावती

---


## WANTED

**Name of the Society :- Late Babasaheb Varhade Education Society, Amravati**
**Name of the College:- 1) Sant Gadge Maharaj Arts, Commerce & Science College, Walgaon, Dist. Amravati**
**2) Mahatma Jyotiba Fule Commerce & Science & Vitthalrao Raut Arts College, Bhatkuli, Dist. Amravati**

Applications are invited for Full Time Regular Posts as per following details in the faculty of Science & Technology/Humanities/Commerce & Management/ Interdisciplinary Studies.

**Vacancies for Grant-in-aid Course/Programmes**

| Sr.No. | Name of the post | Subject/Courses | Category wise No. of Post |
|---|---|---|---|
| 1 | Assistant. Professor | Commerce - 02 | ST - 02 |
| 2 | Assistant. Professor | Political Science - 01 | VJ-A - 01 |
| 3 | Assistant. Professor | Economics - 02 | NT-B - 01 |
| 4 | Assistant.Professor | Sociology - 01 | NT-C - 01 |
| 5 | Assistant. Professor | History - 01 | NT-D - 01 |
| 6 | Assistant. Professor | English - 02 | SBC - 01 |
| 7 | Assistant. Professor | Mathematics - 02 | OBC - 01 |
| | | | SEBC - 01 |
| | | | EWS - 01 |
| | | | Open - 01 |

(समांतर आरक्षण भरण्यात येईल या अटीवर. समांतर आरक्षण पुढीलप्रमाणे आहेत - महिला-०१ (ST), दिव्यांग-१ (ब) अनुशेष * दिव्यांग गट-अ)
* **टिप** :- दि.१३ जुलै २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिव्यांग अनुशेष भरण्याची कार्यवाही करावी.

For Qualifications/Experience/Pay Scale and other details/ conditions visit university website www.sgbau.ac.in and College website www.sgmmwalgaon.org.in

Candidate should submit their application with all necessary documents as per the rules of their respective Government and University within 15 days of this advertisement in the office of Prisident, Late Babasaheb Varhade Education Society, Sambhaji Nagar, V.M.V. Road, Amravati

**PRESIDENT**
**Late Babasaheb Varhade Education Society, Amravati**

**PRINCIPAL**
**Sant Gadge Maharaj Arts, Commerce & Science College, Walgaon, Dist. Amravati**

**PRINCIPAL**
**Mahatma Jyotiba Fule Commerce & Science & Vitthalrao Raut Arts College, Bhatkuli, Dist. Amravati**



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३१७**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
**२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती**

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 108/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **मिलींद बुध्दीस्ट चॅरीटेबल ट्रस्ट शिंदी बु. ता.अचलपूर, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री रत्नरक्षित सत्यवान चव्हाण**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २१.०५.२०२६ रोजी दिली.

**सही/-**
**श्रीमती डी.बी. गायवाकडा**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
शिक्का
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
**२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती**

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 78/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री हनुमान सेवा सोसायटी दहातोंडे लेआउट, हनुमान नगर, सर्व्हे नं.२ (२) , वार्ड नं.१६, मुंड निशांकराव नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री प्रशांत किसनराव जंगले**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २०.०५.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 107/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **जामिया दारुल फलाह एज्युकेशन अॅण्ड वेल्फेअर मल्टीपरपज** ट्रस्ट, बडनेरा, जि.अमरावती
बाबत अर्जदार - **साहेब अहेमद अब्दुल गफ्फार**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२१.०७.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४२४/२०२६
**संजीव व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०८.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. Sanjeev Madhukarrao Wadurkar, Age 66 Yrs. Occu.: Retired
2. Sandip Madhukarrao Wadurkar, Age 57 Yrs. Occu.: Service Both R/o Kediya Nagar, Amravati.
3. Kalpana Rajendra Bartake, Age 74 Yrs. Occu.: Household R/o C-307, Kolak Bldg.Sardar Height, Tithal Road, Valsad Gujrat
4. Smt.Kunda Ulhas Khandare, Age 70 Yrs. Occu.: Household R/o A-1203, Aamodini Apartment, Gurudwara Road, Nashik

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **आशाताई मधुकरराव वडुरकर** हे दिनांक **09.01.2014** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संजीव व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संजीव व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३३५/२०२६ ने.ता.१८.०८.२०२६

**अर्जदार :** **अशोक शंकरराव माकोडे,** वय ६२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा. कृषी उत्पन्न बाजार समिती जवळ, शिरजगांव बंड
ता. चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.**मृतक शंकरराव नारायणराव माकोडे** यांचा मृत्यू दि.२१/०६/२०२६ रोजी रा.शिरजगाव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक पंचफुला शंकरराव माकोडे** यांचा मृत्यू दि.०५/०६/२००९ रोजी झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३३५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३५२/२०२६ ने.ता.२५.०८.२०२६

**अर्जदार :** **मुस्कान अनिलकुमार तारवानी,** वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.घर क्र.३९२०/सि/१२०/इ.डब्ल्यू एस.हाऊसिंग सोसायटी, जरीपटका,
नागपूर, ता.जि.नागपूर- पिन कोड -४४००१४

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात.**मृतक लक्ष्मीचंद नेभनदास बुधवानी** यांचा मृत्यू **दि.१६/०५/२०२५** रोजी अमरावती येथे झालेला असून ते कायमचे रा.मासोद,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते. तसेच **मृतक मुकेश लक्ष्मीचंद बुधवानी** यांचा मृत्यू **दि.२१/०२/२०२४** रोजी तसेच मृतक **मधूमती उर्फ मधू लक्ष्मीचंद बुधवानी हिचा दि.१०/०६/२०१६ रोजी मृत्यू झालेला आहे.** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदारांना मय्यतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३५२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०७.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

---

## जाहीर सुचना

याद्वारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, **मिथून प्रेमराव गोमकाळे** यांनी वेस्टर्न कॅपिटल एडवायजर्स प्रा.लि. (Western Capital Advisors Pvt.Ltd.) शाखा अमरावती येथे कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. तसेच त्यांच्याकडील मूळ नोंदणीकृत खरेदीखत ज्याचा नोंदणीकृत दस्त कमांक १५९/२०१५, दिनांक २८.१.२०१५ असून ते गहाळ झालेले आहे.

सदर खरेदीखतामध्ये नमुद असलेल्या मालमत्तेचा तपशील - मौजे लिहीदा गा.नं.२६२ प्र.करजगांव, ता.पो.तु.मोर्शी, जि.अमरावती येथील वार्ड नं.१, मालमत्ता कमांक ५५ मधील पश्चिम-उत्तर कोपऱ्यातील १० x २० चौ.फुट जागा सोडून बाकी राहिलेली २३२.३४ चौ.मी. (२५००.०० चौ.फुट)

सदर मालमत्तेवर कोणाचा हक्क, वारसा, गहाण, बोजा, पतसंस्था कर्ज इत्यादी असल्यास ही जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून तीन दिवसांचे आत प्रत्यक्ष कागदपत्रासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आपली लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर प्राप्त झालेली हरकत विचारात घेतल्या जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी..

दि.२४.०७.२०२६

शिक्का

**ॲड.वैभव वाटाणे**
Western Capital Advisors Pvt.Ltd. 1st Floor, Nagpurkar Complex, Asiad Square, Shegaon-Rahatgaon Road. Amravati-444604
Mob.: 9421024154

---

## जाहीरनामा

**श्रीमती रोहिणी वि.मनोरे** दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तिवसा, जि.अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.क्र.१०५/२०२६ ने.ता.१२.०८.२०२६

**अर्जदार -**
1. Shila Dnyaneshwar Kale, Age about 69 Yrs. Occu.: Household
2. Manoj Dnyaneshwar Kale, Age about 41 Yrs. Occu.: Labour Both R/o At Dhotra, Ward No.1, Po.Sirasgaon, Tq.Tiosa, Dist.Amravati-444902

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **शिला ज्ञानेश्वर काळे** यांनी दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ८ परि.२** अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **ज्ञानेश्वर रामराव काळे** यांचा मृत्यू दिनांक **१७.०२.२०२५** रोजी धोत्रा, ता.तिवसा, जि.अमरावती येथे झालेला आहे. व **कौसल्याबाई रामराव काळे** यांचा मृत्यू बऱ्याच वर्षापुर्वी झालेला आहे. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे ईतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू **ज्ञानेश्वर रामराव काळ** मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दि.**२६ माहे मे २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर, तिवसा

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 109/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **स्वराज एज्युकेशन ट्रस्ट अमरावती, कलोती नगर, अमरावती**
बाबत अर्जदार - **स्वप्निल सुरेश गुडधे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२१.०७.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

प्रो.नं.१७१७/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१६.०७.२०२६

वि.सहदिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./२९६/२०२६ दिनांक २०.०८.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. शाहीनबानो बरकतउल्लाह खान, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम
२. शिरीन कौसर रेहान खान, वय २२ वर्षे, धंदा - घरकाम
३. बाकीर उल्लाह खान बरकत उल्लाह खान, वय १९ वर्षे, धंदा- व्यापार
सर्व रा.वाकोडे पुरा, बाभळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **बरकतउल्लाह खान इब्राहीमखान** हे दिनांक **२६.०३.२०२६** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **बरकतउल्लाह खान इब्राहीमखान** यांचे नांवे खालीलप्रमाणे स्थावर मालमत्ता आहे.

**अ)** मौजे बाभळी येथील जुने घर वार्ड नं.१ जुना न.प.मालमत्ता नं.५४५, नझुल शिट नं.२० क्षेत्रफळ ८३.६४ चौ.मी. हिस्सा सालीम याची अंदाजे किंमत ४०,०००/- रु. गृहित आहे.
**ब)** मौजे बनोसा खुला प्लॉट न.प.मालमत्ता नं.६४५/१ वार्ड नं.३, नझुल शिट नं.४५ प्लॉट नं.८१३/बी/९/अ, क्षेत्रफळ १३२.९५ चौ.मी. यापैकी अर्धा भाग याची अंदाजे किंमत ६०,०००/- गृहित आहे.
**क)** मौजे बनोसा खुला प्लॉट न.प.मालमत्ता नं.६४७/१ वार्ड नं.३, नझुल शिट नं.४५ प्लॉट नं.८१३/बी११, क्षेत्रफळ १३५ चौ.मी. यापैकी हिस्सा सालीम याची अंदाजे किंमत १,००,०००/- गृहित आहे.

या मालमत्तेची पुर्ण किंमत २,००,०००/- गृहित आहे.

आज दि.१६.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## संक्षिप्त



### शेतीकामांना वेग; ट्रॅक्टरच्या साहाय्याने पिकांवर औषध फवारणी सुरू

**टाकरखेडा सभू-** परिसरात खरीप हंगामातील शेतीकामांना वेग आला असून शेतकरी ट्रॅक्टरच्या साहाय्याने पिकांवर औषध फवारणी करत आहेत. आधुनिक यंत्रसामग्रीच्या वापरामुळे कमी वेळेत अधिक प्रभावी फवारणी होत असून पिकांचे रोग व कीड नियंत्रणासाठी शेतकरी सज्ज झाले आहेत. वेळ, श्रम आणि खर्चाची बचत होत असल्याने आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर दिवसेंदिवस वाढत आहे.

**छायाचित्र : संतोष शेंडे,** टाकरखेडा शंभू

### डॉ. अरूणा वाडेकर यांची नियुक्ती



**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या समन्वयकपदी महिला महाविद्यालय, अमरावती येथील प्रभारी प्राचार्य डॉ. अरुणा एस. वाडेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी सदर पदाची जबाबदारी नारायणराव राणा महाविद्यालय, बडनेरा येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष बनसोड यांच्याकडे होती. डॉ. बनसोड यांचा कार्यकाल संपल्यामुळे डॉ. अरुणा वाडेकर यांच्याकडे सदर केंद्राच्या समन्वयक पदाची सूत्रे सोपविण्यात आली आहेत. डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्या समन्वयकपदी डॉ. अरुणा वाडेकर यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वांनी अभिनंदन केले आहे.

# अमरावती विद्यापीठाच्यावतीने २९ महाविद्यालयांवर प्रवेश बंदी!

## विद्यार्थी व पालकांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानसार शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ साठी तब्बल २९ महाविद्यालयांवर प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. या संदर्भात विद्यापीठाने अधिकृत जाहिरात व यादी प्रसिद्ध केली असून, विद्यार्थ्यांना या महाविद्यालयांमध्ये प्रवेश न घेण्याचे आवाहन केले आहे.

विद्यापीठाने दिलेल्या माहितीनुसार संबंधित महाविद्यालयांवर शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्येही प्रवेश बंदी घालण्यात आली होती. त्यानंतर या महाविद्यालयांनी पदभरती (शिक्षकांची रिक्त पदे भरणे) करण्यासंदर्भात विद्यापीठाला कायदेशीर प्रतिज्ञापत्र लिहून दिले होते. मात्र, प्रतिज्ञापत्र देऊनही आजतागायत या महाविद्यालयांनी आवश्यक पदभरती प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. नियमांचे उल्लंघन आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीला कारणीभूत ठरणाऱ्या या भूमिकेमुळे विद्यापीठाने अखेर कठोर पाऊल उचलत सत्र २०२६-२०२७ या वर्षासाठी देखील त्यांच्यावर प्रवेश बंदी कायम ठेवली आहे.

बंदी घालण्यात आलेल्या २९ महाविद्यालयांची यादी www.sgbau.ac.in या विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे. जर कोणत्याही विद्यार्थ्यांनी या प्रतिबंधित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतला, तर त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची राहील, तसेच विद्यापीठ अशा प्रवेशांना मान्यता देणार नाही आणि याची कोणतीही जबाबदारी विद्यापीठाची राहणार नाही, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

**काही महाविद्यालयांना अटींवर तात्पुरती शिथिलता**

विद्यापीठाने यामधून काही महाविद्यालयांना दिलासाही दिला आहे.'परिशिष्ट-अ' मध्ये समाविष्ट श्रीमती राधाबाई किसनसिंग खुटपळे विधी महाविद्यालय, जरुड, श्री बच्चुभाऊ कडू बी.सी.ए. महाविद्यालय, जरुड, स्व.आर.जी. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, दत्त विज्ञान महाविद्यालय (तिवसा), राष्ट्रीय अल्पसंख्यांक महिला महाविद्यालय (अमरावती), डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिटुट ऑफ फार्मसी (अमरावती), सावित्रीबाई फुले विज्ञान महाविद्यालय (सिंदखेड राजा), कॉलेज ऑफ मॅनेजमेंट (खामगांव), महात्मा ज्योतिबा फुले विज्ञान महाविद्यालय (संग्रामपुर), संत गजानन बाबा महाविद्यालय (मोताळा), डॉ. जाकिर हुसैन हिंदी उर्दु कला महाविद्यालय (लोणार), श्री सावळे महाविद्यालय (लाखनवाडा), श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी (बुलढाणा), गुंजकर महाविद्यालय (खामगांव), सर्च कॉलेज ऑफ टेक्निकल एज्युकेशन (यवतमाळ), ठाकुर कला, वाणिज्य व विज्ञान रात्रकालीन महाविद्यालय




(यवतमाळ), ईश्वर देशमुख इन्स्टिटुट ऑफ फार्मसी महाविद्यालय (दिग्रस) व विज्ञान महाविद्यालय (रिसोड) या महाविद्यालयांना शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ ची नामांकन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत 'पदभरती पूर्ण करण्याच्या अटीवर' प्रवेश बंदीतून तात्पुरती शिथिलता दिली आहे.

विद्यार्थ्यांना या महाविद्यालयांत तात्पुरते प्रवेश घेण्याची मुभा असेल, मात्र त्यांना दिलेल्या विहित वेळेत शिक्षकांची पदे महाविद्यालयाला भरावी लागणार आहेत.

**प्रवेश बंदी असलेल्या महाविद्यालये**

अमरावती जिल्हा : महाराष्ट्र कला महाविद्यालय (शिराळा), स्व. पंचफुलाबाई गुणवंतराव भारसाकळे कला व वाणिज्य महाविद्यालय (सातेगाव), श्रीराम कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (मोर्शी), मधुबन कला व वाणिज्य महाविद्यालय (धारणी), डॉ.एस.एस. गोरडे विज्ञान महाविद्यालय (अचलपूर). अकोला जिल्हा : गयादेवी जोशी आर्यभट महाविद्यालय, सौ. वेदेही विष्णू सराफ महाविद्यालय, गुलाम जैनुल आबोदिन कला महाविद्यालय (वाडेगाव), मेघे इन्स्टिट्युट ऑफ ॲडव्हान्स स्टडीज, श्री.व्ही.के. जोशी महाविद्यालय (गायगाव). बुलढाणा जिल्हा : ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय, श्रीरामभाऊ शेळके विधी महाविद्यालय (खामगाव), व्यवसाय प्रशासन महाविद्यालय, सत्यजित कॉलेज ऑफ सायन्स (मेहकर), स्व. गजानन माणिकरावजी गावंडे विज्ञान महाविद्यालय (खामगाव), स्व. गणेश भास्करराव शिंगणे कला महाविद्यालय (देऊळगांव मही), सरस्वती महाविद्यालय (शेगांव), श्रीमती तुलसीबाई रंगलालजी झांबड वरीष्ठ महाविद्यालय (नांदुरा),श्री सरस्वती कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (जानेफळ), श्रीमती बसंतीबाई देवकिसनजी चांडक सहकार कला व वाणिज्य महाविद्यालय (डोंगरखंडाळा), यवतमाळ जिल्हा : डॉ. बाबासाहेब नांदुरकर शारीरिक शिक्षण महाविद्यालय, स्व. रुपेशकुमार इंगोले कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड टेक्नॉलॉजी, अनिरुद्ध कॉलेज ऑफ सायन्स (कलंब), श्रीमती सुर्यकांता तेलगोटे महिला महाविद्यालय, वसंतराव नाईक रात्रकालीन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (पुसद).वाशिम जिल्हा: आदर्श अध्यापक महाविद्यालय (कारंजा लाड), सन्मती लॉ कॉलेज (वाशिम), श्री कानीफनाथ महाविद्यालय (खेरडा), कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (जांभरुण परांडे) या महाविद्यालयांचा समावेश असल्याचे सांगण्यात आले आहे.

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना

नवीन शैक्षणिक वर्षात प्रवेश घेण्यापूर्वी पालकांनी व विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन महाविद्यालयाची पात्रता तपासूनच प्रवेश निश्चित करावा, जेणेकरून भविष्यात होणारी फसवणूक व शैक्षणिक नुकसान टाळता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी कळविले आहे.अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या महाविद्यालयीन विभागाच्या उपकुलसचिव डॉ. साक्षी ठाकूर यांचेशी संपर्क साधता येईल.

# शहानूरचे पाणी गढूळले

## अनिकेत केलो यांचे नागरिकांना आवाहन



**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव सुर्जी शहर आणि ग्रामीण भागाला पाणीपुरवठा करणाऱ्या शहानूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या तीन ते चार दिवसांपासून पाऊस सुरू आहे. सातत्याने होत असलेल्या पावसामुळे धरणात गढूळ पाणी आले आहे.याचा थेट परिणाम पाणीपुरवठ्यावर झाला असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलव्यवस्थापन विभागामार्फत पुरवठा होणाऱ्या काही भागात गढूळ पाणी येत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त झाल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, अंजनगाव सुर्जी उपविभागाचे उपविभागीय अभियंता अनिकेत केलो यांनी नागरिकांना खबरदारी बाळगण्याचे आवाहन केले आहे.धरण क्षेत्रात पाऊस सुरू असल्याने कच्च्या पाण्याची गढूळता वाढली आहे. शुद्धीकरण करून पाणीपुरवठा करण्यात येत असला तरी, खबरदारी म्हणून नागरिकांनी पाणी गाळून आणि उकळून प्यावे,' असे आवाहन अभियंता केलो यांनी केले आहे.

नळात दुषित पाणी जाऊ नये यांची दक्षता घेण्यात यावी.तसेच आपल्या परिसरातील नळाच्या पाईपलाईनला गळती असल्यास ती त्वरित बंद करावी, जेणेकरून बाहेरील दूषित पाणी पाईपलाईनमध्ये मिसळणार नाही.नळाला येणारे पाणी थेट पिणे टाळावे. नळ ग्राहकांना घरगुती पाणी शुद्ध करण्यासाठी अभियंता केलो यांनी उपाय सांगितले आहेत. नागरिकांनी पिण्यापूर्वी पाणी चांगले १० ते १५ मिनिटे उकळून घ्यावे आणि नंतर थंड करून प्यावे.

गढूळ पाण्यातील बारीक कण तळाशी बसण्यासाठी पाण्यात तुरटी फिरवावी आणि काही वेळ पाणी स्थिर ठेवावे. त्यानंतर वरचे नितळ पाणी वापरावे.पाणी उकळण्यापूर्वी किंवा साठवण्यापूर्वी ते स्वच्छ सुती कापडाने २ ते ३ वेळा गाळून घ्यावे.शुद्ध केलेले पाणी नेहमी झाकण असलेल्या आणि स्वच्छ भांड्यातच साठवावे. धरणातील पाणी स्थिर होताच पाणीपुरवठा पूर्ववत सुरळीत आणि नितळ होईल, असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन उपविभाग अंजनगाव सुर्जी उपविभागीय अभियंता अनिकेत केलो याच्याकडून सांगण्यात आले आहे. तोपर्यंत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन केलो यांनी केले आहे.

# मोर्शी विभागात महावितरणतर्फे 'ग्राहक सू-संवाद मेळाव्याचे'आयोजन

**अमरावती/का.प्र.**

महावितरणच्या स्मार्ट (टिओडी) मीटरबाबत वीज ग्राहकांमध्ये असलेल्या शंका दूर करण्यासाठी आणि या नवीन तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष फायदे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महावितरणच्या मोर्शी विभागात कालपासून शाखा कार्यालयनिहाय 'महावितरण - वीज ग्राहक सु-संवाद मेळाव्याचे' आयोजन करण्यात येत आहे.

महावितरणचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनात आणि अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या पुढाकाराने ही जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. याअंतर्गत मोर्शी विभागातील एकूण ३६ शाखा कार्यालयांमध्ये मेळाव्यांचे नियोजन करण्यात आले असून, त्यापैकी काल १७ शाखा कार्यालयांमध्ये हे मेळावे उत्साहात



पार पडले. मेळाव्या दरम्यान महावितरणचे कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट यांनी उपस्थिती लावून ग्राहकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. उपस्थित अभियंते व कर्मचाऱ्यांना ग्राहकांच्या शंकांचे निरसन करण्यासोबतच इतरही वीजविषयक तक्रारींचे तातडीने निवारण करण्याचे निर्देश देण्यात आले. ज्या ग्राहकांना स्मार्ट मीटरमुळे बिल वाढल्याची शंका वाटत असेल, त्यांच्या सर्व शंकांचे महावितरणकडून संपूर्ण निरसन केले जाईल, अशी ग्वाही यावेळी कार्यकारी अभियंत्यांनी दि स्मार्ट (टिओडी) मीटर हे पूर्णतः अचूक असून सामान्य वीज ग्राहकांसाठी अत्यंत फायदेशीर आहेत. विशेषतः दिवसा सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी प्रति युनिट ८५ पैशांची सवलत मिळवून देण्यासाठी हे मीटर उपयुक्त ठरणार आहे. याशिवाय 'महावितरण स्मार्ट ॲप' डाऊनलोड करून नोंदणी केल्यास दर अर्ध्या तासाचा वीज वापर समजणार असल्याने विजेच्या वापरावर नियंत्रण ठेवणे सोपे होणार आहे. त्यामुळे ग्राहकांनी सोशल मीडियावरील ऐकीव आणि दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास न ठेवता प्रत्यक्ष कार्यालयात येऊन याचे फायदे समजून घ्यावेत, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले.

या उपक्रमाला लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. मोर्शी वितरण केंद्रातील मेळाव्याला नगरसेवक नईम खान व सागर ठाकरे यांनी भेट देऊन स्मार्ट मीटरची कार्यपद्धती जाणून घेतली आणि नागरिकांना स्मार्ट मीटरचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. तसेच हिवरखेड ग्रामपंचायत कार्यालयात पार पडलेल्या मेळाव्याला सरपंच सविता मालपे, गोपाळ मालपे, ज्योती सावरकर, ग्रामपंचायत सदस्य, कल्पवृक्ष प्रभा संघ महिला बचत गटाच्या प्रतिनिधी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यापीठातील प्लँट मेटाबोलाईट रेफरन्स स्टँडर्डस्चे लॉंचिंग

**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बायोटेक्नॉलॉजी (जैवतंत्रज्ञान) विभागाच्यावतीने वनस्पतीजन्य संशोधनाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने 'प्लँट मेटाबोलाइट रेफरन्स स्टँडर्ड्स' च्या लॉंचिंग सोहळ्याचे २९ जुलै रोजी दुपारी १ वाजता कुलगुरू कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. वनस्पतींमधील औषधी गुणधर्मांचा शोध घेणे आणि औषध निर्मिती क्षेत्राला बळकटी देण्याच्या दृष्टीकोनातून हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. यावेळी हार्माइन, डायोजेनिन, बोएराव्हिनोन बी, विथेफेरिन हे उच्च-शुध्दतेचे रेफरन्स स्टँडर्ड्स उच्च क्षमता तंत्रज्ञानाचा वापर करुन वनस्पती चयापचय घटकांची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांच्या प्रमाणिकरणासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. संशोधनाला चालना देणे, नाविन्यतेला सक्षम करणे आणि जीवन समृध्द करणे हा विद्यापीठाचा मुख्य दृष्टिकोन आहे.

या प्रकल्पाच्या यशस्वीपूर्ततेसाठी जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहसंशोधक डॉ. हरिप्रसाद पैकराओ, डॉ. सुरेंद्र पाटील,डॉ. अंकित काळे,ज्ञानेश्वरी चोखट, पल्लवी मरकाम प्रकल्प सहका-यांची भूमिका बजावत आहेत. विद्यापीठाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे वैज्ञानिक संशोधनाच्या क्षेत्रात अमरावती विद्यापीठाची मान उंचावणार आहे.

# गुरुपौर्णिमेनिमित्त श्री संत अच्युत महाराज गुरुपूजा उत्सव

## भाविकांना उपस्थितीचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

गुरुपौर्णिमेच्या पावन पर्वानिमित्त सद्गुरु श्री संत अच्युत महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भव्य गुरुपूजा उत्सव बुधवार,२९ जुलै रोजी सकाळी १० वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन,मोर्शी रोड,अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. या उत्सवात गुरुपूजन, भजन, ग्रंथप्रकाशन, मार्गदर्शन, प्रवचन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, गुरुप्रेमी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

वंदनीय श्री संत अच्युत महाराज यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या विविध सामाजिक, आध्यात्मिक व सेवाभावी उपक्रमांपैकी श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल हा समाजसेवेचा आदर्श ठरला आहे. या रुग्णालयात आजपर्यंत ८० हजारांहून अधिक हृदयशस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या आहेत. बायपास, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी, पेसमेकरसह आधुनिक की-होल, MICS, IVUS व ROTA तंत्रज्ञानाद्वारे अत्याधुनिक उपचार उपलब्ध करून दिले जात आहेत. या सेवाकार्यात सहभागी होण्यासाठी भाविकांनी हार्ट हॉस्पिटलला भेट देऊन गुरुदक्षिणेच्या माध्यमातून सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

उत्सवात सकाळी १० ते १२ या वेळेत गुरुपूजन (पादुका पूजन), मान्यवरांची मनोगते, भजन आणि धर्मग्रंथ प्रकाशन होईल. दुपारी १२ ते १२.१५ या वेळेत डॉ. अनिलजी सावरकर, अध्यक्ष, श्री संत अच्युत महाराज संस्थान व श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल यांचे मार्गदर्शन होईल. त्यानंतर वं. श्री संत सचिन देव महाराज यांचे 'गुरुपौर्णिमा' या विषयावर विशेष प्रवचन होणार असून, दुपारी १.३० ते ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन श्री संत अच्युत महाराज सत्संग मंडळ, अमरावती व सानेगुरुजी मानव सेवा संघ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले असून, श्री संत अच्युत महाराज



संस्थान, श्री क्षेत्र शेंदुरजना बाजार, अच्युत धर्मग्रंथ प्रकाशन, श्री संत अच्युत महाराज तपोभूमी (नागठाणा), श्री शिवभुवन, श्री क्षेत्र कौंडण्यपूर, श्री मानवता प्रतिष्ठान (गुरुकुंज मोझरी),वं.श्री संत अच्युत महाराज जन्मभूमी संस्थान (वरूड) तसेच समस्त श्री संत अच्युत महाराज सत्संग मंडळ, महाराष्ट्र यांचे सहकार्य लाभले आहे.गुरुप्रेमी भाविकांनी या गुरुपूजा उत्सवात सहभागी होऊन सद्गुरुंचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# स्व.अजितदादा पवार जयंती व मुख्यमंत्री फडणवीस वाढदिवसानिमित्त हंतोड्यात शेतकऱ्यांना स्वावलंबनाची भेट

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

अंजनगाव तालुक्यातील हंतोडा ग्रामपंचायत येथे महाराष्ट्राचे नेते, माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष सहाय्य वाटप सोहळ्याचे आयोजन उत्साहात करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी हंतोडा परिसरातील शेतकरी, शेतमजूर आणि शेतीपूरक व्यवसाय करणाऱ्या होतकरू युवकांना शेतीला व व्यवसायाला उपयोगी पडणाऱ्या विविध साहित्याचे



वाटप करण्यात आले. यामध्ये खुरपणी यंत्र, फवारणी पंप, कुदळ, दुधाच्या कॅन आदी साहित्याचा समावेश होता. अत्यंत उत्साही वातावरणात लाभार्थ्यांना साहित्याचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हंतोडा ग्रामपंचायतीच्या सरपंच पूजा रविकुमार गोळे होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे आ.गजानन लवटे, अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रवीण तायडे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले, युवा उद्योजक श्रीकांत इंगळे, रवींद्र कोकाटे, अजय पसारी, डॉ.विलास कविटकर, विकास येवले, सुधीर वि. गोळे, बाबुराव गोळे, माधवराव गोळे, मुख्याध्यापक केतन खिरकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विविध विभागांचे शासकीय कर्मचारी, शिक्षकवृंद, ग्रामपंचायत सदस्य तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ व लाभार्थी उपस्थित होते. सर्वमान्य व खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

हंतोडा ग्रामपंचायतीचे सरपंच,सदस्य हे केवळ कागदावर काम करत नाहीत, तर प्रत्यक्षात लोकांच्या घरापर्यंत पोहोचून त्यांच्या गरजा समजून घेतात, हे आजच्या कार्यक्रमातून सिद्ध झाले आहे.

**- आ.प्रवीण तायडे**

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावातील प्रत्येक गरजू कुटुंबाला, शेतकऱ्यांना आणि महिलांना स्वावलंबी बनवणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. केवळ मूलभूत सुविधा पुरवून थांबण्यापेक्षा, ग्रामस्थांच्या हाताला काम आणि रोजगाराला मदत देणारे हे साहित्य वाटप करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. दर्यापूर व अचलपूर मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत सदस्य, सचिव यांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम यशस्वी होऊ शकला; भविष्यातही हंतोडा गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही असेच कटिबद्ध राहू.'

**पूजा गोळे,सरपंच**

एखाद्या गावाचा विकास म्हणजे केवळ सिमेंटचे रस्ते,गल्लीबोळातले दिवे किंवा इमारती उभारणे नव्हे. गावातील शेवटच्या घटकापर्यंत, गरजवंतापर्यंत आणि शोषितांपर्यंत विकासाची गंगा पोहोचणे म्हणजेच खरा विकास होय! आज हंतोडा ग्रामपंचायतीने पुढाकार घेऊन विविध योजनांच्या माध्यमातून गरजू बांधवांना, दिव्यांगांना, महिलांना आणि वृद्धांना जे सहाय्य दिले आहे, ते अत्यंत कौतुकास्पद आहे.

**- आ.गजानन लवटे**

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अमरावती, यांचे कार्यालय

जन्म/मृत्यु बाबत जाहीरनामा रा. मा. क्र. एम. आर.सी.-८१/अमरावती/३५८/२०२५.२०२६

**अर्जदार : श्री. प्रितुल सचिन राठी**
रा. गॅलक्सी हॉटेल जवळ ख्रिस्त कॉलनी कलेक्टर ऑफिस मागे परांजपे कॉलनी अमरावती

**-विरुध्द-**

**गैरअर्जदार :-** निबंधक जन्म/मृत्यु आरोग्य विभाग, महानगरपालिका अमरावती ता. जि. अमरावती

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील पत्यावर कायम रहिवासी आहे. **अर्जदार श्री. प्रितुल सचिन राठी** रा.गॅलक्सी हॉटेल जवळ ख्रिस्त कॉलनी कलेक्टर ऑफिस मागे परांजपे कॉलनी अमरावती याच्या जन्माची दिनांक २४.१२.२०१२ रोजी राहत्या घरी अमरावती ता.जि. अमरावती येथे झाला. निबंधक जन्म-मृत्यु आरोग्य विभाग, महानगरपालिका अमरावती येथे जन्माची नोंद घेतली नाही अर्जदाराला उपरोक्त जन्म प्रमाणपत्राची गरज असल्यामुळे जन्माची नोंद महानगरपालिका अधिनियम १९६९ मधिल कलम १३(३) व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम २००० मधिल नियम ९(३) नुसार जन्माच्या नोंदनीचा आदेश होण्याबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी, ज्या कोणास सदर कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार अमरावती, येथील दाखल अर्जातील श्री. प्रितुल सचिन राठी रा. गॅलक्सी हॉटेल जवळ ख्रिस्त कॉलनी कलेक्टर ऑफिस मागे परांजपे कॉलनी अमरावती याच्या जन्माची दिनांक २४.१२.२०१२ रोजी राहत्या घरी अमरावती ता. जि. अमरावती येथे झाला. त्यांच्या जन्माच्या दिनांकास किंवा त्याबाबत हरकत असल्यास दिनांक १०/०८/२०२६ पर्यंत स्वतः किंवा आपल्या वकीला मार्फत येवून हरकत न घेतल्यास सदर्हु अर्जदार याची साक्ष घेवून जन्मची नोंद सदर कार्यालयात घेण्याचा आदेश किंवा तसे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २४/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला.

दिनांक :- २४/०७/२०२६

शिक्का

**तहसिलदार तथा, करीता**
**तालुका दंडाधिकारी अमरावती**

# हेल्मेट सक्तीच्या पहिल्याच दिवशी साडेचारशेहून अधिक दुचाकीस्वारांवर कारवाई

## ४५ हजार रुपयांचा दंड वसूल; प्रमुख चौकांवर वाहतूक पोलिसांची विशेष तपासणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात शुक्रवार दि.२४ जुलै पासून दुचाकी चालकासह मागील आसनावरील प्रवाशासाठीही हेल्मेट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले. या नियमाच्या अंमलबजावणीच्या पहिल्याच दिवशी वाहतूक पोलिसांनी शहरभर विशेष तपासणी मोहीम राबवत साडेचारशेहून अधिक दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई केली. या कारवाईत ४५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून काही वाहनचालकांना ई-चलनही बजावण्यात आले.



पहिल्याच दिवशी वाहतूक पोलीस ॲक्शन मोडमध्ये दिसून आले. राजकमल चौक, मालवीय चौक, जयस्तंभ चौक, इर्विन चौक, कॅम्प चौक, राजापेठ, नवाथे चौक, बडनेरा मार्ग, विलासनगर चौक, कठोरा नाका, शेगाव नाका आदी प्रमुख चौकांवर वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. हेल्मेट न घालणाऱ्या चालकांवर मोटार वाहन कायदा, १९८८ मधील कलम १२९ अन्वये कारवाई करण्यात आली. शहरासह राष्ट्रीय व राज्य महामार्ग तसेच ग्रामीण आणि शहरी भागातही विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.

पोलीस आयुक्तालयासमोरही वाहतूक पोलिसांनी तपासणी नाके उभारून आयुक्तालयात येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांच्या हेल्मेटची तपासणी केली. नवीन नियमांनुसार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत दुचाकी चालकाबरोबरच मागील आसनावरील प्रवाशालाही आयएसआय मानांकन असलेले हेल्मेट परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे. नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांचा वाहन चालविण्याचा (पान २ वर)

# मातंग समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा

**अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण तातडीने लागू करण्याची मागणी**

**अमरावती/प्रतिनिधीः-** आरक्षण उपवर्गीकरण समर्थन कृती समितीच्या वतीने सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण निर्णयावर तातडीने अमल करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आज शुक्रवारी २४ जुलै रोजी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की आरक्षण उप वर्गीकरणाच्या समर्थनार्थ हा मोर्चा काढण्यात आला आहे. आरक्षणाचा लाभ अनुसूचित जातींना मिळाला पाहिजे.अनूसूचित जातीचे दोन गट करावे.



हरियाना राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचे आरक्षण लागू करावे. सेवा भरतीतील अनुशेष भरावा. शिक्षण रोजगार आणि आर्थिक संधी उपवर्गीकरणावर अंमलबजावणी करावी. उपवर्गीकरण लागू झाल्यानंतर निर्माण होणारी पहिली रिक्त जागा लाभांन्वीत गटासाठी राखीव ठेवण्यात यावी.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार तातडीने उपवर्गीकरण लागू करण्याची मागणी करण्यात आली. मोर्चामध्ये आमदार अमित गोरखे, माजी आमदार नामदेवराव ससाने,डॉ. अंकुश गोताबघे,विष्णूभाऊ कसबे, उत्तमराव मेश्राम, दादासाहेब किडसांग,परिमल कांबळे, देविदास अचवार, प्रा. डॉ. टी. अंभोरे,राजा हातागडे,मचिंद्र गवाले, विजय जोंधळेकर, गणेशदासजी गायकवाड,प्रा. बबनराव इंगोले,ॲड. भरत खडसे, गंगा अंभोरे,डॉ. रुपेश खडसे,अनिल सोमटक्के, महेंद्र सरकटे,देवानंद वानखेडे,पंकज जाधवसह इतरांचा सहभाग होता.

# भाजपा सरकार विरोधात दर्यापूरात सर्वपक्षिय आंदोलन

## जंतर-मंतर येथील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा तीव्र निषेध

**खल्लार/प्रतिनिधीः-** सोनम वांगचुक व अभिजित दिपके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या शांततापूर्ण आंदोलनाच्या समर्थनार्थ तसेच दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ दर्यापूर येथे आज (दि.२४)सर्वपक्षिय पदाधिकारी, संयुक्त किसान मोर्चा व भारतीय विद्यार्थी मोर्चाच्या वतीने आंदोलन करण्यात आले.

आंदोलनादरम्यान केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी शांततेच्या मार्गाने लोकशाही पद्धतीने आपला निषेध नोंदवित विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध व्यक्त केला. विविध सामाजिक, राजकीय व शेतकरी संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या



संख्येने उपस्थित होते.यावेळी आंदोलनकर्त्यांनी देशातील लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न थांबवावा, अशी मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कारवाई (पान २ वर)

# मंगळवारपासून जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धा

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप क्रीडा स्पर्धा मंगळवारपासून आयोजित करण्यात आल्या आहे. मंगळवार, दि. २८ ते ३१ जुलै दरम्यान विविध वयोगटाच्या स्पर्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धा अमरावती येथील जिल्हा परिषद सायन्सकोर मैदान आणि पोलिस ग्राऊंड येथे घेण्यात येणार आहे.

जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी, नवी दिल्लीच्या वतीने २०२६-२७ या वर्षात आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय सुब्रतो फुटबॉल कप, सबज्युनियर मुले, ज्युनिअर मुले, मुली क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूकरीता सबज्युनिअर १५ वर्षाआतील मुले क्रीडा स्पर्धेसाठी मुले वयोगटात दि. १ जानेवारी २०१२ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. तसेच ज्युनिअर १७ मुले, मुली वयोगटासाठी दि. १ जानेवारी २०१० रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा.

जिल्हास्तरीय सुब्रतो मुखर्जी फुटबॉल कप सबज्युनिअर, ज्युनिअर क्रीडा स्पर्धेत सहभागी सर्व संघानी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापूर्वीच subrotocup.in/register या संकेतस्थळावर (पान २ वर)

# छत्रपती शिवाजी महाराज 'समाधान शिबिरात १९ हरविलेले मोबाईल मूळ मालकांना परत

**खल्लार/प्रतिनिधीः-** छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अंतर्गत दर्यापूर उपविभागातील पोलीस स्टेशन दर्यापूर व पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी यांच्या संयुक्त प्रयत्नातून हरविलेले एकुण १९ मोबाईल फोन शोधून त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात स्वाधीन करण्यात आले. मोबाईल परत मिळाल्याने लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त करत पोलीस प्रशासनाचे आभार मानले.

यावेळी आयोजित कार्यक्रमात उपविभागीय पोलीस अधिकारी दर्यापूर सतिश कुलकर्णी यांच्या हस्ते मोबाईल संबंधित मालकांना परत करण्यात आले.



हरविलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी खल्लारचे पोलीस उपनिरीक्षक सुनिल पवार, दर्यापूर पोलीस स्टेशनचे कॉन्स्टेबल सचिन जाधव, अंजनगावचे पोलीस कॉन्स्टेबल युवराज सोळंके, आणि येवदा पोलीस स्टेशनचे कॉन्स्टेबल धिरज इंगळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

याच अभियानांतर्गत 'ऑपरेशन कवच' अंतर्गत अमली पदार्थविरोधी जनजागृती, दुचाकीस्वारांनी (पान २ वर)

# ऑटो चालकाला मारहाण करून लुटले

## परतवाडात आजाद नगर येथील घटना

**अमरावती :** दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून वरून परतवाडा शहरातील आजाद नगर परिसरात ४ तरुणांनी एका ऑटो चालकाला बेदम मारहाण करून त्याच्या कडील ४ हजार रुपये लुटल्याची खळबळ जनक घटना समोर आली आहे. मेहताब बेग उर्फ पप्पू (वय २७ वर्षे, रा. छोटा बाजार, परतवाडा) असे मारहाण झालेल्या ऑटो चालकाचे नाव आहे.माहिती नूसार लालापुल येथील मेहताब बेग उर्फ पप्पू (२७ रा. छोटा बाजार, परतवाडा) हे ऑटो चालवून उदरनिर्वाह करतात.

गुरुवारी रात्री दिवसभर ऑटो चालवून घरी परत जात असताना त्यांना मावशीचा फोन आला. मावशीला ४ हजार रुपयांची अत्यंत गरज असल्याने पप्पू पैसे देण्यासाठी आजाद नगर येथे निघाले.मस्जिद जवळील मुख्य चौकात पोहोचताच आधीपासून दारूच्या नशेत बसलेल्या ४ तरुणांनी त्यांना अडवले आणि पैसे मागितले. त्यांनी पैसे नाही दिले म्हणून आरोपीं भोलेसिंग अंतरसिंग बावरी (वय ३०), गुरमीत उर्फ गोलू अंतरसिंग बावरी (वय ३२), किस्मतासिंग कल्याणसिंग बावरी (वय ३२) व विक्रमसिंग सोहनसिंग बावरी (वय ४९, सर्व रा. आजाद नगर) या चौघांनी (पान २ वर)

# बकऱ्या चोरी करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना अटक

## -ऑटो, मोबाईल आणि रोख रक्कम जप्त -दोन गुन्ह्यांची कबुली

**अमरावती/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी पोलिसांनी बकऱ्या चोरी करणाऱ्या दोन सराईत चोरट्यांना अटक करून त्यांच्याकडून चोरीसाठी वापरण्यात आलेला ऑटो, दोन मोबाईल आणि बकऱ्या विकून मिळालेली रोख रक्कम असा एकूण १ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपींनी बकऱ्या चोरीच्या दोन गुन्ह्यांची कबुली दिली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे शेख इरशाद शेख याकूब (वय ४०, रा. देवडीमहल, अचलपूर) आणि सचिन नरेश माकोडे (वय २६, रा. हिरापुरा, अचलपूर) अशी आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंजनगाव सुर्जी



येथील नवगज्जी प्लॉट परिसरातील रहिवासी मुशाहिद खान मुस्तफा खान (वय २९) यांच्या तीन बकऱ्या २० जुलै रोजी चरण्यासाठी गेल्या होत्या. मात्र सायंकाळपर्यंत त्या परत न आल्याने परिसरात शोध घेण्यात आला. तरीही बकऱ्यांचा मागमूस न लागल्याने त्यांनी अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला.


पोलीस निरीक्षक सूरज बोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शोध पथकाने तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे अचलपूर येथे छापा टाकून दोन्ही संशयितांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

आरोपींकडून चोरीसाठी वापरलेला ऑटो, दोन मोबाईल फोन आणि बकऱ्या विकून मिळालेली १५ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १ लाख ७ हजार (पान २ वर)

# मासे पकडायला गेलेल्या युवकाचा विद्युत शॉक लागून मृत्यू

**-मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी लगतच असलेल्या श्रीक्षेत्र पाळा येथे एका २४ वर्षीय युवकाचा विद्युत शॉक लागून माडू नदीच्या पात्रात मृत्यू झाल्याची घटना आज दि. २४ जुलै रोजी सायंकाळी पाच वाजताचे सुमारास घडली.मृतक युवकाचे नाव विजय रमेश परतेती (वय २४ रा.पाळा) असे आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार श्रीक्षेत्र पाळा येथील विजय रमेश परतेती या युवकासोबत आणखी तिघे सालबर्डी येथून वाहणाऱ्या पाळा शेत शिवारातील माळू नदीच्या पात्रात मासोळ्या पकडण्यासाठी



गेले होते. त्यासाठी त्यांनी तेथे असलेल्या एम एस सी बी च्या पोलवरून इलेक्ट्रिक तारेचा वापर करून मासोळ्या पकडण्याच्या नांदात विजय परतेती याला विद्युत लाईनचा जोरदार शॉक बसल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.सोबत असलेल्या तिघांनी त्याला पाण्याबाहेर काढून नदीकाठी ठेवले.लगेच (पान २ वर)

# इर्विन चौकात वाहतूक कोंडी

## एकाच मार्गावरून वाहतूक सोडल्याने गोंधळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात शुक्रवारपासून हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे.यामुळे दुपारी इर्विन चौक ते मोर्शी रोड परिसरात मोठी वाहतूक कोंडी झाली.वाहतूक पोलिसांनी तपासणीसाठी रस्त्यावर बॅरिकेड्स लावल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यामुळे नागरिकांना तासभर रखडावे लागले. आज पासून दुचाकी स्वारांसाठी हेल्मेट सक्ती लागू झाल्या नंतर वाहतूक विभागाने



इर्विन-मोर्शी रोडवरील वाहतूक कार्यालयासमोर एका बाजूला बॅरिकेड्स लावून तपासणी मोहीम सुरू केली. मोठ्या प्रमाणात बॅरिकेड्स लावल्यामुळे एकाच बाजूने येणाऱ्या आणि जाणाऱ्या दोन्ही दिशेची वाहतूक सोडावी लागली. त्यामुळे श्रीकृष्ण पेठे कडून येणाऱ्या मार्गावर एक सिटी बसही अडकली.परिणामी इर्विन चौक ते मोर्शी रोडपर्यंत वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. कार, ऑटो, दुचाकी, बस (पान २ वर)

# भरधाव अल्टो कारची दुचाकीला धडक, पिता-पुत्र जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील दस्तूर नगर रोडवरील एमआयडीसी ऑफिसजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या अल्टो कारने दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार पिता-पुत्र गंभीर जखमी झाले आहेत. या प्रकरणी राजापेठ पोलिसांनी अल्टोच्या चालका विरोधात गुन्हा दाखल केला आहे. शुभम अशोकराव खंडारे (वय २८ वर्षे, रा.गोपाल नगर) व त्यांचे वडील अशोक खंडारे (वय ६५ माजी सैनिक, रा. धान्य मार्केट, विलास नगर, सिक्युरिटी गार्ड) हे जखमी झाले आहे.माहितीनुसार गुरुवार २३ जुलै रोजी रात्री ११.३० वाजता शुभम खंडारे त्यांचे वडील अशोक खंडारे यांच्या सोबत दुचाकी क्रमांक एमएच २७ टी ८५०६ ने जात होते. त्याच वेळी समोरून पांढ-या रंगाची अल्टो १० कार क्रमांक एमएच २७ डीएल ७२४४ च्या चालकाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघात शुभम आणि त्यांचे वडील अशोक खंडारे दोघेही खाली पडून गंभीर जखमी झाले. दोघांनाही तातडीने उपचारासाठी इर्विन हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे.या प्रकरणी राजापेठ पोलिस स्टेशमध्ये अल्टो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# फ्रेजरपुरा हद्दीत हातभट्टी दारूवर कारवाई

## ७५ लिटर हातभट्टी दारू, १५० लिटर मोहाचा सडवा व साहित्य नष्ट

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर गुन्हे शाखेने फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत हातभट्टी दारू निर्मितीविरोधात धडक कारवाई करत ७५ लिटर हातभट्टी दारू, १५० लिटर मोहाचा सडवा तसेच दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करून जागीच नष्ट केले. या कारवाईत एकूण ५४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (२४ जुलै) शहर गुन्हे शाखेचे पथक फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत नियमित पेट्रोलिंग करीत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे वडाळी येथील सरदारपुरा परिसरात छापा टाकण्यात आला.

छाप्यामध्ये अजितासिंग अवतारसिंग (वय ३०, रा. सरदारपुरा, वडाळी, अमरावती) हा आपल्या राहत्या घरासमोरील आवारात अवैधरित्या हातभट्टी दारू तयार करताना आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळी ७५ लिटर हातभट्टी दारू, १५० लिटर मोहाचा (पान २ वर)

# देशी दारूने भरलेला बेवारस ट्रक आढळला

## -७० ते ८० पेट्या लंपास ; चालक फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वडाळी परिसरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावर देशी दारूने भरलेला एक ट्रक बेवारस अवस्थेत आढळून आला. ट्रकचा चालक व क्लिनर घटनास्थळी नसल्याचा फायदा घेत काही जणांनी ट्रकमधील सुमारे ७० ते ८० पेट्या देशी दारू लंपास केल्याची घटना उघडकीस आली. माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत ट्रक ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणला.

मिळालेल्या माहितीनुसार, अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव येथून एमएच-२० ईएल-८६५० क्रमांकाच्या ट्रकमध्ये सुमारे ३० लाख रुपयांची देशी दारू भरून ती अमरावतीतील वलगाव येथील गोदामात नेण्यात येत होती. हा माल शहरातील अग्रवाल नावाच्या व्यापाऱ्याचा असल्याचे सांगितले जात आहे.

गुरुवारी दुपारी फ्रेजरपुरा पोलिसांना वडाळी परिसरातील राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकमधून काही जण दारूच्या पेट्या उतरवून नेत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना पाहताच काही जणांनी हातातील दारूच्या पेट्या पुन्हा ट्रकमध्ये टाकून घटनास्थळावरून (पान २ वर)

# बहुचर्चित अतुल पुरी हत्या प्रकरणातील सर्व आरोपी निर्दोष

## -ॲड.परवेज खान व ॲड. प्रशांत देशपांडे यांचा यशस्वी युक्तिवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा व सत्र न्यायालयाने २२ ऑगस्ट २०२५ रोजी बडनेरा येथे घडलेल्या बहुचर्चित अतुल पुरी हत्याकांडातील सर्व ६ आरोपींना पुराव्याअभावी निर्दोष मुक्त केले आहे.मुख्य आरोपी साहिल मोहोळ, सक्षम लांडे व अक्षय शिंपी यांच्यासाठी ॲड. परवेज खान यांनी बाजू मांडली. आरोपी राहुल पुरी व प्रशांत वऱ्हाडे यांच्याकडून ॲड. प्रशांत देशपांडे व आरोपी गौरव कांबे यांच्यासाठी ॲड. अमर नंदेश्वर यांनी युक्तिवाद केला.दोषारोप पत्रानुसार बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा येथील शिवाजी शिक्षण संस्थेच्या पुंडलिक बाबा





महाविद्यालयात लिपिक म्हणून काम करणारे अतुल पुरी दररोज बडनेरा येथून रेल्वेने ड्युटीवर जात होते.नेहमी प्रमाणे २२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८ वाजता ड्युटीसाठी जात असताना बडनेरा रेल्वे स्टेशनजवळ तिलक नगर ते पवारवाडी रोडवर त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती.

या प्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात अतुल पुरी यांच्या पत्नीच्या तक्रारीवरून कलम १०३(१), ६१(२)(अ), २४९(अ), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.पोलिसांच्या तपासा नुसार, मृतकाचा नातेवाईक (पान २ वर)

# बारावीच्या पुरवणी परीक्षेतील अपयशामुळे विद्यार्थिनीची आत्महत्या

## भातकुली तालुक्यातील निंभा शिवापूर येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल लागल्यानंतर दोन विषयांत अनुत्तीर्ण झाल्याच्या धक्क्यातून भातकुली तालुक्यातील १७ वर्षीय विद्यार्थिनीने गळफास घेऊन जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, विद्यार्थ्यांवरील शैक्षणिक तणावाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मृत विद्यार्थिनीचे नाव रितिका (वय १७) असे आहे. गुरुवारी (२३ जुलै) दुपारच्या सुमारास ती घरात एकटी असताना स्वयंपाकघरातील छताच्या पंख्याला स्टोलच्या साहाय्याने गळफास घेतल्याचे उघड झाले. काही वेळाने कुटुंबीयांनी तिला पाहिले असता तातडीने खाली उतरविण्यात आले. मात्र तोपर्यंत तिचा मृत्यू झाला होता. प्राथमिक चौकशीत बारावीच्या (पान २ वर)